आधार हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

# तुमच्या ग्राहकाला जाणून घ्या

# (केवायसी) आणि

# काळे पैसे पांढरे करण्याच्या विरोधातील (एएमएल) उपाययोजनांचे धोरण

*(सुधारित आवृत्ती ८ फेब्रुवारी, २०२४ पासून लागू)*

*(आवृत्ती – ११)*

**अनुक्रमणिका**


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | **परिचय** | ४ |
| २ | **प्रकरण - १**<br><br>**कोणाला लागू आहे आणि व्याख्या** | ५-१० |
| ३ | **प्रकरण - २**<br><br>**सर्वसाधारण** | १२-१३ |
| ४ | **प्रकरण - ३**<br><br>**ग्राहकस्वीकार धोरण** | १३ |
| ५ | **प्रकरण - ४**<br><br>**जोखमीचे संवर्गीकरण आणि व्यवस्थापन** | १४-१६ |
| ६ | **प्रकरण - ५**<br><br>**ग्राहकाची ओळख पटविण्याची कार्यप्रणाली (सीआयपी)** | १६-१६ |
| ७ | **प्रकरण – ६**<br>**ग्राहकाच्या बाबतीत योग्य ती खबरदारी (सीडीटी-ड्यू डिलिजन्स) कार्यप्रणाली:**<br>**भाग १ - व्यक्तींच्या बाबतीत गोग्य ती खबरदारी कार्यप्रणाली** | १६-२० |
| | **भाग २ - सोल प्रोप्रायटरी फर्म्ससाठी सीडीडी उपाययोजना** | २०-२१ |
| | **भाग ३ - कायदेशीर अस्तित्व असलेल्या संस्थांसाठी सीडीडी उपाययोजना** | २२-२४ |
| | **भाग ४ - लाभार्थी मालकांची ओळख** | २२ |
| | **भाग ५ - सध्याचे ड्यू डिलिजन्स** | २२-२५ |
| | **भाग ६ - ड्यू डिलिजन्सची वाढीव आणि सोपी केलेली कार्यप्रणाली** | २७-२९ |
| ८ | **प्रकरण – ७**<br>**नोंदींचे व्यवस्थापन** | २९-३० |
| ९ | **प्रकरण – ८**<br>**फायनान्शिअल इंटेलिजन्स युनिटला रिपोर्टिंग करण्याची आवश्यकता - भारत** | ३०-३० |
| १० | **प्रकरण – ९**<br>**आंतरराष्ट्रीय करारांच्या अंतर्गत असलेल्या आवश्यकता/जबाबदाऱ्या** | ३१-३४ |
| ११ | **प्रकरण – १०**<br>**इतर सूचना** | ३४-३८ |

| | | |
|---|---|---|
| १२ | **जोडपत्र १**<br><br>**डिजिटल केवायसी कार्यप्रणाली** | ३८-३९ |
| १३ | **जोडपत्र २**<br><br>**पात्र एफपीआयज्साठी पीआयएस अंतर्गतकेवायसी दस्तऐवज** | ३९-४१ |
| १४ | **जोडपत्र ३**<br>**कमी जोखमीच्या संवर्गातील ग्राहकांसाठी विचारात घेतली जाऊ शकेल अशी अतिरिक्त केवायसी दस्तऐवजांची यादी** | ४१-४२ |
| १५ | **जोडपत्र ४**<br><br>**सीटीआर/एसटीआर व्यवहारांची उदाहरणदाखल यादी** | ४३-४४ |

# आधार हाऊसिंग फायनान्स लिमिटेड
# तुमच्या ग्राहकाला जाणून घ्या (केवायसी) आणि
# काळे पैसे पांढरे करण्याच्या विरोधातील (एएमएल) उपाययोजनांचे धोरण–(सुधारित)

## १. परिचय

आधार हाऊसिंग फायनान्स लिमिटेड ही कंपनी १९९० साली स्थापन करण्यात आली होती आणि नॅशनल हाऊसिंग बँकेकडे (एनएचबी) तिची नोंदणी करण्यात आलेली आहे आणि तीचे नियमन भारतीय रिझर्व बँकद्वारे केले जाते . एनएचबीच्या आवश्यकतांनुसार कंपनीने केवासी आणि एएमएल पॉलिसी (पॉलिसी) स्वीकारलेली आहे, तसेच ह्या कंपनीच्या संचालक मंडळाच्या मान्यतेने पॉलिसीत वेळोवेळी योग्य त्या सुधारणा केलेल्या आहेत.

एनएचबीने तुमच्या ग्राहकाला जाणून घ्या (केवायसी) मार्गदर्शक सूचना आणि काळा पैसा पांढरा करण्याच्या विरोधातील मानके यासाठीच्या दिनांक १० एप्रिल २००६च्या संदर्भ क्रमांक NHB (ND)/DRS/Pol-No.13/2006 असलेल्या अधिसूचनेनुसार व सर्वोत्तम कॉर्पोरेट आचरणाचा एक भाग म्हणून सुरुवातीला ही पॉलिसी तयार करण्यात आलेली होती. ह्या पॉलिसीत एनएचबीने दिनांक ११ ऑक्टोबर २०१० च्या परिपत्रक क्र. NHB/ND/DRS/Pol. No. 33/2010 - 11अनुसार सुधारणा करण्यात आली होती व ती अद्ययावत करण्यात आली होती आणि त्यानंतर २ जुलै २०१८ च्या मास्टर सर्क्युलर क्र. अनुसार आणि केवायसीवरील मार्गदर्शक सूचना व काळा पैसा पांढरा करण्याविरोधी मानकांसंबंधीचे एनएचबीचे दिनांक ११ मार्च २०१९ चे परिपत्रक क्र. NHB/ND/DRS/PolicyCircular No. 94/ 2018-19 यांनुसार वेळोवेळी सुधारणा करण्यात आली होती.

त्यानंतर ह्या पॉलिसीचे पुनरावलोकन संचालक मंडळाने त्यांच्या दिनांक २४ एप्रिल २०१८ रोजी पुनरावलोकन व सुधारणा करून तीस मान्यता दिली होती आणि त्याशिवाय संचालक मंडळाने त्यांच्या दिनांक ३० एप्रिल २०१९ रोजी आयोजित केलेल्या सभेत तिचे पुनरावलोकन आणि सुधारणा करून तीस मान्यता दिली होती व त्यानंतर संचालक मंडळाने त्यांच्या दिनांक १८ ऑगस्ट २०२० रोजी झालेल्या सभेत, दिनांक १९ मे २०२०चे परिपत्रक क्र. RBI/2019-20/235,DOR.NBFC(HFC).CC.No.111/03.10.136/2019-20 व त्याशिवाय दिनांक २० एप्रिल २०२०चे RBI/DBR/2015-16/18 Master Direction DBR.AML.BC.No.81/ 14.01.001/2015-16 यांच्या अनुसारतिचे पुनरावलोकन आणि सुधारणा करून, आरबीआयच्या नो युवर कस्टमर (केवायसी) डायरेक्शन्स, २०१६ **(मास्टर डायरेक्शन्स ऑन केवायसी/ आरबीआय मास्टर डायरेक्शन्स)**चा स्वीकार करण्यासाठी तीस मान्यता दिली होती. केवायसीबाबत **मास्टर डायरेक्शन (एमडी)मध्ये सुधारणा करण्याबाबत पुढे संचालक मंडळाने 28 मे 2021 रोजी झालेल्या त्यांच्या बैठकीत धोरणाचे पुनरावलोकन** व **सुधारणा आणि रीतसर मंजूरी दिली आहे जी दिनांक 10 मे** 2021 रोजीच्या **परिपत्रक क्रमांक** आरबीआय / 2021-22/35 डिओआर. एएमएल. आरईसी क्रमांक 15/14.01.001/2021-22 **पर्यंत अपडेट केली आहे**. संचालक मंडळाने १४ फेब्रुवारी २०२२ रोजी झालेल्या बैठकीत या धोरणाचा आढावा घेतला. तसेच संचालक मंडळाने 09 ऑगस्ट 2023 रोजी झालेल्या बैठकीत या धोरणाचा आढावा घेतला, जो केवायसीवरील मास्टर डायरेक्शन (एमडी) दुरुस्तीसंदर्भात दिनांक 28 एप्रिल 2023 रोजीचा परिपत्रक क्रमांक आरबीआय/2023-24/24 डीओआर एएमएल. आरईसी.111/14.01.001/2023-24 आणि दिनांक 4 मे 2023 रोजीचा परिपत्रक क्रमांक आरबीआय/2023-24/25 डीओआर. एएमएल. आरईसी.13/14.01.001/2023-24 पर्यंत अद्ययावत/अपडेटेड आहे. शिवाय या धोरणाचा संचालक मंडळाने शेवटचा आढावा १० जानेवारी २०२४ रोजी घेतला होता, जो केवायसीवरील मास्टर डायरेक्शन (एमडी) मध्ये सुधारणा करण्यासंदर्भात दिनांक 17 ऑक्टोबर 2023 रोजीच्या परिपत्रक क्र. आरबीआय/2023-24/69-डीओआर. एएमएल. आरईसी.44/14.01.001/2023-24 पर्यंत अद्ययावत/अपडेटेड आहे.

त्यानंतर, सरकारने अधिसूचित केलेले काळ्या पैशाला आळा घालणारा कायदा, २००२च्या व काळ्या पैशाला आळा घालणे (नोंदी ठेवणे) नियम, २००५ (वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार), खात्याशी संबंधित संबंध स्थापन करून किंवा अन्यथा ग्राहकांच्या व्यवहारांवर देखभाल करण्यासाठी कंपनीला ग्राहकाची ओळख पटविण्यासाठी काही कार्यप्रणालीचे पालन करण्याची आवश्यकता होती. काळा पैसा पांढरा करण्याविरोधातील कायदा, २००२ व काळ्या पैशाला आळा

घालणे (नोंदी ठेवणे) नियम, २००५ ची लागू असल्यानुसार व वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार अंमलबजावणी करण्यासाठी एएचएफएल पावले उचलील. ही पॉलिसी अशा प्रकारे ग्राहकाला व त्याच्या आर्थिक व्यवहारांना अधिक चांगल्या प्रकारे जाणून घेणे/समजून घेणे यासाठी तयार करण्यात आलेली आहे, ज्यामुळे पर्यायाने कंपनीला तिची जोखीम विवेकाने हाताळण्यास व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांनी त्याचा वापर काळा पैसा पांढरा करण्यासाठी करणे टाळण्यास मदत होईल.

हे धोरण भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) च्या दिनांक 17 ऑक्टोबर, 2023 रोजीच्या परिपत्रक क्रमांक RBI/2023-24/69-DOR.AML.REC.44/14.01.001/2023-24 द्वारे परिचालित केलेल्या दुरुस्ती/सुधारणानुसार सुधारित करण्यात आले. तसेच भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) च्या दिनांक 4 जानेवारी, 2024 रोजीच्या परिपत्रक क्रमांक RBI/2023-24/107 DOR.AML.REC.66/14.01.001/2023-24 द्वारे परिचालित केलेल्या नवीनतम दुरुस्ती/सुधारणानुसार धोरण सुधारित केले जात आहे.

## प्रकरण १

## कोणाला लागू आहे आणि व्याख्या

**२. कोणाला लागू**

ही पॉलिसीज्या संस्थांना भारतीय रिझर्व्ह बँकेचे नियमन लागू आहे, त्या सगळ्यांना, विशेषत: केवायसीवरील मास्टर डायरेक्शन्सच्या 3 (बी) (xiii) मध्ये व्याख्या दिल्यानुसार लागू असेल, मात्र जेथे अन्यथा खास उल्लेख केला असेल त्याचा अपवाद वगळून.

ही पॉलिसी कंपनीच्या ज्या शाखा परदेशात आहेत आणि कंपनीच्या बहुसंख्येने सबसिडिअरिज्च्या मालकीच्या आहेत, त्यांनाही लागू आहे, जोपर्यंत त्या त्या त्या देशाच्या कायद्याच्या विरोधात नाहीएत, मात्र त्यासाठी पुढील बाबी आवश्यक असतील:

i. जेथे ह्या मार्गदर्शक सूचनांच्या अंमलबजावणीला लागू असलेल्या कायद्याने आणि नियमावलीने प्रतिबंध केला जात असेल, तेथे ते आरबीआयच्या लक्षात आणून दिले जाईल. आरबीआय एमएल / टीएफ जोखीम व्यवस्थापित करण्यासाठी कंपनीने करावयाच्या अतिरिक्त उपायांच्या अनुप्रयोगासह कंपनीद्वारे करावयाच्या पुढील आवश्यक कारवाई बद्दल सल्ला देऊ शकते.

ii. जर आरबीआयने विहित केलेल्या केवायसी/एएमएल मानकांमध्ये आणि यजमान देशाच्या मानकांमध्ये तफावत असेल, तर शाखांनी/सबसिडिअरिज्ने त्या दोहोंपैकी जी नियमावली अधिक कडक असेल, ती स्वीकारली पाहिजे.

iii. परदेशात नोंदणी झालेल्या बँकांच्या शाखा/सबसिडिअरिज् या दोहोंपैकी, म्हणजेच भारतीय रिझर्व्ह बँकेने विहित केलेल्या आणि त्या देशाने विहित केलेल्या नियमावलींपैकी अधिक कडक असलेल्या नियमावलीचा स्वीकार करू शकतात.

ह्या पॉलिसीच्या बाबतीतील र्स संदर्भ हे कर्जखात्याशी किंवा पैसे कर्जाऊ देण्याच्या बाबतीतील आहेत असे समजावे. कंपनी यापुढे ठेवी स्वीकारू शकणार नाही, परंतु सध्या असलेल्या ठेवींनाही, जोपर्यंत संबंधित आहे तोपर्यंत, ही आवश्यकता लागू राहील.

**३. व्याख्या**

ह्या पॉलिसीच्या उद्देशांसाठी, या संदर्भात अन्यथा आवश्यक असल्याचा अपवाद वगळून, यातील शब्दप्रयोगांना डायरेक्शन्समध्ये तसेच काळा पैसा पांढरा करण्याच्या विरोधातील २००२ च्या कायद्यात व त्यासोबत वाचल्या जाणाऱ्या काळा पैसा पांढरा करण्याच्या विरोधातील (नोंदी ठेवणे) नियम, २००५ मध्ये असलेला अर्थ असेल. उदाहरणादाखल, ह्या पॉलिसीच्या संदर्भात, पुढील शब्दांना त्यांना दिलेला अर्थ असेल (डायरेक्शन्स, हा कायदा आणि नियम यांमधील

तरतुदींच्या अधीन राहून):

i. "आधार नंबर" चा अर्थ असेल त्याला आधार (टार्गेटेड डिलिव्हरी ऑफ फायनान्शिअल अँड अदर सबसिडिज्, बेनिफिट्स अँड सर्व्हिसेस) ॲक्ट, २०१६ (२०१६चा १८) च्या कलम २ मधील पोटकलम (अ) मध्ये दिलेला अर्थ.

ii. "कायदा" आणि "नियम" म्हणजे अनुक्रमे काळा पैसा पांढरा करण्याविरोधातील कायदा, २००२ आणि काळा पैसा पांढरा करण्याविरोधातील (नोंदी ठेवणे) नियम, २००५ व त्यामध्ये केलेल्या सुधारणा होत.

iii. "अधिकृत करणे" म्हणजे आधार अधिकृत करण्याच्या संदर्भात, आधार (टार्गेटेड डिलिव्हरी ऑफ फायनान्शिअल अँड अदर सबसिडिज्, बेनिफिट्स अँड सर्व्हिसेस) ॲक्ट, २०१६ (२०१६चा १८) च्या कलम २ मधील पोटकलम (अ) मध्ये व्याख्या दिलेली प्रक्रिया.

iv. लाभार्थी मालक (बीओ):-

क. **ग्राहक जर कंपनी** असेल, तर लाभार्थी मालक हे नैसर्गिक व्यक्ती असते/असतात, जे एकट्याने किंवा संयुक्तपणे काम करून किंवा एका किंवा एकापेक्षा अधिक कायदेशीर व्यक्तींच्या माध्यमातून नियंत्रण ठेवणाऱ्या मालकीसंबंधीचे हितसंबंध असतात किंवा इतर माध्यमातून नियंत्रण ठेवीत असते/असतात.

स्पष्टीकरण - ह्या पोट-कलमासाठी -

१. "नियंत्रण ठेवणारे मालकीसंबंधीचे हितसंबंध" म्हणजे कंपनीच्या भागांची किंवा भांडवलाची किंवा नफ्याची २५ टक्क्यांपेक्षा अधिक मालकी/हक्क.

२. "नियंत्रण" म्हणजे त्यात बहुसंख्य संचालक नियुक्त करण्याचा अधिकार किंवा व्यवस्थापनावर किंवा धोरणात्मक निर्णयांवर नियंत्रण ठेवणे याचा समावेश होतो, ज्यात त्यांच्या भागधारणेमधील प्रभावामुळे किंवा व्यवस्थापनातील अधिकारांमुळे किंवा भागधारकांचे करार किंवा मतदानाची व्यवस्था यांचाही समावेश आहे.

ख. **ग्राहकजर पार्टनरशिप फर्म असेल**, तर लाभार्थी मालक नैसर्गिक व्यक्ती असते/असतात, जी/जे एकट्याने किंवा एकत्रितरीत्या काम करून किंवा एका किंवा अधिक कायदेशीर व्यक्तीच्या/व्यक्तींच्या माध्यमातून काम करून तिच्याकडे/त्यांच्याकडे भागीदारीच्या १० टक्के भांडवल किंवा नफ्याची मालकी असते/हक्क असतात.

स्पष्टीकरण- या उपकलमाच्या हेतूसाठी, "नियंत्रण/कंट्रोल" मध्ये व्यवस्थापन किंवा धोरणात्मक निर्णयावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार समाविष्ट असेल.

ग. ग्राहक **जर अनइनकॉर्पोरेटेड असोसिएशन किंवा बॉडी ऑफ इंडिव्ह्युज्वल्स असेल**, तर लाभार्थी मालक नैसर्गिक व्यक्ती असते/असतात, जी/जे एकट्याने किंवा एकत्रितपणे काम करून किंवा एका किंवा अधिक कायदेशीर व्यक्तीच्या माध्यमातून काम करून तिच्याकडे/त्यांच्याकडे अनइनकॉर्पोरेटेड असोसिएशनच्या किंवा बॉडी ऑफ इंडिव्ह्युज्वल्सच्या १५ टक्के भांडवल किंवा नफ्याची मालकी असते/हक्क असतात.

स्पष्टीकरण: 'बॉडी ऑफ इंडिव्ह्युज्वल्स' या शब्दप्रयोगामध्ये संस्थांचा (सोसायटीज्) समावेश होतो. जर वरील (क), (ख) किंवा (ग) मध्ये कोणतीही नैसर्गिक व्यक्ती निश्चित केलेली नसेल, तर वरिष्ठ व्यवस्थापकीय कर्मचाऱ्याच्या हुद्द्यावर असलेली संबंधित व्यक्ती ही लाभार्थी मालक असते.

घ. ग्राहक जर **न्यास (ट्रस्ट)** असेल, तर लाभार्थी मालकांना ओळखण्यामध्ये, न्यासाचे निर्माते (ऑथर), विश्वस्त, न्यासात १०% किंवा त्यापेक्षा अधिक हितसंबंध असलेले लाभार्थी आणि नियंत्रणाच्या किंवा मालकीच्या साखळीतून न्यासावर अंतिम परिणामकारक नियंत्रण ठेवणारी अन्य कोणतीही नैसर्गिक व्यक्ती यांचा समावेश होतो.

v. "प्रमाणित प्रत"- कंपनीद्वारे प्रमाणित प्रत प्राप्त करणे म्हणजे जेथे पडताळणी केली जाऊ शकत नाही तेथे आधार क्रमांकाच्या पुराव्याच्या प्रतीची किंवा ग्राहकाने अशा प्रकारे सादर केलेल्या अधिकृत दस्तऐवजाची मूळ प्रतीबरोबरतुलना करणे आणि या कायद्यातील तरतुदीनुसार कंपनीच्या अधिकृत अधिकाऱ्याद्वारे त्याची अशा प्रतीवर नोंद करणे.

मात्र त्यासाठी अशी तरतूद आहे की, परकीय चलन व्यवस्थापन (ठेव) नियमावली, २०१६ मध्ये व्याख्या दिल्यानुसार अनिवासी भारतीयांच्या (एनआरआय) बाबतीत आणि भारतीय मूळ असलेल्या व्यक्ती (पीओआय) पर्यायाने खालीलपैकी कोणाही एकाने प्रमाणित केलेली प्रत प्राप्त केली जाऊ शकते:

• भारतात नोंदणी झालेल्या शेड्युल्ड कमर्शिअल बँकांच्या परदेशातील शाखांचे अधिकृत अधिकारी,

- ज्या परदेशातील बँकांशी भारतीय बँकांचे संबंध आहेत, अशा परदेशातील बँकांच्या शाखा,
- परदेशातील नोटरी पब्लिक,
- न्यायालयाचे दंडाधिकारी,
- न्यायाधीश,
- ज्या देशात अनिवासी ग्राहक राहतात, त्या देशातील इंडियन एंबसी/कॉन्सुलेट जनरल.

vi. "सेंट्रल केवासी रेकॉड्‌र्स रजिस्ट्री" (सीकेवायसीआर) म्हणजे अशी संस्था (एंटिटी) जिची व्याख्या या नियमांमधील नियम २(१) मध्ये दिलेली आहे त्यानुसार ग्राहकाचे केवायसी रेकॉर्ड्स डिजिटल स्वरूपात प्राप्त करणे, साठवणे, सुरक्षित ठेवणे आणि पुन्हा प्राप्त करणे.

vii. **"डेसिग्नेटेड डायरेक्टर"**म्हणजे पीएमएल कायद्याच्या प्रकरण ४ अंतर्गत आणि नियमांच्या अंतर्गत असलेल्या जबाबदाऱ्यांची पूर्तता करण्यासाठी कंपनीने ठरवून दिलेली व्यक्ती आणि ती संचालक मंडळाने अधिकृत केलली व्यवस्थापकीय संचालक किंवा पूर्णवेळ संचालक असली पाहिजे.

स्पष्टीकरण - ह्या पोटकलमासाठी "व्यवस्थापकीय संचालक" आणि "पूर्णवेळ संचालक" या शब्दप्रयोगांचा अर्थ म्हणजे त्यांना कंपनी कायदा, २०१३ मध्ये दिलेला अर्थ होय.

viii. "डिजिटल केवायसी" म्हणजे जेथे ऑफलाईन पडताळणी केली जाऊ शकत नाही, तेथे ग्राहकांचे किंवा अधिकृतरीत्या वैध दस्तऐवजांचे किंवा आधार कार्डच्या पुराव्याचे लाईव्ह फोटो खेचणे व त्यासोबत या कायद्यातील तरतुदींनुसार जेथे कंपनीच्या अधिकृत अधिकाऱ्याकडून अशा प्रकारचे लाईव्ह फोटो घेतले जात आहेत त्या ठिकाणाचे रेखावृत्त व विषुववृत्ताची नोंद करणे.

ix. "डिजिटल सिग्नेचर" म्हणजे इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी कायदा, २००० (२०००चा २१) कलम (२) मधील उप कलम (१) च्या पोटकलम (पी)मध्ये जो अर्थ दिलाय तो होय.

x. "इक्विव्हॅलंट ई-डॉक्युमेंट" म्हणजे प्राधिकरणांनी प्रसृत केलेले दस्तऐवजाच्या समान दर्जाची इलेक्ट्रॉनिक प्रत, जिच्यावर वैध डिजिटल सही असते, ज्यात माहिती तंत्रज्ञान कायदा (डिजिटल लॉकर पुरवून मध्यस्थांद्वारे माहिती जतन करून ठेवणे व स्वत:कडे ठेवणे) नियम, २०१६ मधील नियम ९ अनुसार ग्राहकाच्या डिजिटल लॉकर खात्यासाठी जारी केलेले दस्तऐवज यांचाही समावेश आहे.

xi. "गट/ग्रुप" – या संज्ञेचा अर्थ हा आयकर अधिनियम, १९६१ (१९६१ चा ४३) च्या कलम २८६ च्या उपकलम (९) च्या खंड (ई) मध्ये "गट/ग्रुप" या संज्ञेच्या अर्थासह समान असेल.

xii. "नो युवर क्लायंट (केवायसी) आयडेंटिफायर" म्हणजे सेंट्रल केवायसी रेकॉर्ड्स रजिस्ट्री यांच्याद्वारे ग्राहकाला दिलेला विशिष्ट क्रमांक किंवा संकेतांक होय.

xiii. "नॉन प्रॉफिट ऑर्गनायझेशन" (एनपीओ) म्हणजे कोणतीही संस्था (एंटिटी) किंवा संगठन (ऑर्गनायझेशन) जी आयकर कायदा, 1961 (1961 चा 43) च्या कलम 2 च्या खंड (15) मध्ये संदर्भित धार्मिक किंवा धर्मादाय हेतूंसाठी स्थापित केली गेली आहे आणि ज्यांची नोंदणी संस्था नोंदणी कायदा, १८६० अनुसार किंवा तशाच प्रकारच्या राज्याच्या कायद्यान्वेय झालेली आहे किंवा कंपनी कायदा, २०१३ (२०१३ चा १८) च्या कलम ८ अंतर्गत स्थापन झालेली कंपनी.

xiv. "ऑफिशिअली व्हॅलिड डॉक्युमेंट" (ओव्हीडी) म्हणजे पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसन्स, आधार क्रमांक असल्याचा पुरावा, निवडणूक आयुक्तांनी प्रसृत केलेले मतदार ओळखपत्र, नरेगाने दिलेले जॉब कार्ड, ज्यावर राज्य सरकारच्या अधिकाऱ्याची योग्य प्रकारे सही केलेली असेल आणि नावाचे आणि पत्त्याचे तपशील असलेले नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टरद्वारे प्रस्तुत करण्यात आलेले पत्र.

मात्र यासाठी तरतूद अशी आहे की,

क. ग्राहकाने ओव्हीडी म्हणून जर त्याच्याकडे आधार क्रमांक असल्याचा पुरावा सादर केला, तर त्याने तो भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाने (यूआडी) दिलेल्या स्वरूपात असला पाहिजे.

ख. जर ग्राहकाने सादर केलेल्या ओव्हीडीवर अद्ययावत केलेला पत्ता नसेल, तर पुढील कागदपत्रांना किंवा त्याच्यासमान असलेल्या ई-डॉक्युमेंट्सना फक्त पत्त्याच्या पुराव्याच्या मर्यादित उद्देशासाठी ओव्हीडी समजण्यात येईल:-

i. कोणत्याही सेवाप्रदात्याने दिलेले उपयुक्त सेवांचे (वीज, दूरध्वनी, पोस्ट-पेड मोबाईल फोन, पाईप्ड गॅस, पाणी यांचे बिल) दोन महिन्यांपेक्षा जुने नसलेले बिल;

ii. मालमत्ता किंवा महानगरपालिका कराची पावती;

iii. सरकारी खात्यातील किंवा सार्वजनिक क्षेत्रातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पेन्शन किंवा फॅमिली पेन्शन ऑर्डर्स (पीपीओज्), त्यांच्यावर पत्ता असेल तर;

iv. राज्य सरकारच्या किंवा केंद्र सरकारच्या खात्यांनी, वैधानिक किंवा नियामक संस्था, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, शेड्युल्ड कमर्शिअल बँका, वित्तीय संस्था आणि सूचीकृत कंपन्या दिलेले निवासाच्या व्यवस्थेचे पत्र व अशा नियोक्त्यांबरोबर केलेला अधिकृत निवासव्यवस्थेसाठीचा लीव्ह अँड लायसन्स करार;

ग. ग्राहकाने वरील 'ख'मध्ये नमूद केलेली कागदपत्रे सादर केल्यानंतर, सध्याचा पत्ता असलेले ओव्हीडी तीन महिन्यांच्या कालावधीत सादर केले पाहिजे.

घ. जर परदेशातील नागरिकाने सादर केलेल्या ओव्हीडीमध्ये पत्त्याचे तपशील नसतील, तर अशा बाबतीत परदेशातील कार्यक्षेत्र असलेल्या सरकारी खात्यांनी दिलेले दस्तऐवज आणि परदेशातील दूतावासाने किंवा मिशन इन इंडियाने दिलेले पत्र पत्त्याचा पुरावा म्हणून स्वीकारले जाईल.

स्पष्टीकरण: ह्या पोटकलमासाठी, ओव्हीडी प्रसृत केल्यानंतर जरी नावात बदल झालेला असेल आणि त्यासाठी राज्य सरकारने प्रसृत केलेले विवाह प्रमाणपत्र किंवा राजपत्र अधिसूचना जोडलेली असेल, ज्यात अशा नावातील बदल दर्शविलेला असेल, तर असा दस्तऐवजसुद्धा ओव्हीडी समजला जाईल.

xv. ऑफलाईन व्हेरिफिकेशन" या शब्दाला तोच अर्थ असेल, जो आधार (टार्गेटेड डिलिव्हरी ऑफ फायनान्शिअल अँड अदर सबसिडिज्, बेनिफिट्स अँड सर्व्हिसेस) ॲक्ट, २०१६ (२०१६चा १८) च्या कलम २ मधील पोटकलम (अ) मध्ये दिलेला आहे.

xvi. "व्यक्ती" ह्या शब्दाला कायद्यात जो अर्थ दिलाय तोच असेल आणि त्यात समाविष्ट असतील:

क. व्यक्ती,

ख. अविभक्त हिंदू कुटुंब,

ग. कंपनी,

घ. फर्म,

ङ. नोंदणी झालेली किंवा न झालेली असोसिएशन ऑफ पर्सन्स किंवा बॉडी ऑफ इंडिव्ह्युज्वल्स,

च. प्रत्येक कृत्रिम न्यायिक व्यक्ती, जी उपरोक्त (क ते ङ मध्ये) मध्ये येत नाही आणि,

छ. वरीलपैकी कोणत्याही व्यक्तीच्या (क ते च) मालकीची व तिच्याद्वारे नियंत्रण केली जात असलेली कोणतीही एजन्सी, कार्यालय किंवा शाखा.

xvii. "प्रिन्सिपल ऑफिसर" म्हणजे कंपनीने नामनिर्देशित केलेला व्यवस्थापन स्तरावरील अधिकारी जो या नियमांमधील नियम ८ अनुसार माहिती देण्यासाठी जबाबदार असेल.

xviii. "सस्पिशिअस ट्रँझॅक्शन - संशयास्पद व्यवहार" म्हणजे खाली व्याख्या दिल्यानुसार, सद्भावनेने कृती करणाऱ्या व्यक्तीशी केलेले "ट्रँझॅक्शन", ज्यात ट्रँझॅक्शन करण्याचा प्रयत्न करण्याचाही समावेश आहे, मग रोख रकमेच्या स्वरूपात असो वा नसो:

क. त्यातून पुरेशा प्रमाणात असा संशय निर्माण होतो की, तो किती रकमेसाठी आहे, ह्याचा विचार न करता त्यात या कायद्यातील परिशिष्टात नमूद केलेला गुन्हा दिसून येतो; किंवा

ख. असाधारण आणि ज्याचे समर्थन करता येणार नाही अशा गुंतागुंतीच्या परिस्थितीत तो केला गेलाय; किंवा

ग. त्यात आर्थिक सारासार विचार किंवा सद्हेतू दिसून येत नसेल; किंवा

घ. त्यातून पुरेशा प्रमाणात असा संशय निर्माण होतो की, त्यात दहशतवादाला अर्थपुरवठा करण्याच्या कृतींचा समावेश आहे.

स्पष्टीकरण: ज्या व्यवहारात दहशतवादाशी संबंधित कृतींना अर्थपुरवठा केला जातो त्यात दहशतवाद्यांनी, दहशतवादी संघटनांनी किंवा जे दहशतवादाला पैसे पुरवतात किंवा दहशतवाद्यांना पैसे पुरवण्याचा प्रयत्न करतात अशांशी जोडलेला किंवा संबंधित निधीचा समावेश असतो.

xix. "स्मॉल अकाऊंट" म्हणजे बचत खाते जे पीएमएल नियम, २००५ मधील उप-नियम (५) मध्ये म्हटल्यानुसार उघडलेले आहे. स्मॉल अकाऊंटच्या प्रचालनाबद्दलचे तपशील आणि अशा अकाऊंटसाठी कोणी नियंत्रण ठेवायचे यांसंबंधी आरबीआय मास्टर डायरेक्शन्सच्या कलम २३ मध्ये नमूद केलेले आहे.

xx. "ट्रँझॅक्शन" म्हणजे खरेदी, विक्री, कर्ज, गहाण, दान, हस्तांतरण, डिलिव्हरी किंवा त्यासाठी केलेली व्यवस्था व त्यामध्ये यांचा समावेश असतो:

क. खाते उघडणे;

ख. कोणत्याही चलनात रोख रकमेद्वारे किंवा धनादेशाद्वारे, पेमेंट ऑर्डर किंवा इतर इन्स्ट्रुमेंट्स किंवा इलेक्ट्रॉनिक किंवा इतर बिगर-भौतिक साधनांनी निधी ठेवणे, काढणे, बदलणे किंवा हस्तांतरित करणे.

ग. सेफ्टी डिपॉझिट बॉक्सचा किंवा इतर कोणत्याही सुरक्षित ठेवीचा वापर;

घ. कोणतेही विश्वासू (फिड्युसिअरी) संबंध प्रस्थापित करणे

ङ. कोणत्याही कंत्राटामुळे किंवा इतर कायदेशीर दायित्वामुळे पूर्णत: किंवा काही अंशी प्राप्त झालेले कोणतेही पेमेंट;

च. कायदेशीर व्यक्ती किंवा कायदेशीर व्यवस्था स्थापन करणे किंवा निर्माण करणे:

केवायसीच्या मास्टर डायरेक्शन्समध्ये असलेल्या शब्दांचा अर्थ, जर तो त्यासंदर्भात अन्यथा आवश्यक असल्याचा अपवाद वगळून, त्यांना खाली दिल्यानुसार असेल:

i. **"कॉमन रिपोर्टिंग स्टँडर्ड्स" (सीआरएस)** म्हणजे कन्व्हेन्शन ऑन म्युच्युअल ॲडमिनिस्ट्रेटिव्ह असिस्टन्स इन टॅक्स मॅटर्सच्या कलम ६ वर आधारित माहितीची देवाणघेवाण आपोआप करण्यासाठी सही करण्यात आलेल्या बहुपक्षीय कराराची अंमलबजावणी करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या रिपोर्टिंग स्टँडर्ड्स.

ii. **"करस्पॉन्डंट बँकिंग"** करस्पॉन्डंट बँकिंग म्हणजे एका बँकेने ("करस्पॉन्डंट बँक") दुसऱ्या बँकेला ("रिस्पॉन्डंट बँक") बँकिंग सेवा पुरविणे. रिस्पॉन्डंट बँकांना रोख व्यवस्थापन (उदा. विविध चलनांमधील व्याजदेणारी खाती), आंतरराष्ट्रीय वायर ट्रान्सफर, चेक क्लिअरिंग, पेयेबल-थ्रू अकाऊंट आणि परकीय चलन सेवा यासह विविध सेवा प्रदान केल्या जाऊ शकतात.

iii. **"कस्टमर - ग्राहक"** म्हणजे अशी व्यक्ती जी कंपनीसोबत आर्थिक व्यवहार किंवा कृती करते ती व्यक्ती आणि त्यात जिच्या वतीने अशी व्यक्ती असे व्यवहार करते किंवा कृती करते तिचाही समावेश होतो.

iv. **"वॉक-इन कस्टमर"** म्हणजे अशी व्यक्ती जिचा कंपनीशी खात्यावर आधारित संबंध नाहीए, पण कंपनीसोबत ती व्यवहार करते.

v. **"कस्टमर ड्यू डिलिजन्स"** म्हणजे ओळखीचे विश्वसनीय आणि स्वतंत्र स्त्रोत वापरुन ग्राहकाला आणि लाभार्थी मालकाला ओळखणे आणि त्यांची पडताळणी करणे.

स्पष्टीकरण – खाते-आधारित संबंध सुरू करताना किंवा अधूनमधून पन्नास हजार रुपयांइतके किंवा त्यापेक्षा जास्त रकमेचे

व्यवहार करताना, मग ते एकच व्यवहार म्हणून केले गेले असो किंवा जोडलेले दिसणारे अनेक व्यवहार असोत किंवा कोणतेही आंतरराष्ट्रीय मनी ट्रान्सफर ऑपरेशन असो, सीडीडीमध्ये हे समाविष्ट असेल:

क. ग्राहकाची ओळख, ओळखीच्या विश्वसनीय आणि स्वतंत्र स्त्रोतांचा वापर करून त्यांच्या ओळखीची पडताळणी करणे, व्यवसाय संबंधाचा उद्देश आणि इच्छित स्वरूपाबद्दल माहिती मिळविणे, जेथे लागू असेल तेथे;

ख. ग्राहकाच्या व्यवसायाचे स्वरूप आणि त्याची मालकी आणि नियंत्रण समजून घेण्यासाठी वाजवी पावले उचलणे;

ग. ग्राहक लाभधारक मालकाच्या वतीने कार्य करीत आहे की नाही हे निश्चित करणे आणि लाभधारक मालकाची ओळख पटविणे आणि ओळखीच्या विश्वासार्ह आणि स्वतंत्र स्त्रोतांचा वापर करून लाभधारक मालकाची ओळख पडताळण्यासाठी सर्व पावले उचलणे.

vi. "कस्टमर आयडेंटिफिकेशन" म्हणजे सीडीडीची प्रक्रिया हाती घेणे.

vii. "एफएटीसीए" म्हणजे युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिकाचा (यूएसए) फॉरिन अकाऊंट टॅक्स कंप्लायन्स ॲक्ट, ज्यासाठी इतर बाबींबरोबरच परदेशातील वित्तीय संस्थांमध्ये अमेरिकन करदात्यांनी किंवा ज्या परदेशातील संस्थांमध्ये अमेरिकन करदात्यांचा मोठ्या प्रमाणावर मालकीहक्क हितसंबंध असतो त्यांनी धारण केलेल्या आर्थिक खात्यांची माहिती देण्याची आवश्यकता असते.

viii. "आयजीए" म्हणजे इंटर गव्हर्नमेंटल ॲग्रीमेंट्स, जे आंतरराष्ट्रीय कराचे अनुपालन करण्यासाठी आणि अमेरिकेच्या एफएटीसीएची अंमलबजावणी करण्यासाठी भारत सरकार आणि अमेरिका यांच्यामध्ये केले जातात.

ix. "केवायसी टेंप्लेट्स" म्हणजे सीकेवायसीआरला व्यक्तींचा आणि कायद्याने अस्तित्वात आलेल्या संस्थांचा डेटा पडताळून पाहण्यासाठी आणि माहिती देण्यासाठी सुविधाजनक व्हावे म्हणून तयार करण्यात आलेल्या टेंप्लेट्स.

x. 'समोरासमोर न येणारे (नॉन-फेस-टू-फेस) ग्राहक' म्हणजे कंपनीच्या शाखा कार्यालयाला भेट न देता किंवा कंपनीच्या कर्मचाऱ्यांना न भेटता खाते उघडणारे ग्राहक.

xi. "ऑन-गोईंग ड्यू डिलिजन्स" म्हणजे कर्जखात्यातील व्यवहारांवर नियमितपणे देखरेख ठेवणे, ज्यायोगे ती ग्राहकांविषयी कंपनीचे ज्ञानाशी, ग्राहकाच्या व्यवसाय आणि जोखीम प्रोफाईलशी आणि निधीच्या/संपत्तीच्या स्त्रोतांशी सुसंगत असतील.

xii. "पेयेबल-थ्रू अकाऊंट" पेयेबल-थ्रू अकाऊंट ही संज्ञा करस्पॉन्डंट खात्यांना संदर्भित करते जे तृतीय पक्षांद्वारे त्यांच्या स्वत: च्या वतीने व्यवसाय व्यवहार करण्यासाठी थेट वापरले जातात.

xiii. "पिरिऑडिक अपडेशन" म्हणजे रिझर्व्ह बँकेने निर्धारित केलेल्या ठरावीक कालावधीनंतर विद्यमान नोंदींचे पुनरावलोकन करून, सीडीडी प्रक्रियेच्या अंतर्गत गोळा केलेले दस्तऐवज, डेटा किंवा माहिती अद्ययावत व संबंधित ठेवण्यासाठी उचललेली पावले.

xiv. "नियमित संस्था" (आरईज्) म्हणजे:-

क. सर्व अनुसूचित व्यावसायिक बँका (एससीबी)/ प्रादेशिक ग्रामीण बँका (आरआरबी)/ स्थानिक क्षेत्र बँका (एलएबी)/ सर्व प्राथमिक (शहरी) सहकारी बँका (यूसीबी) / राज्य आणि केंद्रीय सहकारी बँका (एसटीसीबी / सीसीबी) आणि बँकिंग नियमन कायदा, 1949 च्या कलम 22 अंतर्गत परवाना मिळालेली इतर कोणतीही संस्था, ज्याला समूह म्हणून 'बँका' म्हणून संबोधले जाईल.

ख. अखिल भारतीय वित्तीय संस्था (एआयएफआय)

ग. सर्व बिगर-बँकिंग वित्तीय कंपन्या (एनबीएफसी), विविध बिगर-बँकिंग कंपन्या (एमएनबीसी) आणि अवशिष्ट बिगर-बँकिंग कंपन्या (आरएनबीसी).

घ. मालमत्ता पुनर्रचना कंपन्या (एआरसी)

ङ. सर्व पेमेंट सिस्टम प्रदाता (पीएसपी)/ सिस्टम पार्टिसीपंट(एसपी) आणि प्रीपेड पेमेंट इन्स्ट्रुमेंट जारीकर्ते (पीपीआय जारीकर्ते)

च. नियामकाद्वारे नियमन केलेल्या मनी ट्रान्सफर सर्व्हिस स्कीम (एमटीएसएस) चे एजंट असलेल्यांसह सर्व अधिकृत व्यक्ती (एपी).

ही कंपनी नॅशनल हाऊसिंग बँकेत नोंदणीकृत आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाद्वारे नियंत्रित केलेली हाउसिंग फायनान्स कंपनी असल्याने एक नियमन केलेली संस्था मानली जाते.

xv. "शेल बँक" म्हणजे ज्या देशात ती संस्थापित आणि परवानाकृत आहे त्या देशात कोणतीही भौतिक उपस्थिती नसलेली बँक आणि जी प्रभावी एकत्रित पर्यवेक्षणाच्या अधीन असलेल्या विनियमित आर्थिक गटाशी संबंधित नाही. भौतिक उपस्थिती म्हणजे देशामध्ये स्थित अर्थपूर्ण व्यक्ती आणि व्यवस्थापन. स्थानिक एजंट किंवा निम्न-स्तरीय कर्मचाऱ्यांचे अस्तित्व म्हणजे भौतिक उपस्थिती नाही.

xvi. "व्हिडिओ आधारित ग्राहक ओळख प्रक्रिया" (व्हि-सीआयपी) : म्हणजे सीडीडी उद्देशासाठी आवश्यक असलेली ओळख माहिती मिळवण्यासाठी आणि स्वतंत्र पडताळणीद्वारे ग्राहकाने दिलेल्या माहितीची सत्यता पडताळून पाहण्यासाठी आणि प्रक्रियेचे ऑडिट ट्रेल राखून ग्राहकासोबत अखंड, सुरक्षित, थेट माहितीपूर्ण-संमती आधारित ऑडिओ-व्हिज्युअल परस्परसंवाद करून आरईच्या अधिकृत अधिकाऱ्याने चेहऱ्यावरील ओळख आणि ग्राहकांच्या योग्य परिश्रमासह ग्राहक ओळखण्याची पर्यायी पद्धत. विहित मानकांचे आणि कार्यपद्धतींचे पालन करणाऱ्या अशा प्रक्रिया मास्टर डायरेक्शनच्या उद्देशाने समोरासमोर/फेसटूफेस सीआयपीच्या बरोबरीने हाताळल्या जातील.

xvii. वायर ट्रान्सफर संबंधित व्याखा खाली दिल्या आहेत-

क. बॅच ट्रान्सफर: बॅच ट्रान्सफर म्हणजे अनेक वैयक्तिक वायर ट्रान्सफरचा समावेश असलेले हस्तांतरण/ट्रान्सफर आहे जे एकाच वित्तीय संस्थांना पाठवले जात आहेत परंतु अंतिमत: भिन्न व्यक्तींसाठी अभिप्रेत असू शकते / असू शकत नाहीत.

ख. लाभार्थी : लाभार्थी म्हणजे नैसर्गिक किंवा कायदेशीर व्यक्ती किंवा कायदेशीर व्यवस्था ज्याला / जी विनंती केलेल्या वायर ट्रान्सफरचा प्राप्तकर्ता म्हणून प्रवर्तकाद्वारे ओळखली जाते.

ग. लाभार्थी आरई: हे आरबीआयद्वारे विनियमित वित्तीय संस्थेस संदर्भित करते, जे ऑर्डरिंग वित्तीय संस्थेकडून थेट किंवा मध्यस्थ आरईद्वारे वायर ट्रान्सफर प्राप्त करते आणि लाभार्थ्यास निधी उपलब्ध करून देते.

घ. कव्हर पेमेंट: कव्हर पेमेंट म्हणजे वायर ट्रान्सफर जे ऑर्डरिंग वित्तीय संस्थेने लाभार्थी वित्तीय संस्थेला थेट पाठविलेल्या पेमेंट संदेशाला ऑर्डरिंग वित्तीय संस्थेकडून लाभार्थी वित्तीय संस्थेकडे एक किंवा अधिक मध्यस्थ वित्तीय संस्थांद्वारे निधी निर्देश (कव्हर) च्या राऊटिंगसह जोडते.

ङ. क्रॉस-बॉर्डर वायर ट्रान्सफर: क्रॉस-बॉर्डर वायर ट्रान्सफर म्हणजे कोणतीही वायर ट्रान्सफर जिथे ऑर्डर देणारी वित्तीय संस्था आणि लाभार्थी वित्तीय संस्था वेगवेगळया देशांमध्ये स्थित आहेत. ही संज्ञा वायर ट्रान्सफरच्या कोणत्याही साखळीचा संदर्भ देते ज्यामध्ये सामील असलेल्या वित्तीय संस्थांपैकी कमीतकमी एक वेगळया देशात स्थित आहे.

च. डोमेस्टिक वायर ट्रान्सफर: डोमेस्टिक वायर ट्रान्सफर म्हणजे कोणतीही वायर ट्रान्सफर जिथे ऑर्डर देणारी वित्तीय संस्था आणि लाभार्थी वित्तीय संस्था भारतात स्थित आहेत. म्हणूनच, ही संज्ञा वायर ट्रान्सफरच्या कोणत्याही साखळीचा संदर्भ देते जी पूर्णपणे भारताच्या सीमेच्या आत होते, जरी पेमेंट संदेश ट्रान्सफर करण्यासाठी वापरली जाणारी प्रणाली दुसऱ्या देशात स्थित असली तरी.

छ. वित्तीय संस्था : वायर-ट्रान्सफर सूचनांच्या संदर्भात 'वित्तीय संस्था' या शब्दाचा अर्थ एफएटीएफच्या शिफारशींमध्ये वेळोवेळी सुधारित केल्याप्रमाणे आहे.

ज. मध्यस्थ आरई: मध्यस्थ आरई म्हणजे आरबीआयद्वारे विनियमित वित्तीय संस्था किंवा इतर कोणतीही संस्था, जी वायर ट्रान्सफरचा मध्यस्थ घटक हाताळते, सिरियल किंवा कव्हर पेमेंट साखळीमध्ये आणि जी ऑर्डर देणारी वित्तीय संस्था आणि लाभार्थी वित्तीय संस्था किंवा इतर मध्यस्थ वित्तीय संस्थेच्या वतीने वायर ट्रान्सफर प्राप्त करते आणि प्रसारित करते.

झ. ऑर्डरिंग आरई : ऑर्डरिंग आरई म्हणजे आरबीआयद्वारे विनियमित वित्तीय संस्था, जी वायर ट्रान्सफर सुरू करते आणि प्रवर्तकाच्या वतीने वायर ट्रान्सफरची विनंती प्राप्त झाल्यानंतर निधी हस्तांतरित करते.

ञ. प्रवर्तक : प्रवर्तक म्हणजे त्याच्या खात्यातून वायर ट्रान्स्फरची परवानगी देणारा खातेधारक किंवा जिथे कोणतेही खाते नाही, तेथे वायर ट्रान्सफर करण्यासाठी आदेश देणाऱ्या वित्तीय संस्थेकडे ऑर्डर देणारी नैसर्गिक किंवा कायदेशीर व्यक्ती.

ट. सिरियल पेमेंट: सीरियल पेमेंट म्हणजे पेमेंटची थेट क्रमिक साखळी जिथे वायर ट्रान्सफर आणि त्यासोबतचा पेमेंट मेसेज ऑर्डरिंग फायनान्शियल इन्स्टिट्यूटकडून थेट किंवा एक किंवा अधिक मध्यस्थ वित्तीय संस्थांमार्फत (उदा. करस्पॉन्डंट बँका) लाभार्थी वित्तीय संस्थेकडे एकत्र प्रवास करतो.

ठ. स्ट्रेट-थ्रू प्रोसेसिंग: स्ट्रेट-थ्रू प्रोसेसिंग म्हणजे मानवी हस्तक्षेपाची आवश्यकता नसताना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने केले जाणारे पेमेंट व्यवहार.

ड. युनिक ट्रान्झॅक्शन रेफरन्स नंबर: युनिक ट्रान्झॅक्शन रेफरन्स नंबर म्हणजे वायर ट्रान्सफरसाठी वापरल्या जाणाऱ्या पेमेंट अँड सेटलमेंट सिस्टीम किंवा मेसेजिंग सिस्टीमच्या प्रोटोकॉलनुसार पेमेंट सर्व्हिस प्रोव्हायडरने निश्चित केलेली अक्षरे, संख्या किंवा चिन्हांचे संयोजन.

ढ. वायर ट्रान्सफर : वायर ट्रान्सफर म्हणजे प्रवर्तक आणि लाभार्थी एकच व्यक्ती आहे किंवा नाही याला लक्षात न घेता लाभार्थी वित्तीय संस्थेत लाभार्थ्याला निधीची रक्कम उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने वित्तीय संस्थेमार्फत वित्तीय संस्थेमार्फत केलेला कोणताही व्यवहार होय.

इतर सर्व शब्दप्रयोग, इथे त्यांची वेगळी व्याख्या दिली नसेल, तर त्यांना बँकिंग रेग्युलेशन अ‍ॅक्ट, १९४९, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया अ‍ॅक्ट, १९३५, प्रिव्हेन्शन ऑफ मनी लाँडरिंग अ‍ॅक्ट, २००२, प्रिव्हेन्शन ऑफ मनी लाँडरिंग (मेंटेनन्स ऑफ रेकॉर्ड्स) रूल्स, २००५, आधार (टार्गेटेड डिलिव्हरी ऑफ फायनान्शिअल अँड अदर सबसिडिज्, बेनिफिट्स अँड सर्व्हिसेस) अ‍ॅक्ट, २०१६ आणि त्याअंतर्गत करण्यात आलेली नियमावली, त्यात केलेली कोणतीही वैधानिक सुधारणा किंवा पुन्हा करण्यात आलेले कायदे किंवा व्यावसायिक विश्वात जसा वापर होतो, त्यानुसार अर्थ असेल.

## प्रकरण-2

## सर्वसाधारण

४. क. ह्या पॉलिसीला, तिच्याच केलेल्या कोणत्याही सुधारणा आणि दुरुस्त्यांसह कंपनीच्या संचालक मंडळाकडून किंवा जिला अधिकार देण्यात आलेले आहेत अशी संचालक मंडळाची कोणती तरी समितीद्वारे मान्यता दिली जाईल.

ख. ही पॉलिसी कंपनीच्या पूर्ण मालकीच्या उपकंपनीलाही लागू असेल आणि मनी लॉन्ड्रिंग प्रतिबंधक कायदा, 2002 (2003 चा 15) च्या प्रकरण 4 मधील तरतुदींनुसार जबाबदाऱ्या पार पाडण्याच्या उद्देशाने अंमलात आणली जाते. त्यानुसार, गटाचा भाग असलेली प्रत्येक कंपनी मनी लॉन्ड्रिंग आणि टेरर फायनान्सिंग विरोधात गट-व्यापी कार्यक्रम राबवेल, ज्यात क्लायंट ड्यू डिलिजन आणि मनी लॉन्ड्रिंग आणि टेरर फायनान्स जोखीम व्यवस्थापनाच्या उद्देशाने आवश्यक माहिती सामायिक करण्यासाठी गट-व्यापी धोरणांचा समावेश असेल आणि अशा कार्यक्रमांमध्ये देवाणघेवाण केलेल्या माहितीची गोपनीयता आणि वापराबद्दल पुरेसे संरक्षण समाविष्ट असेल, गट कंपनीला लागू असलेल्या टिपिंग-ऑफ टाळण्यासाठी सुरक्षा उपायांचा समावेश आहे.

(ग) या पॉलिसीचा उद्देश पीएमएल कायदा / नियमांचे पालन सुनिश्चित करणे आहे, ज्यात यासंदर्भातील नियामक सूचनांचा समावेश आहे आणि मनी लॉन्ड्रिंग, दहशतवादी वित्तपुरवठा, प्रसार वित्तपुरवठा आणि इतर संबंधित जोखमींपासून उद्भवणार्या धोक्यांपासून संरक्षण प्रदान करते.

**५. या पॉलिसीत पुढील चार महत्त्वाचे घटक असतील:**

(क) ग्राहक स्वीकारण्याचे धोरण;

(ख) जोखीम संवर्गीकरण आणि व्यवस्थापन;

(ग) ग्राहक ओळख कार्यप्रणाली (सीआयपी); आणि

(घ) ट्रँझॅक्शनवर देखरेख करणे.

**५.क) काळा पैसा पांढरा करण्याषियीच्या आणि दहशतवाद्यांना अर्थपुरवठा करण्याच्या जोखमीचे कंपनीद्वारे मूल्यमापन**

(क) ग्राहकांसाठी, देशांसाठी किंवा भौगोलिक प्रदेशांसाठी, उत्पादनांसाठ, सेवांसाठी, ट्रँझॅक्शन्ससाठी किंवा डिलिव्हरी चॅनेल्स, इत्यादींसाठी काळा पैसा पांढरा करण्याची आणि दहशतवाद्यांना अर्थपुरवठा करण्याची जोखीम ओळखण्यासाठी, तिचे मूल्यमापन करण्यासाठी आणि दूर करण्यासाठी परिणामकारक पावले उचलण्याकरिता कंपनी मनी लाँडरिंग (एमएल) आणि टेररिस्ट फायनान्सिंग (टीएफ) रिस्क असेसमेंटची कृती ठरावीक कालावधीनंतर करील.

मूल्यमापनाच्या ह्या प्रक्रियेत एकूणच जोखमीची पातळी निश्चित करण्यापूर्वी जोखमीशी संबंधित सर्व संबंधित घटक विचारात घेतले जातील आणि त्या दूर करण्यासाठी योग्य पातळी आणि प्रकार वापरले जातील. अंतर्गत जोखीम मूल्यमापन तयार करताना, नियामक/पर्यवेक्षक कंपनीला ज्यांची माहिती, काही असलीच तर वेळोवेळी देतील त्यावर कंपनी एकूणच विशिष्ट क्षेत्राशी संबंधित बळी पडण्याची शक्यता, काही असलीच, तर ती विचारात घेईल.

(ख) कंपनीने केलेल्या जोखमीच्या मूल्यमापनाचे योग्य प्रकारे दस्तऐवजीकरण केले जाईल आणि ते स्वरूप, आकार, भौगोलिक अस्तित्व, कृती/रचना, इत्यादींच्या गुंतागुंती यांच्या प्रमाणात असेल. त्यानंतर, जोखमींच्या मूल्यमापनाची आवर्तिता (पिरिऑडिसिटी), जोखमींचे मूल्यमापन करतानाचे जे निष्कर्ष निघतील त्यांच्यानुसार कंपनीच्या संचालक मंडळाद्वारे किंवा कंपनीच्या संचालक मंडळाची कोणतीही समिती, जिला यासंदर्भातील अधिकार देण्यात आले आहेत तिच्याद्वारे, ठरविली जाईल. परंतु त्यांचे पुनरावलोकन किमान एका वर्षातून केले गेले पाहिजे. उच्च जोखीम असलेले ग्राहक काही असतीलच, तर त्यांच्या बाबतीत जोखमीचे मूल्यमापन करण्याचे काम सहामाही तत्त्वावर केले जाईल.

(ग) या कृतीचा निष्कर्ष संचालक मंडळाकडे किंवा जिला असे अधिकार दिलेले असतील अशा कोणत्याही समितीसमोर सादर केले जातील आणि ते सक्षम प्राधिकरणांना आणि स्वयंनियमन करणाऱ्या संस्थांना उपलब्ध असतील.

**५. ख)** निश्चित ओळख पटलेल्या जोखमी दूर करण्यासाठी व त्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी कंपनी रिस्क बेस्ड ॲप्रोच(आरबीए) वापरात आणील व त्यानुसार याबाबतीत संचालक मंडळाने मान्यता दिलेली धोरणे, नियंत्रणे व कार्यप्रणाली असतील. कंपनी ओळखलेल्या एमएल / टीएफ जोखीम आणि व्यवसायाच्या आकाराचा विचार करून सीडीडी कार्यक्रम लागू करेल. त्यानंतर, कंपनी नियंत्रणांची अंमलबजावणी करण्यावर देखरेख ठेवील आणि आवश्यकता असल्यास त्यात वाढ करील.

**६. डेसिग्नेटेड डायरेक्टर - खास नेमणूक केलेले संचालक**

(क) "डेसिग्नेटेड डायरेक्टर" म्हणजे पीएमएल कायद्याच्या प्रकरण ४ अंतर्गत आणि नियमांच्या अंतर्गत असलेल्या जबाबदाऱ्यांची पूर्तता करण्यासाठी कंपनीने ठरवून दिलेली व्यक्ती आणि ती संचालक मंडळाने नामनिर्देशित केलेली असली पाहिजे. कंपनीने तिचे व्यवस्थापकीय संचालक / मुख्य कार्यकारी अधिकारी यांना "डेसिग्नेटेड डायरेक्टर" म्हणून ह्या पॉलिसीअंतर्गत नामनिर्देशित केलेले आहे आणि त्याविषयी एनएचबी/आरबीआय व एफआययू-आयएनडी यांना कळविलेले आहे.

(ख) डेसिग्नेटेड डायरेक्टरचे नाव,पत्ता आणि संपर्क तपशील, पूर्वी सादर केलेल्या माहितीत काही बदल झाल्यास त्यांच्यासहएनएचबी/आरबीआय व एफआययू-आयएनडी यांना कळविले जाईल.

(ग) कोणत्याही परिस्थितीत मुख्य अधिकाऱ्यांना ‘डेसिग्नेटेड डायरेक्टर’ म्हणून नामनिर्देशित केले जाणार नाही.

**७. मुख्य अधिकारी**

(क) कंपनी “मुख्य अधिकाऱ्यांची” नियुक्ती करील (शक्यतो जनरल मॅनेजरच्या पातळीवरील किंवा कंपनीच्या सीएमडी/एमडीच्या खालच्या लगेचचा अधिकारी). कंपनीने ह्या पॉलिसीअंतर्गत कंपनी सेक्रेटरींना कंपनीचे मुख्य अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे आणि त्याविषयी एनएचबी/आरबीआय व एफआययू-आयएनडी यांना कळविलेले आहे.

(ख) मुख्य अधिकारी हे अनुपालन करण्यासाठी, ट्रॅंझॅक्शन्सवर देखरेख करण्यासाठी आणि या कायद्यांतर्गत/नियमावलीअंतर्गत आवश्यक असलेली माहिती देण्यासाठी व कळविण्यासाठी जबाबदार असतील.

(ग) मुख्य अधिकाऱ्यांचे नाव, पत्ता आणि संपर्क तपशील, पूर्वी सादर केलेल्या माहितीत काही बदल झाल्यास त्यांच्यासह एनएचबी/आरबीआय व एफआययू-आयएनडी यांना कळविले जाईल.

**८. पॉलिसीचे अनुपालन / धोरणाची अंमलबजावणी**

(क) कंपनी ह्या पॉलिसीचे अनुपालन पुढील माध्यमातून करील:

(i) केवायसीचे अनुपालन करण्यासाठी ‘वरिष्ठ व्यवस्थापनात’ कोणकोण असेल हे नमूद करील.

(ii) धोरणांची (पॉलिसी) आणि कार्यप्रणालीची परिणामकाराक अंमलबजावणी करण्यासाठी जबाबदारीचे वाटप.

(iii) कंपनीच्या धोरणांच्या आणि कार्यप्रणालींच्या व त्यासोबत कायदेशीर व नियामक आवश्यकतांच्या अनुपालनाच्या कार्याचे स्वतंत्रपणे मूल्यमापन.

(iv) केवायसी/एएमएल धोरणांच्या व कार्यप्रणालींच्या अनुपालनाची पडताळणी करण्यासाठी एकसंपाती/अंतर्गत लेखापरीक्षण.

(v) लेखी समितीला तिमाही लेखा टिप्पण्या व अनुपालन सादर करणे.

(ख) कंपनी अशी खातरजमा करील की, केवायसी मापदंडांचे अनुपालन निश्चित करण्यासाठी निर्णय घेण्याचे काम बाहेरच्या व्यक्तींना देण्यात येणार नाही (आऊटसोर्स केले जाणार नाही).

(टीप: कंपनीच्या (आधार हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) संदर्भात वरिष्ठ व्यवस्थापन म्हणजे कंपनीचे पूर्णवेळ संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी.)

## प्रकरण - ३

## <u>ग्राहकस्वीकार धोरण</u>

९. कंपनीच्या क्रेडिट पॉलिसीच्या रूपाने कंपनीने ग्राहकस्वीकार धोरण तयार केलेले आहे.

१०. ग्राहकस्वीकार धोरणात जे सर्वसाधारण पैलू असतील त्यांना बाधा येऊ न देता, एएचएफएल अशी खातरजमा करील की:

(क) कोणत्याही ग्राहकाचा स्वीकार किंवा कर्जखाते उघडणे हे निनावी किंवा काल्पनिक/बेनामी नावाने उघडले जाणार नाही.

(ख) ग्राहकाच्या असहकार्यामुळे किंवा ग्राहकाने सादर केलेले दस्तऐवज/माहिती विश्वासार्ह नसतील, तर जर एएचएफएलला योग्य त्या सीडीडी उपाययोजना लागू करता आल्या नाहीत, तर कोणत्याही ग्राहकाचा स्वीकार केला जाणार नाही किंवा कर्जखाते उघडले जाणार नाही. ग्राहकाच्या संदर्भात संबंधित सीडीडी उपायांचे पालन करण्यास असमर्थ असल्यास आवश्यक असल्यास कंपनी एसटीआर दाखल करण्याचा विचार करेल.

(ग) सीडीडी कार्यप्रणाली पूर्ण केल्याशिवाय कोणतेही ट्रँझॅक्शन किंवा कर्जखात्यावर आधारित संबंध प्रस्थापित करण्यात येणार नाहीत.

(घ) कर्जखाते उघडताना आणि ठरावीक कालावधीनंतर त्याचे अद्यतन करताना केवासीसाठी प्राप्त करावयाची अनिवार्य माहिती निर्धारित केली जाईल.

(ङ) कर्जखाते उघडल्यानंतर क्रेडिट पॉलिसीनुसार ग्राहकाच्या स्पष्ट संमतीसह 'ऐच्छिक'/अतिरिक्त माहिती प्राप्त केली जाईल.

(च) कंपनी शाखास्तरावर/यूसीआयसीस्तरावर सीडीडी पॉलिसी लागू करील. अशा प्रकारे, केवायसीची पूर्तता केलेल्या कंपनीच्या एखाद्या ग्राहकाला जर त्याच कंपनीकडून दुसरे कर्ज हवे असेल, तर त्यासाठी पुन्हा नव्याने सीडीडी करण्याची आवश्यकता नसेल.

(छ) सर्व संयुक्त अर्जांसाठी सीडीडी कार्यप्रणाली पूर्ण केली जाईल.

(ज) कोणत्या परिस्थितींमध्ये ग्राहकाला दुसऱ्या व्यक्तीच्या/संस्थेच्या वतीने कृती करण्यास परवानगी दिलेली असेल ते स्पष्टपणे ठरवून दिले जाईल.

(झ) आरबीआय मास्टर डायरेक्शन च्या प्रकरण ९ मध्ये दिलेल्या निर्बंध यादीत ज्या व्यक्तीचे नाव असेल, त्याची ओळख इतर कोणत्याही व्यक्तीशी किंवा संस्थेशी मिळतीजुळती नसेल ह्याची खातरजमा करण्यासाठी योग्य ती प्रणाली उपयोगात आणली जाईल.

(ञ) आरबीआयने प्रसृत केलेल्या कोणत्याही नकरात्मक यादीत ज्या व्यक्तीचे किंवा संस्थेचे नाव असेल, त्यांच्याशी संबंधित कोणताही ग्राहक स्वीकारला जाणार नाही किंवा कर्जखाते उघडले जाणार नाही.

(ट) जर परमनंट अकाऊंट नंबर (पॅन) प्राप्त केलेले असेल तर त्याची पडताळणी ते जारी करणाऱ्या प्राधिकरणाकडून केली जाईल.

(ठ) ग्राहकाकडून जेव्हा समान दर्जाचे ई-डॉक्युमेंट प्राप्त केलेले असेल, तेव्हा माहिती तंत्रज्ञान, कायदा २००० च्या (२०००चा २१) तरतुदींनुसार डिजिटल सिग्नेचरची पडताळणी कंपनी करील.

(ड) जिथे वस्तू आणि सेवा कराचा (जीएसटी) तपशील उपलब्ध आहे, तेथे जीएसटी क्रमांक हा जारी करणाऱ्या प्राधिकरणाच्या शोध / पडताळणी सुविधेवरून पडताळला जाईल.

**११.** ग्राहकस्वीकृती पॉलिसीच्या परिणामस्वरूपी सर्वसाधारण जनतेतील कोणालाही, विशेषत: जे आर्थिकदृष्ट्या किंवा सामाजिकदृष्ट्या दुर्बल असतील त्यांना आर्थिक सुविधा नाकारल्या जाणार नाहीत.

**११ अ.** जिथे कंपनीला मनी लॉन्ड्रिंग किंवा दहशतवादी वित्तपुरवठ्याचा संशय येतो आणि सीडीडी प्रक्रिया केल्याने ग्राहकाला भनक पडेल, असा त्याचा वाजवी विश्वास असेल, तर ती सीडीडी प्रक्रियेचा पाठपुरावा करणार नाही आणि त्याऐवजी एफआययू-आयएनडीकडे एसटीआर दाखल करेल.

## प्रकरण – ४

## जोखमीचे संवर्गीकरण आणि व्यवस्थापन

**१२.** जोखमीचे संवर्गीकरण आणि व्यवस्थापन करण्यासाठी एचएफएलकडे जोखमीवर आधारित दृष्टिकोन असेल, ज्यात खालील बाबींचा समावेश आहे:

(क) कंपनीच्या मूल्यमापनानुसार तिला जाणवेल त्यानुसार ग्राहकांचे संवर्गीकरण, **कमी, मध्यम आणि उच्च** जोखीम

असलेले अशा संवर्गांमध्ये केले जाईल.

(ख) ग्राहकांच्या जोखीम-वर्गीकरणासाठी व्यापक तत्त्वे कंपनीने खाली नमूद केली आहेत.

(ग) ग्राहकाची ओळख, सामाजिक/आर्थिक स्थिती, व्यवसायाचे स्वरूप आणि ग्राहकाच्या व्यवसायाबद्दलची माहिती आणि त्याचे ठिकाण, भौगोलिक जोखीम ज्यात ग्राहक तसेच व्यवहार समाविष्ट आहे, ऑफर केलेल्या उत्पादने / सेवांचे प्रकार, उत्पादने / सेवांच्या वितरणासाठी वापरली जाणारी वितरण वाहिनी, केलेल्या व्यवहाराचे प्रकार - रोख, धनादेश / आर्थिक लेख, वायर ट्रान्सफर, फॉरेक्स व्यवहार इत्यादींवर आधारित जोखमीचे संवर्गीकरण केले जाईल. ग्राहकाची ओळख विचारात घेताना, ओळखीसाठी दिलेली कागदपत्रे ज्या प्राधिकरणांनी ऑनलाईन किंवा इतर सेवांच्या माध्यमातून दिलेली आहेत त्यांचाही पुढीलप्रमाणे विचार केला जाईल:

खाली उल्लेख केलले ग्राहकाचे एएमएल/जोखमीवर आधारित संवर्गीकरण हे वेळोवेळी विहित केल्या जाऊ शकणाऱ्या नियामक प्राधिकरणांच्या आवश्यकतांच्या अधीन असेल:

| | |
|---|---|
| कमी जोखीम | कमी जोखीम असलेले वैयक्तिक ग्राहक म्हणजे अशा व्यक्ती (उच्च नेट वर्थ असलेल्यांचा अपवाद सोडून) आणि संस्था असतात, ज्यांची ओळख आणि संपत्तीचे स्रोत सहजपणे ओळखले जाऊ शकतात आणि त्यांच्यासोबत केलेले एकूणच व्यवहार हे ज्ञात असलेल्या प्रोफाईलशी जुळत असतात. यांमध्ये यांचा समावेश होतो:<br>१. पगारदार नोकर<br>२. स्वयंरोजगार असलेल्या व्यक्ती/प्रोप्रायटरी फर्म्स<br>३. सरकारी खाती आणि सरकारच्या मालकीच्या कंपन्या<br>४. लिमिटेड कंपन्या (पब्लिक आणि प्रायव्हेट)<br>५. पार्टनरशिप फर्म (नोंदणीकृत डीड)<br>६. एनआरआयना २५ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज,ज्यात एनआरओ अकाऊंटच्या माध्यमातून परतफेड केली जाते आणि परतफेड जर परदेशातील रेमिटन्समधून होणार असेल, तर कोणतीही मर्यादा नाही.<br>७. २५ लाख रुपयांपर्यंतची सर्व कर्जप्रकरणे, ज्यांमध्ये उत्पन्नाच्या औपचारिक कागदपत्रांच्या पुराव्याशिवाय उत्पन्नाचे निर्धारण केलेले असते किंवा सरोगेट पद्धतीचा वापर केलेला असतो, उदा. रोख रकमेच्या रूपात पगार मिळणारे, उत्पन्नाचा पुरावा न घेता दिलेली कर्जे आणि अनौपचारिक स्वयंरोजगार असलेले ग्राहक.<br>८. २५ लाख रुपयांपर्यंतची सर्व ठेवी |
| मध्यम जोखीम | १. एनजीओज्, न्यास, धर्मादाय संस्था आणि देणग्या प्राप्त करणाऱ्या संस्था.<br>२. न्यास/संस्था<br>३. नेट वर्थ उच्च असलेल्या व्यक्ती (गुंतवणूक करण्याजोगी अधिकची रक्कम १.०० कोटी रुपयांहून अधिक).<br>४. कुटुंबातील जवळच्या नातेवाइकांची भागधारणा किंवा लाभार्थी मालक असलेली कंपनी.<br>५. २५ लाख रुपयांच्या वर असलेली मूल्यांकन सरोगेट पद्धतीने केलेली सर्व कर्जे किंवा उत्पन्नाचा पुरावा असलेल्या औपचारिक कागदपत्रांशिवाय असलेली कर्जे.<br>६. ज्यात कर्जाची परतफेड एनआरओ खात्यात्या माध्यमातून होणार असेल अशा अनिवासी भारतीयांना दिलेले २५ लाख रुपयांवरील रकमेचे कर्ज.<br>७. व्यक्तींकडील आणि नोंदणीकृत संस्थांकडील २५ लाख रुपयांवरील सर्व ठेवी |
| उच्च जोखीम | १. पॉलिटिकली एक्सपोज्ड पर्सन्स (पीईपी)/राजकारणाशी संबंधित व्यक्ती<br>२. राजकारणाशी संबंधित व्यक्तींच्या कुटुंबातील सभासद आणि जवळचे नातेवाईक.<br>३. **खूप जास्त** रकमेचे **रोख व्यवहार** (**रु. 10 लाख आणि त्याहून अधिक**) **आणि संशयास्पद व्यवहार एफआययु-आयएनडीकडे नोंदवले** गेले.<br>४. उपलब्ध असलेल्या सार्वजनिक माहितीनुसार दुष्कीर्ती असलेल्या व्यक्ती<br>५. **ज्या व्यक्तींचे उत्पन्नाचे स्रोत अज्ञात आहेत किंवा कोणताही कागदोपत्री पुरावा अपेक्षित नाही.**<br>६. **ग्राहक किंवा संशयास्पद व्यक्तींशी समोरासमोर न भेटणे**. |

(घ) ग्राहकाचे जोखीम वर्गीकरण आणि अशा वर्गीकरणाची विशिष्ट कारणे गोपनीय ठेवली जातील आणि ग्राहकाला खबर लागू नये म्हणून ती ग्राहकाला उघड केली जाणार नाहीत.

मात्र त्यासाठी तरतूद अशी आहे की, संभाव्य जोखमीच्या बाबतीत ग्राहकांच्या वेगवेगळया संवर्गांकडून प्राप्त केलेली माहिती ही अंतर्भेदी नसते (नॉन-इंट्रुजिव्ह) आणि ती क्रेडिट पॉलिसीमध्ये नमूद केली जाऊ शकते.

काळे पैसे पांढरे करण्याच्या विरोधातील (एएमएल) मानकांविषयी आणि काँबॅटिंग फायनान्सिंग टेररिझम (सीएफटी) मानकांविषयी फायनान्शिअल ॲक्शनटास्कफोर्सने(एफएटीएफ) केलेल्या शिफारशी, इंडियन बँक्स असोसिएशन (आयबीए) आणि इतर एजन्सींनी जारी केलेली मार्गदर्शक सूचना यांचाही उपयोग जोखमीचे निर्धारण करताना केले गेला पाहिजे.

## प्रकरण ५

## ग्राहकाची ओळख पटविण्याची कार्यप्रणाली (सीआयपी)

**१३.** कंपनी पुढील प्रकरणांच्या बाबतीत ग्राहकांची ओळख पटविण्याचे काम हाती घेईल:

(क) ग्राहकासोबतकर्जखात्यावर आधारित संबंधांची सुरुवात.

(ख) जेव्हा ग्राहकाच्या प्राप्त केलेल्या ओळखीच्या डेटाविषयीच्या अधिकृततेविषयी संशय असेल किंवा ती पुरेशी नसेल तेव्हा.

(ग) एजंट म्हणून तृतीय पक्षांच्या उत्पादनांची विक्री केली जात असेल, त्यांच्या स्वत:च्या उत्पादनांची विक्री केली जात असेल, क्रेडिट कार्डचे देय असलेले पेमेंट/प्रीपेड/ट्रॅव्हल कार्ड्सची विक्री आणि रिलोडिंग आणि इतर कोणतीही पन्नास हजार रुपयांपेक्षा अधिक किमतीची उत्पादने.

(घ) खात्यावर आधारित नसलेल्या ग्राहकांचे, म्हणजेच थेट येणाऱ्या ग्राहकांचे व्यवहार करणे, ज्यांमध्ये पन्नास हजार रुपये किंवा त्यापेक्षा अधिक रक्कम समाविष्ट असेल, मग तो एकदाच केलेला व्यवहार असो वा एकमेकांशी जोडलेले आहेत असे वाटणारे व्यवहार असोत.

(ङ) जेव्हा कंपनीला सकारण असे वाटत असेल किंवा असा संशय असेल की ग्राहक पन्नास हजार रुपयांच्या किमान रकमेपेक्षा कमीचे व्यवहार आहेत असे दाखविण्यासाठी मुद्दाम छोट्या छोट्या रकमेचे व्यवहार (ट्रँझॅक्शन्स) एकामागोमाग करीत असेल तेव्हा.

(च) एएफएचएलकडून कर्ज घेताना कंपनी ग्राहकाकडून (दुसऱ्यांनी ग्राहकाचा दिलेला परिचय) परिचय मागणार नाही.

**१४.** कर्जावर आधारित संबंध सुरू होण्याच्या वेळी ग्राहकाच्या ओळखीची पडताळणी करण्यासाठी कंपनी तिला स्वत:ला वाटेल त्यानुसार, तृतीय पक्षांनी केलेल्या ड्यू डिलिजन्सवर अवलंबून राहील, मात्र त्यासाठी खालील अटी आहेत:

(क) तृतीय पक्षांने कस्टमर ड्यू डिलिजन्सच्या माहितीच्या नोंदी तृतीय पक्षाकडून किंवा सेंट्रल केवायसी रेकॉर्ड रजिस्ट्रीकडून त्वरित प्राप्त केल्या पाहिजेत.

(ख) कस्टमर ड्यू डिलिजन्सच्या आवश्यकतेशी संबंधित ओळखीच्या माहितीच्या प्रती आणि इतर संबंधित दस्तऐवज विनंती केल्यास तृतीय पक्षाकडून विनाविलंब उपलब्ध केल्या पाहिजेत, यासाठी कंपनी पुरेशी पावले उचलील.

(ग) पीएमएल ॲक्टअंतर्गतअसलेल्याआवश्यकताआणिदायित्वेलक्षातघेऊनकस्टमर ड्यू डिलिजन्स आणि पीएमएल कायद्यांतर्गतच्या आवश्यकता आणि दायित्वे लक्षात घेऊन अनुपालनासाठी तृतीय पक्षांचे नियमन केले जाईल,

पर्यवेक्षण किंवा देखरेख केली जाईल.

(घ) तृतीय पक्ष हे परदेशातील असू नयेत किंवा त्यांचे कार्यक्षेत्र हे उच्च जोखीम म्हणून गणलेले नसावे.

(ङ) कस्टमर ड्यू डिलिजन्सची अंतिम जबाबदारी आणि लागू असल्यास, ड्यू डिलिजन्ससाठी वाढीव उपाययोजना करणे ही कंपनीकडे असेल.

## प्रकरण ६

## कस्टमर ड्यू डिलिजन्स (सीडीडी) कार्यप्रणाली

### भाग १ - व्यक्तींच्या बाबतीतील कस्टमर ड्यू डिलिजन्स (सीडीडी) कार्यप्रणाली

१५. सीडीडी हाती घेण्यासाठी, कर्जखात्यावर आधारित संबंध प्रस्थापित करताना किंवा लाभार्थी मालक असलेल्या व्यक्तींशी, अधिकृत हस्ताक्षर करणाऱ्यांशी किंवा मुखत्यारपत्रधारकांशी किंवा कायदेशीर अस्तित्व असलेल्या संस्थांशी व्यवहार करताना, व्यक्तींकडून खालील बाबी प्राप्त करील:

(क) आधार क्रमांक जेव्हा,

(i) आधार (टार्गेटेड डिलिव्हरी ऑफ फायनान्शिअल अँड अदर सबसिडी, बेनिफीट्स अँड सर्व्हिसेस) अॅक्ट, २०१६(२०१६चा १८) च्या कलम ७ अंतर्गत अधिसूचित केल्यानुसार काणत्याही योजनेंतर्गत कोणताही फायदा किंवा अनुदान घेण्यास इच्छुक असेल; किंवा

(ii) पीएमएल कायद्याच्या कलम ११ए मधील उप-कलम (१) मधील पहिल्या तरतुदीच्या संदर्भात त्याने त्याचे आधार कार्ड स्वेच्छेने सादर करण्याचा निर्णय घेतला; किंवा

(ख) आधार क्रमांक असल्याचा पुरावा, जेथे ऑफलाईन पडताळणी केली जाऊ शकेल; किंवा

(ग) जेथे ऑफलाईन पडताळणी केली जाऊ शकत नाही तेथे आधार क्रमांक असल्याचा पुरावा किवा ओव्हीडी किंवा तत्सम ई-डॉक्युमेंट ज्यात त्याच्या ओळखीचे आणि पत्त्याचे तपशील असतील; आणि

(घ) सीकेवायसीआरमधून रेकॉर्ड डाउनलोड करण्यासाठी स्पष्ट संमतीसह केवायसी ओळखकर्ता/आयडेंटिफायर; आणि

(ङ) परमनंट अकाऊंट नंबर (पॅन) किंवा तत्सम ई-डॉक्युमेंट किंवा आयकर नियम, १९६२ मध्ये व्याख्या दिल्यानुसार फॉर्म क्र. ६०; आणि

(च) असे ओळखीचे इतर दस्तऐवज, ज्यात ग्राहकाच्या व्यवसायाचे स्वरूप आणि आर्थिक स्थिती किंवा त्यांचे तत्सम ई-डॉक्युमेंट्स, जे कंपनीला क्रेडिट पॉलिसीनुसार आवश्यक असतील ते;

परंतु त्यासाठी अशी अट आहे की, ग्राहकाने पुढील गोष्टी सादर केलेल्या असतील:

i) आधार कार्ड हे पीएमएल कायद्याच्या कलम ११एच्या उप-कलम (१) मध्ये दिलेल्या परंतुकानुसार असेल तर, युनिक आयडेंटिफिकेशन ऑथॉरिटी ऑफ इंडिया यांनी पुरविलेल्या ई-केवायसी सुविधेचा वापर करून कंपनी ग्राहकाच्या आधार क्रमांकाची अधिकृतता तपासून पाहील. त्यानंतर, अशा बाबतीत ग्राहकाला जर सेंट्रल आयडेंटिटिज् डेटा रिपॉझिटरीमध्ये उपलब्ध असलेल्या ओळखीच्या माहितीपेक्षा सध्याचा वेगळा पत्ता देण्याची इच्छा असेल, तर तो तशा प्रकारचे घोषणापत्र स्वत:च कंपनीला देऊ शकतो.

ii) जेथे आधार क्रमांकाच्या पुराव्याची ऑफलाईन पडताळणी केली जाऊ शकते, तेथे कंपनी ऑफलाईन पडताळणी करील.

iii) कोणत्याही ओव्हीडीच्या समान दर्जाचे असलेले ई-डॉक्युमेंट असल्यास, कंपनी माहिती तंत्रज्ञान, कायदा, २००० (२०००चा २१) व त्याअंतर्गत जारी करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांच्या अनुसार डिजिटल सिग्नेचरची पडताळणी करील आणि जोडपत्र १ मध्ये नमूद केल्यानुसार लाईव्ह फोटो घेईल.

iv) कोणतेही ओव्हीडी किंवा आधार क्रमांक असल्याचा पुरावा, जेथे ऑफलाईन पडताळणी करता येणे शक्य नसल्यास कंपनी, जोडपत्र १ अंतर्गत नमूद केल्यानुसार, डिजिटल केवायसी द्वारे पडताळणी करेल.

v) वरील खंड (डी) अंतर्गत केवायसी आयडेंटिफायर, कंपनी कलम 56 नुसार सीकेवायसीआरकडून केवायसी रेकॉर्ड ऑनलाइन पुनर्प्राप्त करेल.

त्याहीपुढे अशी तरतूद आहे की, आधार (टार्गेटेड डिलिव्हरी ऑफ फायनान्शिअल अँड अदर सबसिडी, बेनिफीट्स अँड सर्व्हिसेस) ॲक्ट, २०१६च्या कलम ७ अंतर्गत अधिसूचित केल्यानुसार कोणत्याही योजनेंतर्गत कोणताही फायदा किंवा अनुदान घेण्यास इच्छुक असलेल्या व्यक्तीचे ई-केवायसी ऑथेंटिकेशन, तो जखमी झाल्याने, आजारी असल्याने किंवा वृद्धत्वामुळे किंवा अन्यथा बुद्धी काम करीत नसेल आणि अशाच प्रकारच्या काही कारणांमुळे जर केले जाऊ शकत नसेल, तर कंपनी आधार क्रमांक प्राप्त करण्याबरोबरच, कंपनी शक्यतो ओळखीची ऑफलाईन पडताळणी करून किंवा पर्यायाने ग्राहकाकडूनदुसऱ्या ओव्हीडीची किंवा त्याच्या समान दर्जाच्या ई-डॉक्युमेंटची प्रमाणित प्रत प्राप्त करील. अशा प्रकारे करण्यात येणारे सीडीडी हे न चुकता फक्त कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून करण्यात येतील आणि अशा प्रकारचे अपवाद हाताळणे हेसुद्धा समवर्ती (कॉँकरंट) लेखापरीक्षणाचा भाग असेल. अपवादात्मक हाताळणीची प्रकरणे कंपनी सेंट्रलाईझ्ड एक्सेप्शन डेटाबेसमध्ये योग्यपणे नोंदवण्याची काळजी घेईल. ह्या डेटाबेसमध्ये अपवाद म्हणून मान्यता देण्याची कारणे, ग्राहकाचे तपशील, अपवादाला मान्यता देणाऱ्या डेसिग्नेटेड कर्मचाऱ्याचे नाव आणि काही अतिरिक्त तपशील असलेच तर ते समाविष्ट असतील. ह्या डेटाबेसची ठरावीक कालावधीनंतर कंपनीद्वारे लेखापरीक्षण/तपासणी केली जाईल आणि तो पर्यवेक्षणीय पुनरावलोकनासाठी उपलब्ध असेल.

स्पष्टीकरण १ : जेव्हा कंपनीचा ग्राहक आधार क्रमांक असलेला आधार क्रमांकाचा पुरावा सादर करील, तेव्हा कंपनी ह्याची खातरजमा करील की, जर आधार क्रमांकाच्या अधिकृततेची आवश्यकता नसेल, तर उपरोक्त परंतु(१) नुसार असा ग्राहक योग्य त्या साधनाच्या माध्यमातून आधार क्रमांक दिसून येणार नाही अशा प्रकारे झाकील किंवा त्यावर काळी शाई लावील.

स्पष्टीकरण २: लागू असलेल्या कायद्याच्या अनुपालनाच्या अधीन राहून कंपनीद्वारे बायोमेट्रिकवर आधारित ई-केवायसी ऑथेंटिकेशन केले जाऊ शकेल.

स्पष्टीकरण ३: आधारचा उपयोग, आधार असल्याचा पुरावा, इत्यादी आधार (टार्गेटेड डिलिव्हरी ऑफ फायनान्शिअल अँड अदर सबसिडी, बेनिफीट्स अँड सर्व्हिसेस) ॲक्ट, २०१६आणि त्याअंतर्गत करण्यात आलेल्या नियमांनुसार असेल.

१६. समोरासमोर बसून (फेस-टू-फेस) आधार ओटीपीवर आधारित ई-केवायसीचा उपयोग करून उघडलेली कर्जखाती खालील अटींच्या अधीन असतील. यानंतर कंपनी ठेवी स्वीकारू शकत नसल्याने ह्या अटी फक्त कर्ज देण्याच्या सुविधेशी संबंधित आहेत:

i. ओटीपीच्या माध्यमातून अधिकृतता तपासण्यासाठी ग्राहकाकडून विशेष संमती असली पाहिजे.

ii. अशा कर्ज खात्यांसाठी जोखीम कमी करण्याचा उपाय म्हणून, कंपनी सुनिश्चित करेल की ट्रान्झॅक्शन अलर्ट, ओटीपी इ. केवळ आधारसह नोंदणीकृत ग्राहकाच्या मोबाइल क्रमांकावरच पाठविले जातील. कंपनीने आपल्या सर्वात महत्वाच्या अटी आणि शर्ती (एमआयटीसी) मध्ये अशा कर्ज खात्यांमध्ये मोबाइल क्रमांक बदलण्याच्या विनंत्या हाताळण्यासाठी योग्य तपासणीची मजबूत प्रक्रिया परिभाषित केली आहे.

iii. फक्त मुदतीच्या कर्जांना मंजुरी दिली जाईल. मंजूर मुदत कर्जाची एकूण रक्कम कंपनीच्या पतधोरणात आणि भारतीय रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी विहित केलेल्या केवायसी पॉलिसीमध्ये विहित रकमेपेक्षा जास्त असू नये..

iv. **ओटीपी आधारित ई-केवायसी वापरून उघडलेल्या कर्ज खात्यांना एक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी परवानगी दिली जाणार नाही, ज्यामध्ये या पॉलिसी अंतर्गत ओळख पटवायची आहे.** व्हि-सीआयपी **अंतर्गत आधार तपशील वापरला गेल्यास, नवीन आधार ओटीपी प्रमाणीकरणासह संपूर्ण प्रक्रियेचे पालन केले जाईल.**

v. वर उल्लेख केलेली सीडीडी कार्यप्रणाली जर एका वर्षात पूर्ण केली गेली नाही, तर त्यानंतर कोणत्याही तपशिलांना परवानगी दिली जाणार नाही.

vi. इतर कोणत्याही रिपोर्टिंग एंटिटीसोबत, समोरासमोर बसून ओटीपीवर आधारित केवासीचा उपयोग करून इतर कोणतेही खाते उघडलेले नाही किंवा उघडले जाणार नाही. त्यानंतर, सीकेवायसीआरकडे केवासीसंबंधी कोणतीही माहिती अपलोड करताना कंपनी असे स्पष्टपणे दर्शवील की, अशी खाती ओटीपीवर आधारित ई-केवायसीचा उपयोग करून उघडलेली आहेत. इतर रिपोर्टिंग एंटिटीज्सोबत समोरासमोर बसूनओटीपीवर आधारित ई-केवायसी कार्यप्रणालीच्या साह्याने उघडलेल्या खात्यांच्या केवायसी माहितीचा उपयोग करून कंपनी खाती उघडणार नाही.

vii. उपरोक्त अटींची पूर्तता करण्यासाठी कंपनीकडे कठोर देखरेखीची कार्यप्रणाली असेल, ज्यात पूर्तता न झाल्यास/उल्लंघन झाल्यास अलर्ट सिस्टीमचाही समावेश आहे.

**१७.** कंपनी कदाचित लाईव्ह व्ही-सीआयपीही हाती घेऊ शकेल,

i) वैयक्तिक ग्राहकांसाठी, मालकी फर्मच्या बाबतीत मालक, अधिकृत स्वाक्षरीदार आणि कायदेशीर संस्था (एलई) ग्राहकांच्या बाबतीत लाभार्थी मालक (बीओ) नवीन ग्राहक ऑन-बोर्डिंगच्या बाबतीत सीडीडी.

परंतु मालकी फर्मच्या सीडीडीच्या बाबतीत, कंपनी मालकाची सीडीडी घेण्याव्यतिरिक्त, एकमेव मालकीच्या सीडीडी उपायांमध्ये नमूद केल्याप्रमाणे मालकी फर्मच्या संदर्भात क्रियाकलाप पुराव्यांचे समतुल्य ई-दस्तऐवज देखील प्राप्त करेल.

ii) वरील पॉइंट क्रमांक १६ नुसार आधार ओटीपी आधारित ई-केवायसी प्रमाणीकरणाचा वापर करून नॉन-फेस टू फेस मोडमध्ये उघडलेल्या विद्यमान खात्यांचे रूपांतर करणे.

iii) पात्र ग्राहकांसाठी केवायसी अद्ययावत करणे / वेळोवेळी अद्ययावत करणे.

व्ही-सीआयपी हाती घेण्यास निवडणारी कंपनी खालील किमान मानकांचे पालन करेल:

(क) व्ही-सीआयपी इन्फ्रास्ट्रक्चर

i) कंपनीने बँकांसाठी किमान बेसलाइन सायबर सुरक्षा आणि रेजिलन्स फ्रेमवर्कवरील आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांचे तसेच आयटी जोखमींवरील इतर सामान्य मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केले असावे. तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधा कंपनीच्या स्वत: च्या आवारात ठेवल्या पाहिजेत आणि व्ही-सीआयपी कनेक्शन आणि संवाद अनिवार्यपणे त्याच्या स्वत: च्या सुरक्षित नेटवर्क डोमेनमधून उद्भवला पाहिजे. या प्रक्रियेसाठी तंत्रज्ञानाशी संबंधित कोणतेही आउटसोर्सिंगने आरबीआयच्या संबंधित मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणे आवश्यक आहे. जेथे क्लाऊड डिप्लॉयमेंट मॉडेल वापरले जाते, तेथे हे सुनिश्चित केले जाईल की अशा मॉडेलमधील डेटाची मालकी केवळ कंपनीकडे आहे आणि व्ही-सीआयपी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर व्हिडिओ रेकॉर्डिंगसह सर्व डेटा क्लाऊड सर्व्हरसह कंपनीच्या विशेष मालकीच्या / भाडेतत्त्वावरील सर्व्हरकडे हस्तांतरित केला जाईल आणि कोणताही डेटा क्लाऊड सेवा प्रदाता किंवा कंपनीच्या व्ही-सीआयपीला मदत करणाऱ्या तृतीय-पक्ष तंत्रज्ञान प्रदात्याकडे ठेवला जाणार नाही.

ii) कंपनी योग्य एन्क्रिप्शन मानकांनुसार ग्राहक डिव्हाइस आणि व्ही-सीआयपी अनुप्रयोगाच्या होस्टिंग पॉईंट दरम्यान डेटाचे एंड-टू-एंड एन्क्रिप्शन सुनिश्चित करेल. ग्राहकांची संमती लेखापरीक्षण योग्य आणि बदल-रोधी पद्धतीने नोंदविली गेली पाहिजे.

iii) व्ही-सीआयपी इन्फ्रास्ट्रक्चर / ॲप्लिकेशन भारताबाहेरील आयपी पत्त्यांपासून किंवा स्पूफ केलेल्या आयपी पत्त्यांपासून कनेक्शन रोखण्यास सक्षम असावा.

iv) व्हिडिओ रेकॉर्डिंगमध्ये व्ही-सीआयपी घेणाऱ्या ग्राहकाचे लाइव्ह जीपीएस कोऑर्डिनेट्स (जिओ टॅगिंग) आणि डेट-टाइम(दिनांक-वेळ) स्टॅम्प असणे आवश्यक आहे. व्ही-सीआयपीमधील लाइव्ह व्हिडिओची गुणवत्ता संशयापलीकडे

जाऊन ग्राहकाची ओळख पटविण्यासाठी पुरेशी असेल.

v) कोणत्याही ग्राहक ओळखीची अंतिम जबाबदारी कंपनीची असली तरी ॲप्लिकेशनमध्ये फेस लाईव्हनेस / स्पूफ डिटेक्शन तसेच उच्च दर्जाच्या अचूकतेसह फेस मॅचिंग टेक्नॉलॉजी असलेले घटक असावे. व्ही-सीआयपी मजबूत असल्याची खात्री करण्यासाठी योग्य कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा वापर केला जाऊ शकतो.

vi) बनावट ओळखीच्या शोधलेल्या/ प्रयत्न केलेल्या / 'नियर-मिस' प्रकरणांच्या अनुभवाच्या आधारे, ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर तसेच कार्य प्रवाहासह तंत्रज्ञान पायाभूत सुविधा नियमितपणे अद्ययावत/अपडेट केल्या जातील. व्ही-सीआयपीद्वारे बनावट ओळखीचे कोणतेही प्रकरण सध्याच्या नियामक मार्गदर्शक तत्त्वांनुसार सायबर घटना म्हणून नोंदविले जाईल.

vii) व्ही-सीआयपी पायाभूत सुविधांची मजबुती आणि एंड-टू-एंड एन्क्रिप्शन क्षमता सुनिश्चित करण्यासाठी भेद्यता मूल्यांकन, प्रवेश चाचणी आणि सुरक्षा ऑडिट सारख्या आवश्यक चाचण्या केल्या जातील. या प्रक्रियेअंतर्गत नोंदवलेली कोणतीही गंभीर तफावत त्याची अंमलबजावणी सुरू करण्यापूर्वी कमी केली जाईल. अशा चाचण्या इंडियन कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीमच्या (सीईआरटी-इन) पॅनेल्ड ऑडिटर्सकडून घेण्यात याव्यात. अशा चाचण्या अंतर्गत/नियामक मार्गदर्शक तत्त्वांच्या अनुषंगाने वेळोवेळी केल्या पाहिजेत.

viii) व्ही-सीआयपी ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर आणि संबंधित एपीआय / वेब-सेवा थेट परिस्थितीत वापरण्यापूर्वी त्यांच्या कार्यात्मक, कार्यक्षमता, देखभाल सामर्थ्याची योग्य चाचणी घेतली पाहीजे. अशा चाचण्यांदरम्यान आढळणारी कोणतीही गंभीर तफावत निर्मूलन झाल्यानंतरच हे ॲप्लिकेशन सुरू करावे. अंतर्गत/ नियामक मार्गदर्शक तत्त्वांच्या अनुषंगाने अशा चाचण्या वेळोवेळी केल्या जातील.

**(ख) वी-सीआयपी प्रक्रिया**

i) कंपनी व्ही-सीआयपीसाठी स्पष्ट कार्य प्रवाह आणि मानक ऑपरेटिंग प्रक्रिया तयार करेल आणि त्याचे पालन सुनिश्चित करेल. व्ही-सीआयपी प्रक्रिया केवळ यासाठी विशेष प्रशिक्षित कंपनीच्या अधिकाऱ्यांद्वारे चालविली जाईल. अधिकारी लाइव्हनेस चेक करण्यास आणि ग्राहकाच्या इतर कोणत्याही फसवणुकीच्या हेराफेरी किंवा संशयास्पद वर्तनाचा शोध घेण्यास आणि त्यावर कारवाई करण्यास सक्षम असावेत.

ii) व्हिडिओ थांबविणे, कॉल पुन्हा जोडणे इ. सह कोणत्याही प्रकारच्या व्यत्ययामुळे एकाधिक व्हिडिओ फाइल्स तयार होऊ नयेत. जर विराम किंवा व्यत्यय यामुळे एकाधिक फायली तयार होत नसतील तर कंपनीकडून नवीन सत्र सुरू करण्याची आवश्यकता नाही. मात्र, कॉल ड्रॉप/कनेक्शन तुटल्यास नव्याने सत्र सुरू करण्यात येईल.

iii) व्हिडिओ संवादादरम्यान संवादाचा लाइव्हनेस दर्शविणाऱ्या प्रश्नांसह, सर्व प्रश्नांचा अनुक्रम आणि / किंवा प्रश्नांचे प्रकार वेगवेगळे असतील जेणेकरून परस्परसंवाद रिअल-टाइम आहेत आणि पूर्व-रेकॉर्ड केलेले नाहीत हे स्थापित केले जाईल.

iv) ग्राहकाद्वारे कोणत्याही प्रोम्प्टिंग आढळल्यामुळे खाते उघडण्याची प्रक्रिया नाकारली जाईल.

v) व्ही-सीआयपी ग्राहक विद्यमान किंवा नवीन ग्राहक असल्याची किंवा ते आधी नाकारलेल्या प्रकरणाशी संबंधित असल्याची किंवा काही नकारात्मक यादीत दिसणारे नाव असल्याची वस्तुस्थिती कार्य-प्रवाहाच्या योग्य टप्प्यावर विचारात घेतली पाहिजे.

vi) व्ही-सीआयपी करणाऱ्या कंपनीचा अधिकृत अधिकारी ऑडिओ-व्हिडिओ रेकॉर्ड करेल तसेच ओळखीसाठी उपस्थित ग्राहकाचे छायाचित्र टिपेल आणि खालीलपैकी कोणत्याही एकाचा वापर करून ओळखीची माहिती प्राप्त करेल:

अ. ओटीपी आधारित आधार ई-केवायसी प्रमाणीकरण

ब. ओळखीसाठी आधारची ऑफलाइन पडताळणी

सी. सीकेवायसीआरमधून डाउनलोड केलेले केवायसी रेकॉर्ड, सीडीडी प्रक्रियेनुसार आणि केवायसी माहिती केंद्रीय केवायसी रेकॉर्ड रजिस्ट्री (सीकेवायसीआर) सह सामायिक करणे, ग्राहकाने प्रदान केलेल्या केवायसी ओळखकर्त्याचा/आयडेंटिफायरचा वापर करून

ड. डिजिलॉकरद्वारे जारी केलेल्या कागदपत्रांसह अधिकृतपणे वैध दस्तऐवज (ओव्हीडी) चे समतुल्य ई-दस्तऐवज कंपनी वरील पॉइंट क्रमांक १५ नुसार आधार क्रमांक रीडॲक्ट किंवा ब्लॅकआऊट करण्याची खात्री करेल.

एक्सएमएल फाइल किंवा आधार सिक्योर क्यूआर कोड वापरून आधारची ऑफलाइन पडताळणी केल्यास, एक्सएमएल फाइल किंवा क्यूआर कोड जनरेशन ची तारीख व्ही-सीआयपी करण्याच्या तारखेपासून तीन कार्यदिवसांपेक्षा जुनी नाही याची खात्री केली जावी.

तसेच, जर क्वचित प्रसंगी संपूर्ण प्रक्रिया एकाच वेळी किंवा अखंडितपणे पूर्ण केली जाऊ शकत नसेल तर, आधार एक्सएमएल फाईल / आधार क्यूआर कोड वापरण्यासाठी तीन कार्यदिवसांच्या विहित कालावधीच्या अनुषंगाने, कंपनी सुनिश्चित करेल की व्ही-सीआयपीची व्हिडिओ प्रक्रिया सीकेवायसीआर / आधार प्रमाणीकरण / समतुल्य ई-दस्तऐवजाद्वारे ओळखीची माहिती डाउनलोड / प्राप्त केल्यानंतर तीन कार्यदिवसांच्या आत केली जाईल. तथापि, यामुळे कोणतीही वाढीव जोखीम जोडली जाणार नाही याची खात्री कंपनीने करावी.

vii) ग्राहकाचा पत्ता ओव्हीडीमध्ये दर्शविलेल्या पत्त्यापेक्षा वेगळा असल्यास, सध्याच्या गरजेनुसार सध्याच्या पत्त्याच्या योग्य नोंदी घेतल्या जातील. व्ही-सीआयपी राबवणाऱ्या ग्राहकाकडून ग्राहकाने सादर केलेल्या आर्थिक व वित्तीय प्रोफाइल/माहितीची ही योग्य पद्धतीने खातरजमा केली जाईल, याची खात्री केली जाईल.

viii) ग्राहकाने ई-पॅन प्रदान केलेल्या प्रकरणांचा अपवाद वगळता, कंपनी प्रक्रियेदरम्यान ग्राहकाने प्रदर्शित केलेल्या पॅन कार्डची स्पष्ट प्रतिमा कॅप्चर करेल(फोटो घेईल). डिजिलॉकरसोबतच जारी करणाऱ्या प्राधिकरणाच्या डेटाबेसमधून पॅन तपशीलांची पडताळणी केली जाईल.

ix) ई-पॅनसह समतुल्य ई-दस्तऐवजाची छापील प्रत वापरणे व्ही-सीआयपीसाठी वैध नाही.

x) कंपनीचा अधिकृत अधिकारी खात्री करेल की आधार / ओव्हीडी आणि पॅन / ई-पॅनमधील ग्राहकाचा फोटो व्ही-सीआयपी घेणाऱ्या ग्राहकाशी जुळतो आणि आधार / ओव्हीडी आणि पॅन / ई-पॅनमधील ओळख तपशील ग्राहकाने प्रदान केलेल्या तपशीलांशी जुळतील.

xi) व्ही-सीआयपीद्वारे उघडलेली सर्व खाती समवर्ती लेखापरीक्षणाच्या अधीन राहिल्यानंतरच कार्यान्वित केली जातील, जेणेकरून प्रक्रियेची अखंडता आणि परिणामाची स्वीकारार्हता सुनिश्चित होईल.

xii) परिच्छेदाखाली निर्दिष्ट नसलेल्या परंतु माहिती तंत्रज्ञान (आयटी) कायद्यासारख्या इतर कायद्यांखाली आवश्यक असलेल्या सर्व बाबींचे कंपनीकडून योग्य प्रकारे पालन केले जाईल.

**(ग) व्ही-सीआयपी रेकॉर्ड्स आणि डेटा मॅनेजमेंट**

i) व्ही-सीआयपीचा संपूर्ण डेटा आणि रेकॉर्डिंग/नोंदी भारतात स्थित प्रणाली/सिस्टममध्ये संग्रहित केले जातील. कंपनी सुनिश्चित करेल की व्हिडिओ रेकॉर्डिंग सुरक्षित आणि निर्धोक पद्धतीने संग्रहित केले गेले आहे आणि सुलभ ऐतिहासिक डेटा शोध सध्या होण्यासाठी तारीख आणि वेळ मुद्रित आहे. रिझर्व्ह बँकेच्या केवायसी मास्टर डायरेक्शनमध्ये नमूद केल्याप्रमाणे रेकॉर्ड मॅनेजमेंट/नोंदी व्यवस्थापनच्या सध्याच्या सूचना व्ही-सीआयपीसाठीही लागू असतील.

ii) व्ही-सीआयपी करणाऱ्या अधिकाऱ्याच्या ओळखपत्रांसह क्रियाकलाप लॉग जतन केले जातील.

**१८. नॉन-बँकिंग फायनान्स कंपन्यांसाठी (एनबीएफसीज्) सुलभ केलेली कार्यप्रणाली:**ज्या व्यक्तीला कर्ज घेण्याची इच्छा आहे ती जर विहित दस्तऐवज सादर करू शकत नसेल, तर कंपनी स्वत:च्या विवेकाधिकारात, खालील अटींच्या अधीन राहून कर्जखाते उघडू शकेल:

(क) कंपनी ग्राहकाकडून स्व-साक्ष्यांकित छायाचित्रे प्राप्त करील.

(ख) कंपनीचा डेसिग्नेटेड अधिकारी त्याच्या सहीनिशी प्रमाणित करील की, खाते उघडणाऱ्या व्यक्तीने त्याच्या उपस्थितीत तिची सही केलेली आहे किंवा अंगठ्याचा ठसा उमटवलेला आहे.

(ग) कर्जखाते सुरुवातीला १२ महिने सक्रिय राहील, ज्या कालावधीमध्ये सीडीडी केले गेले पाहिजे.

(घ) मंजूर केलेले कर्ज/त्यांच्या खात्यातील शिल्लक यांची बेरीज एकत्रितरीत्या कोणत्याही वेळी पन्नास हजार रुपयांहून अधिक नसावी.

(ङ) सर्व खात्यांतील क्रेडिटची एकूण बेरीज एका वर्षात एक लाख रुपयांहून अधिक नसावी.

(च) ग्राहकाला ह्याविषयी जागरूक केले पाहिजे की, त्याने वरील (घ) चे उल्लंघन केल्यास पूर्ण केवायसी प्रक्रिया पूर्ण करीपर्यंत पुढील कोणत्याही व्यवहारास परवानगी दिली जाणार नाही.

(छ) जेव्हा शिल्लक रक्कम ४० हजार रुपयांपर्यंत पोहोचेल किंवा एका वर्षातील एकूण क्रेडिट ऐंशी हजार रुपयांपर्यंत पहोचेल तेव्हा ग्राहकाला कळविण्यात येईल की, केवायसी करण्यासाठी योग्य ते दस्तऐवज सादर केलेच पाहिजेत, अन्यथा, जेव्हा उपरोक्त (घ) व (ङ) निर्देशांमध्ये नमूद केलेल्या सर्व खात्यातील एकत्रित शिलकेच्या मर्यादा ओलांडल्या जातील तेव्हा खात्यातील व्यवहार थांबवण्यात येतील.

(ज) ग्राहकाला कळविण्यासाठी आणि केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी कंपनी योग्य ती पावले उचलील, असे न केल्यास त्यानंतर कोणत्याही डेबिट व्यवहारास परवानगी देण्यात येणार नाही.

(झ) कर्ज खात्यावर देखरेख ठेवली जाईल आणि जेव्हा एमएल / टीएफ क्रियाकलाप किंवा इतर उच्च जोखमीच्या परिस्थितीचा संशय असेल तेव्हा कलम 15 किंवा कलम 17 नुसार ग्राहकाची ओळख स्थापित केली जाईल.

१९. शाखेद्वारे/कंपनीच्या कार्यालयाद्वारे एकदा केवायसी पडताळणी केली गेल्यानंतर, संबंधित कर्जखात्यासाठी पूर्ण केवायसी पडताळणी केली गेली असेल आणि ती आवर्ती अद्यतन करण्यायोग्य नसेल, तर ती त्याच कंपनीच्या इतर कोणत्याही शाखेत/कार्यालयात कर्जखाते हस्तांतरित करण्यासाठी वैध असेल.

## भाग २ - सोल प्रोप्रायटरी फर्मसाठी सीडीडी उपाययोजना

२०. सोल प्रोप्रायटरी फर्मच्या नावाने कर्जखाते उघडण्यासाठी त्या व्यक्तीचे (प्रोप्रायटरचे) सीडीडी केले जाईल.

२१.वरीलबाबींच्याव्यतिरिक्त, खालीलपैकी कोणतेही दोन दस्तऐवज किंवा त्याची तत्सम ई-डॉक्युमेंट्स, प्रोप्रायटर फर्मच्या नावाने असलेल्या व्यवसायाच्या/कृतींच्या पुराव्यादाखल प्राप्त केली जातील.

(क) नोंदणी प्रमाणपत्र, सरकारने जारी केलेल्या उद्यम नोंदणी प्रमाणपत्रासह (यूआरसी)

(ख) दुकाने आणि आस्थापना कायद्यांतर्गत महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिलेले प्रमाणपत्र/परवाना

(ग) विक्रीकराचे आणि आयकराचे विवरण

(घ) सीएसटी/व्हॅट/जीएसटी प्रमाणपत्र (तात्पुरते/अंतिम)

(ङ) विक्रीकर/सेवाकर/व्यवसायकर अधिकाऱ्यांनी जारी केलेले प्रमाणपत्र/नोंदणीचे दस्तऐवज

(च) डीजीएफटी कार्यालयाने प्रोप्रायटरी कन्सर्नला जारी केलेला आयईसी (इंपोर्ट एक्सपोर्ट कोड) किंवा कायद्यान्वये स्थापित करण्यात आलेल्या कोणत्याही व्यावसायिक संस्थेने प्रोप्रायटरी कन्सर्नच्या नावे दिलेला परवाना/सर्टिफिकेट ऑफ प्रॅक्टिस.

(छ) ज्यात फर्मचे उत्पन्न प्रतिबिंबित होईल असे सोल प्रोप्रायटरच्या नावे असलेले, आयकर अधिकाऱ्यांनी योग्यपणे अधिकृत केलेले/पोच दिलेले संपूर्ण आयकर विवरण (फक्त पोचपावती नाही).

(ज) वीज, पाणी, लँडलाईन फोन, इत्यादींसारखी उपयुक्त सेवांची बिले.

२२. कंपनीला जर अशी खात्री पटली की, अशा प्रकारचे दोन दस्तऐवज सादर करणे शक्य नाहीए, तर कंपनी स्वत:च्या विवेकाधिकारात फक्त एकाच दस्तऐवजाचा स्वीकार व्यवसायाचा/कृतीचा पुरावा म्हणून करील.

मात्र त्यासाठी अशी तरतूद आहे की, कंपनी संपर्काच्या ठिकाणी पडताळणी करून अशा फर्मचे अस्तित्व स्थापित

करण्यासाठी अशी इतर माहिती गोळा करू शकेल आणि प्रोप्रायटरी फर्मच्या पत्त्याच्या आधारे व्यवसायाच्या कामांची पुष्टी आणि पडताळणी करील.

**भाग ३ - कायदेशीर अस्तित्व असलेल्या संस्थांसाठी सीडीडी उपाययोजना**

२३. कंपनीचे कर्जखाते उघडण्यासाठी खालीलपैकी प्रत्येक दस्तऐवजाच्या प्रमाणित प्रती किंवा त्यांची तत्सम ई-डॉक्युमेंट्स प्राप्त केली जातील:

(क) संस्थापना प्रमाणपत्र

(ख) संस्थापना समयलेख आणि संस्थेची नियमावली

(ग) कंपनीचा परमनंट अकाऊंट नंबर

(घ) संचालक मंडळाचा ठराव आणि कंपनीच्या वतीने व्यवहार करण्यासाठी तिच्या व्यवस्थापकांना, अधिकाऱ्यांना किंवा कर्मचाऱ्यांना दिलेले मुखत्यारपत्र.

(ङ) कंपनीच्या वतीने व्यवहार करण्यासाठी मुखत्यारपत्र धारण करणारे लाभार्थी मालक, व्यवस्थापक, अधिकारी किंवा कर्मचारी यांच्यापैकी जे असतीलत्यांच्याशी संबंधित सीडीडी दस्तऐवज.

(च) वरिष्ठ व्यवस्थापन पदावर असलेल्या संबंधित व्यक्तींची नावे; आणि

(छ) नोंदणीकृत कार्यालय आणि त्याच्या व्यवसायाचे मुख्य ठिकाण, जर ते वेगळेवेगळे असेल तर

२४.पार्टनरशिप फर्मचे कर्जखाते उघडण्यासाठी खालीलपैकी प्रत्येक दस्तऐवजाच्या प्रमाणित प्रती किंवा त्यांची तत्सम ई-डॉक्युमेंट्स प्राप्त केली जातील:

(क) नोंदणी प्रमाणपत्र

(ख) पार्टनरशिप डीड

(ग) पार्टनरशिप फर्मचा परमनंट अकाऊंट नंबर

(घ) पार्टनरशिपच्या वतीने व्यवहार करण्यासाठी मुखत्यारपत्र धारण करणारे लाभार्थी मालक, व्यवस्थापक, अधिकारी किंवा कर्मचारी यांच्यापैकी जे असतील त्यांच्याशी संबंधितल कलम १६ मध्ये नमूद केलेले दस्तऐवज.

(ङ) सर्व भागीदारांची नावे आणि

(च) नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता आणि व्यवसायाचे मुख्य ठिकाण, जर ते वेगळेवेगळे असेल तर

२५.न्यासाचे कर्जखाते उघडण्यासाठी खालीलपैकी प्रत्येक दस्तऐवजाच्या प्रमाणित प्रती किंवा त्यांची तत्सम ई-डॉक्युमेंट्स प्राप्त केली जातील:

(क) नोंदणी प्रमाणपत्र

(ख) ट्रस्ट डीड

(ग) पार्टनरशिप फर्मचा परमनंट अकाऊंट नंबर

(घ) न्यासाच्या वतीने व्यवहार करण्यासाठी मुखत्यारपत्र धारण करणारे लाभार्थी मालक, व्यवस्थापक, अधिकारी किंवा कर्मचारी यांच्यापैकी जे असतील त्यांच्याशी संबंधितल कलम १६ मध्ये नमूद केलेले दस्तऐवज.

(ङ) न्यासाचे लाभार्थी, विश्वस्त, न्यासकर्ता, संरक्षक आणि लेखकांची नावे

(च) न्यासाच्या नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता; आणि

(छ) विश्वस्त म्हणून भूमिका बजावणाऱ्या आणि न्यासाच्या वतीने व्यवहार करण्यास अधिकृत असलेल्यांसाठी व्यक्तींसाठी पॉइंट सीडीडी प्रक्रियेत निर्दिष्ट केल्याप्रमाणे विश्वस्त आणि दस्तऐवजांची यादी.

२६.अनइनकॉर्पोरेटेड असोसिएशन किंवा बॉडी ऑफ इंडिव्हिज्युल्स यांचे खाते उघडण्यासाठी खालीलपैकी प्रत्येक

दस्तऐवजाच्या प्रमाणित प्रती किंवा त्यांची तत्सम ई-डॉक्युमेंट्स प्राप्त केली जातील:

(क) अशा असोसिएशच्या किंवा बॉडी ऑफ इंडिव्हिज्युअल्सच्या व्यवस्थापकीय समितीचा ठराव

(ख) अनइनकॉर्पोरेटेड असोसिएशनचा किंवा बॉडी ऑफ इंडिव्हिज्युअल्सचा परमनंट अकाऊंट नंबर किंवा फॉर्म नं. ६०.

(ग) तिच्यावतीने व्यवहार करण्यासाठी दिलेले मुखत्यारपत्र

(घ) तिच्यावतीने व्यवहार करण्यासाठी मुखत्यारपत्र धारण करणारे लाभार्थी मालक, व्यवस्थापक, अधिकारी किंवा कर्मचारी यांपैकी जे असतील त्यांचे सीडीडी दस्तऐवज आणि

(ङ) अशा असोसिएशनचे किंवा बॉडी ऑफ इंडिव्हिज्युअल्सचे कायदेशीर अस्तित्व सिद्ध करण्यासाठी कंपनीला आवश्यक वाटेल अशी माहिती.

स्पष्टीकरण: नोंदणी न झालेले न्यास/पार्टनरशिप फर्म्स यांचा समावेश 'अनइन्कॉर्पोरेटेड असोसिएशन' या शब्दप्रयोगात करण्यात येईल.

स्पष्टीकरण: 'बॉडी ऑफ इंडिव्हिज्युल्स' या शब्दप्रयोगात संस्थांचा समावेश होतो.

२७.आधीच्या भागात विशिष्ट प्रकारे मोडत नसलेल्या, संस्था, विद्यापीठे आणि ग्रामपंचायतीसारख्या स्थानिक संस्था यांच्यासारख्या कायदेशीर व्यक्तीं असलेल्या ग्राहकाच्या किंवा अशा कायदेशीर व्यक्ती किंवा न्यासाच्या वतीने कार्य करणारी व्यक्ती असलेल्या ग्राहकाच्या नावे खाते उघडताना, खालीलपैकी प्रत्येक दस्तऐवजाच्या प्रमाणित प्रती किंवा त्यांची तत्सम ई-डॉक्युमेंट्स प्राप्त करून पडताळणी केली जाईल:

(क) अशा एंटिटीच्या वतीने कृती करण्यासाठी अधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव दर्शविणारा दस्तऐवज;

(ख) त्यांच्यावतीने व्यवहार करण्यासाठी मुखत्यारपत्र धारण करणाऱ्या व्यक्तीचे, व्यक्तींसाठीच्या पॉइंट सीडीडी प्रक्रियेत मध्ये नमूद केलेले दस्तऐवज

(ग) अशा एंटिटीज्चे/कायदेशीर व्यक्तींचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी कंपनीला आवश्यक वाटतील असे दस्तऐवज.

परंतु न्यासाच्या बाबतीत, कंपनी हे सुनिश्चित करेल की विश्वस्तांनी खाते-आधारित संबंध सुरू करताना किंवा आरबीआय केवायसी मास्टर डायरेक्शनच्या कलम 13 च्या कलम (बी), (ई) आणि (एफ) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे व्यवहार करताना त्यांची स्थिती जाहीर करावी.

## भाग ४ - लाभार्थी मालकाची ओळख पटविणे

२८.नैसर्गिक व्यक्ती नसलेल्या कायदेशीर व्यक्तीचे कर्जखाते उघडण्यासाठी लाभार्थी मालकांची ओळख पटवली जाईल आणि या नियमांमधील नियम ९ मधील उप-नियम (३) च्या अनुषंगाने त्याची/तिची ओळख पडताळून पाहण्यासाठी खालील बाबी लक्षात ठेवून सर्व रास्त पावले उचलली जातील:

(क) जेव्हा ग्राहक किंवा नियंत्रण ठेवणाऱ्या हितसंबंधाचा मालक ही (i) भारतातील स्टॉक एक्सचेंजमध्ये सूचीकृत असलेली संस्था असेल (ii) केंद्र सरकारने अधिसूचित केलेल्या अधिकारक्षेत्रात रहिवासी आणि अशा अधिकारक्षेत्रातील स्टॉक एक्स्चेंजवर सूचीबद्ध असलेली संस्था असेल, किंवा (iii) अशा सूचीकृत संस्थेची दुय्यम अंगभूत कंपनी असेल, तर अशा संस्थेच्या भागधारकाची किंवा लाभार्थी मालकाची ओळख पटवून तिची पडताळणी करण्याची आवश्यकता नाही.

(ख) न्यास/नामनिर्देशित व्यक्ती किंवा विश्वासू खाते, जेथे ग्राहक दुसऱ्या व्यक्तीच्या वतीने विश्वस्त/नामनिर्देशित व्यक्ती म्हणून कृती करीत असतो किंवा अन्य कोणी मध्यस्थ निश्चित केलेला असतो. अशा बाबतीत, मध्यस्थांच्या आणि ज्या व्यक्तींच्या वतीने ते काम करीत असतात त्या व्यक्तींच्या ओळखीचे समाधानकारक पुरावे, तसेच न्यासाच्या स्वरूपाचे तपशील किंवा असलेली इतर व्यवस्था यांविषयीची माहिती प्राप्त केली जाईल.

### प्रकरण ५ - सध्याचे (ऑन-गोईंग) ड्यू डिलिजन्स

२९.ग्राहकांचे व्यवहार हे कंपनीला ग्राहकांविषयी, ग्राहकांच्या व्यवसायाविषयी आणि जोखमीच्या प्रोफाईलविषयी आणि

निधीच्या/संपत्तिच्या स्रोताविषयी असलेल्या ज्ञानाशी सुसंगत असेल ह्याची खातरजमा करण्यासाठी कंपनी ग्राहकांचे ऑन-गोईंग ड्यू डिलिजन्स करील.

३०. ज्यांच्यासाठी जवळून देखरेख करण्याची आवश्यकता आहे अशा सर्वसाधारण घटकांना बाधा न आणता, पुढील प्रकारच्या व्यवहारांवर देखरेख अवश्य केली पाहिजे:

(क) मोठे आणि गुंतागुंतीचे व्यवहार आणि ज्यांची पठडी नेहमीपेक्षा वेगळी असतते, ग्राहकाच्या नेहमीच्या आणि अपेक्षित कृतीशी विसंगत कृती, ज्यामध्ये आर्थिक सारासार विचार दिसून येत नाही किंवा कायदेशीर हेतू दिसून येत नाही.

(ख) विहित किमान मर्यादा ओलांडणारे व्यवहार

(ग) खात्यामध्ये खूप मोठी उलाढाल, जी ग्राहकाच्या प्रोफाईलशी विसंगत असेल.

(घ) तृतीय पक्षांचे चेक्स, ड्राफ्ट्स, इत्यादी पुरविणे. ऑन-गोईंग ड्यू डिलिजन्ससाठी, कंपनी प्रभावी देखरेखीस समर्थन देण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग (एआय आणि एमएल) तंत्रज्ञानासह योग्य नवकल्पनांचा अवलंब करण्याचा विचार करू शकते.

३१. देखरेखीचे प्रमाण हे ग्राहकाच्या जोखमीच्या संवर्गानुसार असेल.

स्पष्टीकरण: उच्च जोखीम असलेल्या खात्यांना अधिक कठोर देखरेखीखालून जावे लागेल.

(क) खात्यांच्या जोखमीचे संवर्गीकरणाचे ठरावीक कालावधीनंतर पुनरावलोकनाची प्रणाली, असा कालावधी हा **सहामहिन्यांतूनकिमानएकदा**असेल आणि वाढीव ड्यू डिलिजन्सच्या उपाययोजना लागू करण्याच्या आवश्यकतेचा वापर करण्यात येईल.

३२. **केवायसीचे अद्यतन/ ठरावीक कालावधीनंतर अद्यतन**

सीडीडी अंतर्गत गोळा केलेली माहिती किंवा डेटा अद्ययावत आणि प्रासंगिक ठेवला जाईल याची खात्री करण्यासाठी कंपनी केवायसीच्या वेळोवेळी अद्ययावतीकरणासाठी जोखीम-आधारित दृष्टीकोन अवलंबवेल, विशेषत: जिथे उच्च जोखीम आहे. तथापि कर्ज खाते उघडण्याच्या तारखेपासून / शेवटच्या केवायसी अद्ययावतीकरणाच्या तारखेपासून, उच्च जोखमीच्या ग्राहकांसाठी दर दोन वर्षांतून एकदा, मध्यम जोखमीच्या ग्राहकांसाठी दर आठ वर्षांतून एकदा आणि कमी जोखमीच्या ग्राहकांसाठी दर दहा वर्षांतून एकदा, खालील प्रक्रियेनुसार वेळोवेळी अद्ययावतीकरण केले जाईल:

**अ) वैयक्तिक ग्राहक:**

केवायसी माहितीमध्ये कोणताही बदल नाही: केवायसी माहितीमध्ये कोणताही बदल न झाल्यास, या संदर्भात कंपनीकडे नोंदणीकृत ग्राहकाचा ईमेल-आयडी, कंपनीकडे नोंदणीकृत ग्राहकाचा मोबाइल क्रमांक, डिजिटल चॅनेल (जसे की ऑनलाइन बँकिंग / इंटरनेट बँकिंग, कंपनीचे मोबाइल ॲप्लिकेशन), पत्र इत्यादीद्वारे ग्राहकाकडून स्व-घोषणापत्र घेतले जाईल.

पत्त्यातील बदल झाला असल्यास : केवळ ग्राहकाच्या पत्त्याच्या तपशिलांमध्ये बदल झाल्यास कंपनीकडे नोंदणीकृत ग्राहकाच्या ईमेल-आयडी, कंपनीकडे नोंदणीकृत ग्राहकाचा मोबाइल क्रमांक, डिजिटल चॅनेल्स (जसे की ऑनलाइन बँकिंग/इंटरनेट बँकिंग, कंपनीचे मोबाइल ॲप्लिकेशन), पत्र इत्यादीद्वारे नवीन पत्त्याबाबत ग्राहकाकडून स्व-घोषणापत्र घेतले जाईल आणि जसे की पत्ता पडताळणी पत्र, संपर्क बिंदू पडताळणी, डिलिव्हरेबल्स द्वारे घोषित पत्ता दोन महिन्यांच्या आत सकारात्मक पुष्टीकरणाद्वारे सत्यापित केला जाईल.

पुढे, ठरावीक कालावधीनंतरच्या अद्ययावतीकरणाच्या वेळी ग्राहकाने जाहीर केलेल्या पत्त्याच्या पुराव्याच्या हेतूने, कंपनी ही डायरेक्शनच्या 3 (क) (xiv) मध्ये परिभाषित केल्यानुसार ओव्हीडी किंवा अभिमत ओव्हीडीची प्रत किंवा डायरेक्शनच्या कलम 3 (क) (x) मध्ये परिभाषित केल्याप्रमाणे समतुल्य ई-दस्तऐवज मिळवू शकते.

खाते उघडण्याच्या वेळी अल्पवयीन असलेल्या ग्राहकांची, ते मोठे झाल्यावर, खाती : ज्या ग्राहकांचे खाते ते अल्पवयीन असताना उघडले होते त्यांच्याबाबतीत, ते मोठे झाल्यावर सध्याचे छायाचित्रे घेतली जातील आणि त्या वेळी सध्याच्या सीडीडी मानकांनुसार सीडीडी दस्तऐवज कंपनीकडे उपलब्ध आहेत याची खात्री केली. जेथे आवश्यक असेल तेथे, कंपनी अशा ग्राहकांचे नवीन केवायसी करू शकते, म्हणजे ज्या ग्राहकांसाठी खाते लहान असताना उघडले होते, ते मोठे झाल्यावर.

ठरावीक कालावधीनंतरचे अद्ययावत करण्यासाठी नॉन-फेस टू फेस मोडमध्ये आधार ओटीपी आधारित ई-केवायसीचा वापर केला जाऊ शकतो. हे स्पष्ट करण्यासाठी, आधार ओटीपी आधारित ई-केवायसीद्वारे नॉन-फेस टू फेस मोडमध्ये केवायसी अद्ययावत / ठरावीक कालावधीनंतर अद्ययावत करण्याच्या बाबतीत वर नमूद केल्याप्रमाणे पॉइंट क्रमांक 16 मध्ये नमूद केलेल्या अटी लागू नाहीत.

सध्याचा पत्ता आधारमधील पत्त्यापेक्षा वेगळा असेल तर सध्याचा पत्ता जाहीर केल्यास या प्रकरणात सकारात्मक पुष्टीची आवश्यकता भासणार नाही. कोणतीही फसवणूक टाळण्यासाठी कंपनी खात्री करेल की आधार ऑथेंटिकेशनसाठी मोबाइल नंबर ग्राहकांच्या प्रोफाइलमध्ये त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या क्रमांकासारखाच आहे.

ब) व्यक्तींव्यतिरिक्त इतर ग्राहक :

केवायसी माहितीमध्ये कोणताही बदल नसल्यास : कायदेशीर संस्था (एलई) ग्राहकाच्या केवायसी माहितीमध्ये कोणताही बदल न झाल्यास, एलई ग्राहकाकडून कंपनीकडे नोंदणीकृत त्याच्या ईमेल आयडी, (डिजिटल चॅनेलद्वारे जसे की ऑनलाइन बँकिंग/इंटरनेट बँकिंग, कंपनीचे मोबाईल ऍप्लिकेशन), या संदर्भात एलईच्या अधिकृत अधिकाऱ्याचे पत्र, बोर्ड ठराव इत्यादी द्वारे एलई ग्राहकाकडून या संदर्भात स्वयं-घोषणा प्राप्त केली जाईल. पुढे, कंपनी या प्रक्रियेदरम्यान त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या लाभदायक मालकी (बीओज) माहिती अचूक असल्याची खात्री करेल आणि आवश्यक असल्यास, ते शक्य तितके अद्ययावत ठेवण्यासाठी ते अद्यतनित करेल.

केवायसी माहितीमध्ये बदल असल्यास : केवायसी माहितीमध्ये बदल झाल्यास, कंपनी नवीन एलई ग्राहकाला ऑन-बोर्डिंग करण्यासाठी समतुल्य लागू असलेल्या केवायसी प्रक्रिया करेल.

क) अतिरिक्त उपाय: वरील व्यतिरिक्त, कंपनी हे सुनिश्चित करेल की,

सध्याच्या सीडीडी मानकांनुसार ग्राहकाची केवायसी कागदपत्रे त्याच्याकडे उपलब्ध आहेत. ग्राहकांच्या माहितीत कोणताही बदल नसला परंतु कंपनीकडे उपलब्ध कागदपत्रे सध्याच्या सीडीडी मानकांनुसार नाहीत, तरीही हे लागू आहे. पुढे, कंपनीकडे उपलब्ध असलेल्या सीडीडी दस्तऐवजांची वैधता केवायसी च्या नियतकालिक अद्यतनाच्या वेळी कालबाह्य झाल्यास, कंपनी नवीन ग्राहकाला ऑन-बोर्डिंग करण्यासाठी समतुल्य लागू असलेल्या केवायसी प्रक्रिया करेल. ग्राहकाचे पॅन तपशील, कंपनीकडे उपलब्ध असल्यास, केवायसीच्या नियतकालिक अद्यतनाच्या वेळी जारी करणाऱ्या प्राधिकरणाच्या डेटाबेसमधून सत्यापित केले जातात.

कंपनी तिला वाटेल त्यानुसार ग्राहकाला ओव्हीडीसाठी किंवा आधारच्या वापरासाठी संमती देण्यासाठी/ऑफलाईन पडताळणीसाठी ग्राहकाने प्रत्यक्ष उपस्थित राहण्याचा आग्रह धरू शकेल, ज्यात खातेधारकाने सद्भावनेने सादर केलेल्या माहिती जाणून घेण्यासाठी त्याने प्रत्यक्ष उपस्थित राहिले पाहिजे असे मानण्यास पुरेशी कारणे असली, तर त्यांचाही समावेश आहे. सामान्यत:, ओव्हीडी/ग्राहकाने मेलद्वारे/टापालाद्वारे, इत्यादी पाठवलेली संमती स्वीकारार्ह असेल.

नियतकालिक अद्ययावत करण्यासाठी ग्राहकाकडून स्व-घोषणासह, संबंधित दस्तऐवज प्राप्त झाल्याची तारीख नमूद

करणारी पोचपावती ग्राहकाला दिली जाते. पुढे, की केवायसीच्या नियतकालिक अद्यतनाच्या वेळी ग्राहकांकडून प्राप्त केलेली माहिती / दस्तऐवज कंपनीच्या रेकॉर्ड / डेटाबेसमध्ये त्वरित अद्यतनित केले जातील आणि केवायसी तपशील अद्यतनित करण्याच्या तारखेचा उल्लेख असलेली एक सूचना ग्राहका bm प्रदान केली जाईल हे सुनिश्चित केले जाईल.

ड) कंपनी ग्राहकांना सल्ला देईल की पीएमएल नियमांचे पालन करण्यासाठी, व्यवसाय संबंध / खाते-आधारित संबंध प्रस्थापित करताना आणि त्यानंतर आवश्यकतेनुसार, ग्राहकाने सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये कोणतीही अद्यतने असल्यास; ग्राहकांनी अशा कागदपत्रांचे अद्यतन कंपनीकडे सादर करावे. कंपनीच्या बाजूने नोंदी अद्ययावत करण्याच्या उद्देशाने ग्राहकांनी त्यांच्या कागदपत्रांमध्ये अद्यतनित केल्याच्या 30 दिवसांच्या आत हे केले जाईल.

**३३.** विद्यमान ग्राहकांच्या बाबतीत, कंपनी केंद्र सरकारने अधिसूचित केलेल्या तारखेपर्यंत परमनंट अकाऊंट नंबर किंवा त्यासाठीचे तत्सम ई-डॉक्युमेंट्स किंवा फॉर्म क्र. ६० प्राप्त करील, असे न केल्यास, परमनंट अकाऊंट नंबर किंवा त्यासाठीचे तत्सम ई-डॉक्युमेंट्स किंवा फॉर्म क्र. ६० सादर केले जाईपर्यंत कंपनी तात्पुरत्या स्वरूपात खात्यातील व्यवहार थांबवील.

मात्र, कर्जखात्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात व्यवहार थांबवण्यापूर्वी (म्हणजेच त्यानंतर कोणतीही रक्कम डेबिट करण्यापूर्वी) कंपनी ग्राहकाला प्राप्त होऊ शकेल अशी सूचना देईल आणि त्याची बाजू ऐकून घेण्याची रास्त संधी देईल. त्यानंतर, जे ग्राहक इजा, आजारपण किंवा वृद्धापकाळाने किंवा अन्यथा बुद्धी काम करीत नसेल्याने किंवा अशाच काही इतर कारणांमुळेपरमनंट अकाऊंट नंबर किंवा त्याचे तत्सम ई-डॉक्युमेंट किंवा फॉर्म क्र. ६० देऊ शकणार नाहीत, त्यांच्यासाठी कंपनी तिच्या अंतर्गत धोरणात ग्राहकांच्या सेवा पुढे चालू ठेवण्यासाठी योग्य ते नियमशिथिलीकरण करील. अशा ग्राहकांशी असलेले संबंध मात्र वाढीव देखरेखीच्या अधीन असतील.

त्याहीपुढे अशी तरतूद आहे की, सध्या कंपनीसोबत कर्जावर आधारित संबंध असलेल्या ग्राहकाने कंपनील असे लिहून दिले की, त्याची परमनंट अकाऊंट नंबर किंवा तत्सम ई-डॉक्युमेंट किंवा फॉर्म ६० देण्याची इच्छा नाहीए, तर कंपनी कर्जखाते बंद करील (म्हणजेच त्यानंतर कोणतेही डेबिट देणे थांबवील) आणि ग्राहकाला लागू असलेले ओळखीचे सर्व दस्तऐवज प्राप्तक करून ग्राहकाची ओळख पटल्यानंतरच सर्व दायित्वे योग्य त्या प्रकारे निकाली काढली जातील.

स्पष्टीकरण - ह्या कलमासाठी, खात्याच्या बाबतीत“व्यवहार तात्पुरत्या स्वरूपात थांबवणे” याचा अर्थ असा असेल की, जोपर्यंत ग्राहक ह्या कलमाच्या तरतुदींचे अनुपालन करीपर्यंत त्या खात्याच्या बाबतीतील सर्व व्यवहार किंवा कृती कंपनीद्वारे तात्पुरत्या स्वरूपात थांबवले जातील. अशा कर्जखात्यांच्या मालमत्ताखात्यांच्या बाबतीत, खात्याचे प्रचालन थांबविण्यासाठी, फक्त रक्कम जमा करण्यास (क्रेडिट) परवानगी दिली जाईल.

## भाग ६ - वाढीव आणि सोपी केलेली ड्यू डिलिजन्स कार्यप्रणाली

### क. वाढीव ड्यूडिलिजन्स

**३४. समोरासमोर न येणाऱ्या ग्राहकांजी कर्जखाती ऑन-बोर्डिंग (आधार ओटीपीवर आधारित ऑन-बोर्डिंग वगळून):**

समोरासमोर न येणाऱ्या (नॉन-फेस-टू-फेस) ग्राहकांच्या वाढीव ड्यू डिलिजन्ससाठी कंपनी अशी खातरजमा करील की,

पहिले पेमेंट/कर्जवाटप दुसऱ्या कंपनीसोबत ग्राहकाच्या केवायसीची पूर्तता केलेल्या खात्यातून केले जाईल.

नॉन-फेस-टू-फेस ऑनबोर्डिंगमुळे कंपनीला ग्राहकाला प्रत्यक्ष किंवा व्ही-सीआयपीद्वारे न भेटता ग्राहकाशी संबंध प्रस्थापित करण्याची सुविधा मिळते. या कलमाच्या उद्देशाने अशा नॉन-फेस-टू-फेस मोडमध्ये सीकेवायसीआर, डिजिलॉकर, समतुल्य ई-डॉक्युमेंट इत्यादी डिजिटल चॅनेल्सचा वापर आणि एनआरआय आणि पीआयओसाठी परवानगी नुसार अतिरिक्त प्रमाणित अधिकाऱ्यांकडून प्रमाणित ओव्हीडीची प्रत मिळविणे यासारख्या बिगर-डिजिटल पद्धतींचा समावेश आहे. नॉन-फेस कस्टमर ऑनबोर्डिंगसाठी (पॉइंट क्रमांक 16 च्या अनुषंगाने ग्राहक ऑनबोर्डिंग वगळता) कंपनीकडून खालील ईडीडी उपाययोजना केल्या जातील:

क) जर कंपनीने व्ही-सीआयपीची प्रक्रिया सुरू केली असेल तर तिला रिमोट ऑनबोर्डिंगसाठी ग्राहकाला पहिला पर्याय म्हणून प्रदान केली जाईल. आरबीआय मास्टर डायरेक्शनच्या उद्देशाने व्ही-सीआयपीसाठी विहित मानके आणि कार्यपद्धतींचे पालन करणारी प्रक्रिया फेस-टू-फेस सीआयपीच्या बरोबरीने मानली जाईल याचा पुनरुच्चार केला जातो.

ख) फसवणुकीला आळा घालण्यासाठी व्यवहार ओटीपी, व्यवहार अपडेट आदींसाठी सीडीडीनंतर पर्यायी मोबाइल क्रमांक अशा खात्यांशी जोडले जाणार नाहीत. कर्ज खाते उघडण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या मोबाइल क्रमांकावरूनच व्यवहारांना परवानगी देण्यात येईल. कंपनीने आपल्या सर्वात महत्वाच्या अटी आणि शर्ती (एमआयटीसी) मध्ये अशा कर्ज खात्यांमध्ये मोबाइल क्रमांक बदलण्याच्या विनंत्या हाताळण्यासाठी **ड्यूडिलिजन्स**ची निकोप प्रक्रिया परिभाषित केली आहे.

ग) चालू पत्त्याचा पुरावा मिळविण्याव्यतिरिक्त, कंपनी कर्ज खात्यात कामकाजास परवानगी देण्यापूर्वी सकारात्मक पुष्टीद्वारे चालू पत्त्याची पडताळणी करेल. पत्ता पडताळणी पत्र, संपर्क बिंदू पडताळणी, वितरण इ. द्वारे सकारात्मक पुष्टी केली जाऊ शकते.

घ) कंपनी ग्राहकाकडून पॅन घेईल आणि जारी करणाऱ्या प्राधिकरणाच्या पडताळणी सुविधेवरून पॅनची पडताळणी केली जाईल.

ङ) अशा खात्यांमध्ये पहिला व्यवहार ग्राहकाच्या विद्यमान केवायसी-अनुपालन बँक खात्यातून क्रेडिट(रक्कम जमा करणे) असेल.

च) अशा ग्राहकांना उच्च जोखमीचे ग्राहक म्हणून वर्गीकृत केले जाईल आणि नॉन-फेस टू फेस मोडमध्ये उघडलेल्या खात्यांवर समोरासमोर किंवा व्ही-सीआयपीद्वारे ग्राहकाची ओळख पडताळून पाहिल्याशिवाय वाढीव देखरेख ठेवली जाईल.

## ३५. राजकीयदृष्ट्या संवेदनशील (पॉलिटिकली एक्सपोज्ड) व्यक्तींची (पीईपीज्) कर्जखाती

क. खालील अटींच्या अधीन राहून कंपनीकडे पीपीईज्(ग्राहक किंवा लाभार्थी मालक म्हणून)सोबत संबंध प्रस्थापित करण्याचा पर्याय उपलब्ध असेल, जर परंतु सामान्य ग्राहक ड्यूडिलिजन्स करण्याव्यतिरिक्त खालील बाबी केलेल्या असतील:

(क) ग्राहक किंवा लाभार्थी मालक पीईपी आहे की नाही हे निर्धारित करण्यासाठी कंपनीकडे योग्य जोखीम व्यवस्थापन प्रणाली आहे

(ख) निधी/संपत्तीचा स्त्रोत प्रस्थापित करण्यासाठी कंपनीकडून वाजवी उपाययोजना केल्या आहेत;

(ग) ग्राहकस्वीकृती धोरणानुसार, पीईपीसाठी खाते उघडण्याची मंजूरी वरिष्ठ पातळीवर घेतली गेली आहे.

(घ) अशी सर्व खाती ऑन-गोईंग आधारावर वाढीव देखरेखीखाली आहेत.

(ङ) विद्यमान कर्जखात्याचा विद्यमान ग्राहक किंवा लाभार्थी मालक, नंतरच्या काळात पीईपी बनला, तर व्यावसायिक संबंध चालू ठेवण्यासाठी वरिष्ठ व्यवस्थापनाची परवानगी प्राप्त केलेली आहे.

(च) पीईपीज्ला लागू असलेल्या सीडीडी उपाययोजना, ऑन-गोईंग आधारावर करावयाच्या वाढीव देखरेखीसहित लागू केलेल्या आहेत.

ख. पीईपीचे कुटुंबातील सदस्य किंवा जवळचे सहकारी यांना ह्या सूचना लागू होतील.

*स्पष्टीकरण :- या कलमाच्या हेतूने, "पॉलिटिकली एक्सपोज्ड पर्सन" (पीईपी) अशा व्यक्ती आहेत ज्यांना एखाद्या परदेशाने प्रमुख सार्वजनिक कार्ये सोपविली आहेत, ज्यात राष्ट्रप्रमुख/ सरकारप्रमुख, वरिष्ठ राजकारणी, वरिष्ठ सरकारी किंवा न्यायालयीन किंवा लष्करी अधिकारी, सरकारी मालकीच्या महामंडळांचे वरिष्ठ अधिकारी आणि महत्त्वपूर्ण राजकीय पक्षाचे अधिकारी यांचा समावेश असतो.

**३६. व्यावसायिक मध्यस्थांद्वरे उघडली गेलेली ग्राहकांची कर्जखाती:**

व्यावसायिक मध्यस्थांच्या माध्यमातून कर्जखाती उघडताना, कायद्याद्वारे जे मान्य असेल त्यानुसार कंपनी पुढील बाबींची खातरजमा करील:

(क) एका ग्राहकाच्या वतीने जेव्हा व्यावसायिक मध्यस्थाद्वारे कर्जखाते उघडले जाईल तेव्हा ग्राहकाची ओळख पटवली पाहिजे.

(ख) म्युच्युअल फंड्स, पेन्शन फंड्स किंवा इतर प्रकारचे फंड्स यांच्यासारख्या एंटिटीज्च्या वतीने व्यावसायिक मध्यस्थांद्वारे व्यवस्थापन केले जात असलेली 'पूल्ड' खाती धारण करण्याचा पर्याय कंपनीकडे आहे.

(ग) ज्या व्यावसायिक मध्यस्थ संस्था (प्रोफेशनल इंटरमिडिएटरिज्) ग्राहकाची गोपनीयता राखण्यास बांधील असतील, ज्यामुले त्यांना ग्राहकाचे तपशील कंपनीकडे उघड करता येत नसतील, तर कंपनी अशा संस्थांची खाती उघडणार नाही.

(घ) जर मध्यस्थ संस्थांनी धारण केलेले फंड्स कंपनीच्या पातळीवर जर एकत्र केले जात नसतील तर सर्व लाभार्थी मालकांची ओळख पटवली जाईल. आणि जर काही उप-खाती असतील, ज्यातील प्रत्येक खाते हे लाभार्थी मालकाशी जोडता येत असेल, किंवा जर असे फंड्स कंपनीच्या पातळीवर एकत्र केले जात असतील, तर कंपनी लाभार्थी मालकांचा शोध घेईल.

(ङ) मध्यस्थ संस्था ही नियमन व पर्यवेक्षण केले जात असलेली संस्था असेल आणि तिच्याकडे ग्राहकांच्या केवायसी आवश्यकतांची पूर्तता करण्यासाठी पुरेशा प्रमाणात प्रणाली असेल, तर कंपनी स्वत:च्या विवेकाधिकारात मध्यस्थ संस्थेने केलेल्या 'कस्टमर ड्यू डिलिजन्सवर' अवलंबून राहील.

(टीप - * रिझर्व्ह बँकेच्या दिनांक 04 जानेवारी 2024 च्या परिपत्रकानुसार, राजकीयदृष्ट्या संवेदनशील व्यक्तींची व्याख्या कलम 3 (xvii) काढून टाकण्यात आली आहे आणि कलम 35- राजकीयदृष्ट्या संवेदनशील व्यक्तींची कर्ज खाती यामध्ये स्पष्टीकरण म्हणून जोडली गेली आहे.

(च) ग्राहकाला जाणून घेण्याची अंतिम जबाबदारी ही कंपनीचीच आहे.

**ख. सोपे केलेले ड्यू डिलिजन्स**

**३७. स्वयंसहायता गटांसाठी (एचएचजीज्) सोपे केलेले मापदंड**

(क) एसएचजीची कर्जखाती उघडताना एचएचजीच्या सर्व सभासदांच्या सीडीडीची आवश्यकता आवश्यक नसेल.

(ख) सर्व पदाधिकाऱ्यांचे सीडीडी पुरेसे असेल.

(ग) एसएचजीला क्रेडिट लिंकिंग करताना, या पॉलिसीच्या सीडीडी कार्यप्रणालीमध्ये उल्लेख केलेले सभासदांचे एमडी किंवा पदाधिकारी यांचे सीडीडी पुन्हा करण्याची आवश्यकता नाही.

**३८. फॉरिन पोर्टफोलिओ इन्व्हेस्टर्ससाठी (एफपीआयज्) सोपे केलेले केवायसी मापदंड**

ज्या एफपीआयज्चे व्यवहार/संबंध, लागू असलेल्या परकीय चलन आणि सरकारच्या, आरबीआयच्या आणि सेबीच्या (यापैकी जे योग्य असेल त्यानुसार) सेक्युरिटिज् मार्केट मार्गदर्शक सूचनांनुसार पोर्टफोलिओ इन्व्हेस्टमेंटअंतर्गत(पीआयएस) गुंतवणुकीसाठी पात्र असतील, ते आयकर (एफएटीसीए/सीआरएस) नियमांच्या अधीन राहून, जोडपत्र २ मध्ये उल्लेख

केलेले केवायसी दस्तऐवज स्वीकारून केले जाऊ शकतील.

मात्र त्यासाठी अशी तरतूद आहे की, कंपनी एफपीआयज्कडून किंवा त्यांच्यावतीने काम करणाऱ्या ग्लोबल कस्टोडियनकडून आवश्यक असेल तेव्हा अशी हमी घेईल की, जोडपत्र २ मध्ये तपशील दिलेले दस्तऐवज सादर केले जातील.

**३९.** कमी जोखीम असलेल्या ग्राहकांची निदर्शक यादी जोडपत्र ३ मध्ये देण्यात आलेली आहे.

## प्रकरण ७

## नोंदींचेवस्थापन

४०. पीएमएल कायदा आणि नियम यांच्या संदर्भात ग्राहकाच्या खात्याची माहिती ठेवण्यासाठी, जतन करण्यासाठी आणि माहिती देण्यासाठी पुढील पावले उचलली जातील. कंपनी हे करील -

(क) कंपनी आणि ग्राहक यांच्यामधील, देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही व्यवहारांचे सर्व आवश्यक ते तपशील, व्यवहार केल्याच्या तारखेपासून **किमान पाच वर्षे** ठेवील;

(ख) कर्जखाते उघडताना/संबंध सुरू होताना आणि व्यावसायिक संबंधांच्या दरम्यान प्राप्त केलेल्या ग्राहकांच्या ओळखीशी आणि पत्त्याशी संबंधित नोंदी, व्यावसायिक संबंध संपल्यानंतर **किमान पाच वर्षे** ठेवील;

(ग) विनंती केल्यास ओळखीच्या आणि व्यवहारांच्या नोंदी सक्षम प्राधिकरणांना त्वरेने उपलब्ध करून देईल;

(घ) काळ्या पैशाला आळा घालणे (नोंदी ठेवणे) नियम, २००५ (पीएमएल रूल्स, २००५) मधील नियम ३च्या अंतर्गत नमूद केलेल्या व्यवहारांच्या योग्य नोंदी ठेवण्यासाठी प्रणाली सुरू करील;

(ङ) पीएमएल नियम ३च्या अंतर्गत नमूद केलेल्या व्यवहारांच्या बाबतीतील आवश्यक ती सर्व माहिती ठेवील, ज्यामुळे वैयक्तिक व्यवहारांची पुनर्रचना करता येईल, ज्यात खालील बाबींचा समावेश आहे:

(i) व्यवहाराचेस्वरूप;

(ii) व्यवहाराची रक्कम आणि तो कोणत्याही चलनात केला गेला होता;

(iii) असा व्यवहार कोणत्या तारखेस केला होता; आणि

(iv) या व्यवहाराचे पक्षकार

(च) माहितीराखण्यासाठीआणिजतनकरण्यासाठीअशाप्रकारचीप्रणालीनिर्माणकरील, ज्यातून आवश्यक असेल तेव्हा किंवा सक्षम प्राधिकरणाने विनंती केल्यास डेटा सहजपणे आणि जलदपणे पुन्हा प्राप्त करता येईल;

(छ) त्यांच्या ग्राहकांच्या ओळखीच्या आणि पत्त्याच्या व नियम ३ मध्ये उल्लेख केलेल्या व्यवहारांच्या नोंदी हार्ड आणि सॉफ्ट रूपात ठेवील.

स्पष्टीकरण- या कलमाच्या उद्देशाने, "ओळखीशी संबंधित नोंदी", "ओळख नोंदी" इ. शब्दप्रयोगमध्ये ओळख डेटा, खाते फायली, व्यवसाय पत्रव्यवहार आणि केलेल्या कोणत्याही विश्लेषणाच्या परिणामांच्या अद्ययावत नोंदी समाविष्ट असतील.

४० **क.** कंपनी हे सुनिश्चित करेल की जे ग्राहक बिगर-नफा संस्था आहेत, अशा ग्राहकांचा तपशील नीती आयोगाच्या दर्पण पोर्टलवर नोंदणीकृत आहे. जर त्या नोंदणी कृत नसल्या, तर कंपनी दर्पण पोर्टलवर तपशील नोंदवेल. ग्राहक आणि कंपनी यांच्यातील व्यावसायिक संबंध संपुष्टात आल्यानंतर किंवा खाते बंद झाल्यानंतर, जे नंतर असेल अशा पाच वर्षांच्या कालावधीसाठी कंपनी अशा नोंदणीची नोंद देखील ठेवेल.

## प्रकरण ८

## फायनान्शिअल इंटेलिजन्स युनिटला माहिती देण्यासाठीच्या आवश्यकता - भारत

४१. पीएमएल (नोंदी ठेवणे) नियम, २००५च्या नियम ३ मध्ये उल्लेख केलेली माहिती फायनान्शिअल इंटेलिजन्स युनिट-इंडिया (एफआययू-आयएनडी)च्या संचालकांना यातील नियम ७ नुसार देतील. स्पष्टीकरण: या नियमांमध्ये दिनांक २२ सप्टेंबर २०१५ रोजी अधिसूचित केलेल्या तिसऱ्या सुधारणेच्या संदर्भात नियम ७च्या उप-नियम ३ व ४ मध्ये केलेल्या सुधारणेनुसार, नियम ३च्या उप-नियम (१) मधील विविध पोटकलमांमध्ये उल्लेख केलेले व्यवहार शोधून काढण्यासाठी रिपोर्टिंग एंटिटीज्ना मार्गदर्शक सूचना देण्याचे, त्यांना माहिती देण्याच्या प्रकाराचे आणि त्यासाठी कार्यप्रणाली नमूद करण्याचे व माहिती देण्याची पद्धत याबद्दल सांगण्याचे अधिकार एफआययू-आयएनडीच्या संचालकांना असतील.

४२. एफआययू-आयएनडी यांनी निर्धारित केलेले/प्रसृत केलेलेरिपोर्टिंगचे फॉरमॅट्स आणि सर्वंकष रिपोर्टिंग फॉरमॅट गाईड आणि रिपोर्टिंग एंटिटीज्ना विहित रिपोर्ट्स तयार करण्यासाठी मदत व्हावी म्हणून तयार करण्यात आलेली रिपोर्ट जनरेशन युटिलिटी आणि रिपोर्ट व्हॅलिडेशन युटिलिटी यांची नोंद घेतली जाईल. एफआययू-आयएनडी यांनी त्यांच्या संकेतस्थळावर प्रदर्शित केलेले, इलेक्ट्रॉनिक कॅश ट्रँझॅक्शन रिपोर्ट्स (सीटीआर)/सस्पिशिअस ट्रँझॅक्शन रिपोर्ट्स (एसटीआर) फाईल करण्यासाठी असलेल्या एडिटेबल इलेक्ट्रॉनिक युटिलिटिज्चा उपयोग कंपनी करून घेईल, ज्यामध्ये त्यांच्या लाईव्ह ट्रँझॅक्शन डेटामधून सीटीआर/एसटीआर काढून घेण्यासाठीची योग्य ती तांत्रिक उपकरणे अजूनही उभारलेले/स्वीकारलेले नाहीत. कंपनीचे मुख्य अधिकारी, ज्यांच्या सर्व शाखांचे अजूनही संगणकीकरण झालेले नाही, त्यांच्याकडे, ज्या शाखांचे अजून संगणकीकरण झालेले नाही, त्यांच्याकडील व्यवहारांचे तपशील मागवता येण्याची व एफआययू-आयएनडी यांच्या http://fiuindia.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेले सीटीआर/एसटीआरच्या एडिटेबल इलेक्ट्रॉनिक युटिलिटिज्च्या साह्याने हा डेटा इलेक्ट्रॉनिक फाईलमध्ये फीड करण्याची व्यवस्था असेल. रिपोर्ट करावयाची एसटीआर/सीटीआरची नमुना यादी समजण्यासाठी जोडपत्र-४ मध्ये संलग्न केलेली आहे.

४३. एफआययू-आयएनडीच्या संचालकांना माहिती देताना, व्यवहाराबद्दल माहिती देण्यात विलंब झालेला प्रत्येक दिवस किंवा चुकीचे प्रतिनिधित्व केलेल्या व्यवहारात दुरुस्ती करण्यातील, नियमांमधील नमूद केलेल्या वेळेच्या मर्यादेपेक्षा झालेला प्रत्येक दिवसाचा विलंब म्हणजे एक स्वतंत्र उल्लंघन समजले जाईल. ज्यात एसटीआर फाईल केलेले असेल, त्यात केवळ त्याच आधारावर कर्जखात्याचे व्यवहार करण्यावर कंपनी कोणतीही बंधने घालणार नाही. एसटीआर सादर करण्याची वस्तुस्थिती कंपनी सक्तपणे गोपनीय ठेवील. कोणत्याही पातळीवर ग्राहकाला गोपनीय बातमी (टिप ऑफ) दिली जाणार नाही ह्याची काळजी घेतली जाईल.

प्रत्येक कंपनी, त्याचे संचालक, अधिकारी आणि सर्व कर्मचाऱ्यांनी पीएमएल (रेकॉर्डची देखभाल) नियम, 2005 च्या नियम 3 मध्ये नमूद केलेल्या नोंदींची देखभाल आणि संचालकांना माहिती सादर करण्याची वस्तुस्थिती गोपनीय असल्याची खात्री करावी. तथापि, अशा गोपनीयतेची आवश्यकता असामान्य वाटणाऱ्या कोणत्याही व्यवहारांच्या आणि क्रियाकलापांच्या विश्लेषणाच्या मास्टर डायरेक्शनच्या कलम 4 (ख) अंतर्गत माहितीसामायिक करण्यास अडथळा आणणार नाही, जर असे कोणतेही विश्लेषण केले गेले असेल तर.

४४. संशयास्पद व्यवहार परिणामकारकपणे ओळखून त्यांची माहिती देणे शक्य व्हावे म्हणून कंपनीकडे पुरेशी प्रणाली, प्रक्रिया आणि कार्यप्रणाली असली पाहिजे, ज्यात व्यवसायाची आवश्यकता असेल त्यानुसार योग्यपणे इलेक्ट्रॉनिक माध्यमांचाही समावेश असेल.

# प्रकरण ९
# आंतरराष्ट्रीय करारांतर्गत आवश्यकता/दायित्वे

**आंतरराष्ट्रीय एजन्सीजकडून संज्ञापन (कम्युनिकेशन) –**

**बेकायदेशीर कारवाया (प्रतिबंधक) (यूएपीए) अधिनियम, 1967 अंतर्गत जबाबदाऱ्या :-**

४५. कंपनी ह्या बाबीचीखातरजमा करील की, बेकायदेशीर कृती (प्रतिबंधक) कायदा (यूएपीए) कायदा, १९६७ च्याकलम५१एनुसार आणि त्यात केलेल्या सुधारणा यांच्या संदर्भात, त्यांच्याकडे ज्या व्यक्तींचे/संस्थांचे दहशतवाद्यांशी संबंध आहेत असा संशय आहे अशा, युनायटेड नेशन्स सेक्युरिटी काऊन्सिल (यूएनएससी) यांनी मान्यता दिलेली आहे आणि ठरावीक कालावधीमध्ये परिचालित केल्या जाणाऱ्या यादीमध्ये नावे असणाऱ्या व्यक्तींच्या/संस्थांच्या नावे कोणतेही खाते असणार नाही. ह्या दोन याद्यांचे तपशीलल खालीलप्रमाणे आहेत:

(क) ज्या**"ISIL(Da'esh)&Al-QaidaSanctionsList**" ह्या नावाच्या यादीमध्ये अल्-कायदाशी संबंधित असलेल्या व्यक्तींची नावे असतात. ही ISIL&Al-QaidaSanctions List यादी https://scsanctions.un.org/ohz5jen-al-qaida.html वर उपलब्ध आहे.

(ख) सुरक्षा परिषदेच्या ठराव १९८८ (२०११) नुसार स्थापन करण्यात आलेली आणि कायम ठेवण्यात आलेली **"तालिबान प्रतिबंध यादी"** https://scsanctions.un.org/3ppp1en-taliban.html येथे उपलब्ध आहे, ज्यात तालिबानशी संबंधित व्यक्ती आणि संस्थांची नावे समाविष्ट आहेत

कंपनी वेळोवेळी सुधारित केलेल्या दहशतवाद प्रतिबंध आणि बिमोड (सुरक्षा परिषदेच्या ठरावांची अंमलबजावणी) आदेश, 2007 च्या अनुसूचीमध्ये उपलब्ध असलेल्या याद्यांचा संदर्भ देण्याची खात्री करेल. उपरोक्त याद्या म्हणजेच यूएनएससी प्रतिबंध याद्या आणि दहशतवाद प्रतिबंध आणि बिमोड (सुरक्षा परिषदेच्या ठरावांची अंमलबजावणी) आदेश, 2007 च्या अनुसूचीमधील वेळोवेळी सुधारित केलेल्या याद्या, दररोज पडताळल्या जातील आणि जोडणी, वगळणे किंवा इतर बदलांच्या संदर्भात याद्यांमध्ये कोणतेही बदल काळजीपूर्वक पालन करण्यासाठी कंपनीद्वारे विचारात घेतले जातील.

४६. या यादीतील नावांशी/संस्थांशी साम्य असलेल्या कर्जखात्यांचे तपशील एफआययू-आयएनडी यांना कळविली जाईल व त्याचबरोबर यूएपीएच्या दिनांक १४ मार्च २०१९/२ फेब्रुवारी २०२१ च्या अधिसूचनेप्रमाणे व त्यात वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार आवश्यक असल्यानुसार गृहमंत्रालयाला सल्ला दिला जाईल.

४७. वर म्हटल्याच्या व्यतिरिक्त, भारतीय रिझर्व्ह बँकेने इतर कोणत्याही कार्यक्षेत्राच्या/संस्थांच्या बाबतीत वेळोवेळी परिचालित केलेल्या इतर यूएनएससीआरज्ची नोंद घेतली जाईल.

**४८.बेकायदेशीर कृती (प्रतिबंधक) कायदा, १९६७च्या कलम ५१ए अनुसार कर्जखाते गोठवणे**

सरकारने यूएपीए अंतर्गत ठरवून दिलेली कार्यप्रणालीचे सक्तपणे पालन केले जाईल आणि शक्य होईल तेवढे त्याचे बारकाईने अनुपालन केले जाईल.

विशेषत:, खालील बाबीसाठी लागू असलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याची काळजी घेईल :

(i) अद्ययावत ठरवून दिलेली यादी इलेक्ट्रॉनिक रूपात ठेवील आणि या आदेशाच्या परिशिष्टात यादी दिलेल्या व्यक्तींची आणि संस्थांची यादी, यानंतर ज्यांचा उल्लेख डेसिग्नेटेड व्यक्ती/संस्था असा केलेला आहे, बँकेचे खाते, स्टॉक्स किंवा विमा पॉलिसीज्, इत्यादींच्या स्वरूपात बँकडे कोणतेही फंड, आर्थिक मालमत्ता किंवा आर्थिक स्रोत धारण करीत आहे किंवा काय ह्याची पडताळणी करील.

(ii) जर तिच्या कोणत्याही विशिष्ट व्यक्तीचे तपशील डेसिग्नेटेड व्यक्ती/संस्थांच्या तपशीलांशी मिळतेजुळते असतील, तर कंपनी असा ग्राहक आढळून आल्यापासून २४ तासांच्या आत तात्काळ अशा फंडांचे, आर्थिक मालमत्तांचे किंवा आर्थिक स्रोतांचे किंवा संबंधित सेवांचे तपशील, संयुक्त सचिव, (सीटीसीआर), गृहमंत्रालय, यांना फॅक्स क्र. ०११-२३०९२५६९ वर आणि ०११-२३०९२७३६ या क्रमांकावरही कळवील. हे तपशील टपालाद्वारे पाठवण्याव्यतिरिक्त, jsctcr-mha@gov.in ह्या ई-मेल आयडीवरही न चुकता पाठवले जातील.

(iii) वर (ii) मध्ये उल्लेख केलेल्या संज्ञापनाची प्रत कंपनी, जेथे हे खाते धारण केलेले असेल त्या राज्यांच्या/केंद्रशासित प्रदेशांच्या यूएपीए नोडल ऑफिसरना, नियामकांना आणि एफआयू-आयएनडी यांना कळविले जातील.

(iv) जर कोणत्याही ग्राहकाचे तपशील डेसिग्नेटेड व्यक्तींशी/संस्थांशी नि:संशय जुळत असतील, तेव्हा कंपनी अशा डेसिग्नेटेड व्यक्तींना आर्थिक व्यवहार करण्यास प्रतिबंध करील व त्याची माहिती, संयुक्त सचिव, (सीटीसीआर), गृहमंत्रालय, यांना फॅक्स क्र. ०११-२३०९२५६९ वर आणि ०११-२३०९२७३६ या क्रमांकावरही कळवील. हे तपशील टपालाद्वारे पाठवण्याव्यतिरिक्त, jsctcr-mha@gov.in ह्या ई-मेल आयडीवरही न चुकता पाठवले जातील.

(v) कंपनी वरील (ii) मध्ये वर्णन केलेल्या व्यवहारांबद्दल किंवा व्यवहार करण्याचा प्रयत्न केलेल्या व्यवहारांबद्दल एफआययू-आयएनडी यांना सप्सिशिअस ट्रँझॅक्शन रिपोर्ट (एसटीआर) द्वारे पाठवील.

(vi) योग्य असेल त्यानुसार गोठवण्याचे काम केले जाईल. खात्यांच्या बाबतीत त्यानंतर कोणत्याही डेबिट व्यवहारांना परवानगी दिली जाणार नाही. ठेवींच्या बाबतीत निधी गोठवला जाईल.

**ज्या व्यक्ती किंवा संस्था डेसिग्नेटेड नाहीएत असे पडताळणीनंतर समजल्यानंतर अशा व्यक्तींच्या/संस्थांच्या चुकून गोठवलेले निधी, आर्थिक मालमत्ता किंवा आर्थिक स्रोत किंवा संबंधित सेवा मुक्त करण्यासाठीची कार्यप्रणाली:**

(क) कोणत्याही व्यक्तीकडे किंवा संस्थेकडे सिद्ध करण्यासाठी असा पुरावा असेल की, त्यांची विद्यमान ठेव किंवा कर्जखाते हे चुकून गोठवलेले आहे, त्यांनी योग्य तो पुरावा देऊन लेखी अर्ज करावा.

(ख) कंपनीकडे जर असा अर्ज प्राप्त झाला, तर कोणत्याही व्यक्तीने किंवा संस्थेने दिलेल्या संबंधित मालमत्तेचे व त्यासोबत फंड्स, आर्थिक मालमत्ता किंवा आर्थिक स्रोत किंवा संबंधित सेवा चुकून गोठवलेल्या आहेत अशी माहिती महाराष्ट्राच्या सीटीसीआर डिव्हिजनच्या नोडल ऑफिसरना कामकाजाच्या दोन दिवसांमध्ये देईल.

(क) महाराष्ट्राचे संयुक्त सचिव (सीटीसीआर) हे महाराष्ट्राच्या सीटीसीआर विभागाचे नोडल अधिकारी असल्याने ते व्यक्तीने/सचिवाने सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे पडताळणी करण्यास सागू शकतात आणि जर त्यांचे समाधान झाले, तर ते अशा अर्जदारांच्या मालकीचे फंड्स, आर्थिक मालमत्ता किंवा आर्थिक स्रोत किंवा संबंधित सेवा मुक्त करण्याचे आदेश देऊ शकतील व त्याची माहिती कंपनीसह पक्षकारांना देतील. परंतु कोणत्याही कारणास्तव जर अशा मालमत्ता मुक्त करण्याचा आदेश कामकाजाच्या १५ दिवसांच्या आत पारित करणे शक्य झाले नाही, तर सीटीसीआर विभागाचे यूएपीए नोडल अधिकारी अर्जदाराला तसे कळवतील.

**४९. सामूहिक विनाशाची शस्त्रे (डब्ल्यूएमडी) आणि त्यांची वितरण प्रणाली (बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक) अधिनियम, 2005 (डब्ल्यूएमडी अधिनियम, 2005) अंतर्गत जबाबदाऱ्या:**

(क) कंपनी भारत सरकारच्या अर्थ मंत्रालयाने (आरबीआय मास्टर डायरेक्शनचे परिशिष्ट ३) १ सप्टेंबर २०२३ च्या आदेशाद्वारे डब्ल्यूएमडी अधिनियम, २००५ च्या कलम १२**क** नुसार निर्धारित केलेल्या "सामूहिक विनाशक शस्त्रे (डब्ल्यूएमडी) आणि त्यांची वितरण प्रणाली (बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक) अधिनियम, २००५ च्या कलम १२**क** च्या अंमलबजावणीची प्रक्रिया" **चे** काटेकोरपणे पालन सुनिश्चित करेल.

(ख) वरील आदेशाच्या परिच्छेद ३ नुसार, व्यक्ती / संस्थेचा तपशील निर्दिष्ट यादीतील तपशीलांशी जुळत असल्यास कंपनी व्यवहार

होणार नाही याची खात्री कंपनी करेल.

(ग) शिवाय, कंपनी ग्राहकाशी संबंध प्रस्थापित करताना आणि **नियमित कालावधीने,** दिलेल्या निकषांवर तपासणी करेल जेणेकरून निर्दिष्ट यादीतील व्यक्ती आणि संस्था बँक खाते इत्यादींच्या स्वरूपात कोणताही निधी, आर्थिक मालमत्ता इत्यादी धारण करीत आहेत की नाही याची पडताळणी करेल.

(घ) वरील प्रकरणांमध्ये जुळवाजुळव झाल्यास, कंपनी ने डब्ल्यूएमडी अधिनियम, 2005 च्या कलम 12 क अंतर्गत अधिकार वापरण्याचे प्राधिकरण म्हणून नियुक्त केलेल्या केंद्रीय नोडल अधिकाऱ्याला (सीएनओ) संबंधित निधी, वित्तीय मालमत्ता किंवा आर्थिक संसाधनांच्या संपूर्ण तपशीलासह व्यवहाराचा तपशील त्वरित कळवावा. पत्राची एक प्रत राज्य नोडल अधिकारी, ज्या राज्यात सदर खाते / व्यवहार आहे आणि आरबीआयला पाठविली जाईल. कंपनी एफआययू-आयएनडीसह एसटीआर दाखल करेल, ज्यात वर समाविष्ट केलेल्या खात्यांमधील केलेल्या किंवा केल्या जाणाऱ्या सर्व व्यवहारांचा समावेश असेल.

आदेशाच्या परिच्छेद १ नुसार एफआययू-इंडियाच्या संचालकांना सीएनओ म्हणून नियुक्त करण्यात आले आहे याची नोंद घ्यावी.

(ङ) कंपनी एफआययू-इंडियाच्या पोर्टलवर उपलब्ध वेळोवेळी सुधारित केलेल्या नामनिर्देशित यादीचा संदर्भ देऊ शकते.

(च) ग्राहकाकडे असलेला निधी किंवा मालमत्ता डब्ल्यूएमडी अधिनियम, २००५ च्या कलम १२ क च्या उपकलम (२) च्या खंड (क) किंवा (ख) च्या कक्षेत येईल यावर शंका घेण्यासारखे कारण असल्यास, कंपनी अशा व्यक्ती/ संस्थेला माहिती ईमेलद्वारे, फॅक्स आणि पोस्टाने, विलंब न करता सीएनओला सूचित करून, त्यांना आर्थिक व्यवहार करण्यापासून प्रतिबंधित करेल.

(छ) कलम १२ अ अन्वये मालमत्ता गोठविण्याचा आदेश कंपनीला सीएनओकडून प्राप्त झाल्यास, कंपनी विनाविलंब आदेशाचे पालन करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करेल.

(ज) आदेशाच्या परिच्छेद ७ नुसार निधी गोठविण्याची प्रक्रिया इ. पाळली जाईल. त्यानुसार, अर्जदाराने दिलेल्या गोठवलेल्या मालमत्तेच्या संपूर्ण तपशीलासह एखाद्या व्यक्ती/ संस्थेकडून प्राप्त अर्जाची प्रत कंपनीने ईमेल, फॅक्स आणि पोस्टाद्वारे दोन कार्यदिवसांच्या आत सीएनओकडे पाठविली जाईल.

५०. कंपनी दररोज https://www.mea.gov.in/Implementation-of-UNSC-Sanctions-DPRK.htm उपलब्ध असलेल्या 'यूएनएससीआर 1718 नामनिर्देशित व्यक्ती आणि संस्थांची निर्बंध यादी ' ची पडताळणी करेल, जेणेकरून यादीमध्ये जोडणी, वगळणे किंवा इतर बदलांच्या संदर्भात कोणतेही बदल विचारात घेतले जातील आणि 'डेमोक्रॅटिक पीपल्स रिपब्लिक ऑफ कोरिया ऑर्डर २०१७ अंतर्गत सुरक्षा परिषदेच्या ठरावाची अंमलबजावणी' सुनिश्चित केली जाईल, केंद्र सरकारने वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार.

५०क) उपरोक्त व्यतिरिक्त, कंपनी (क) इतर यूएनएससीआर आणि (ख) यूएपीए, 1967 च्या पहिल्या आणि चौथ्या अनुसूचीतील याद्या आणि यूएपीएच्या कलम 51 क आणि डब्ल्यूएमडी कायद्याच्या कलम 12 क च्या अंमलबजावणीवरील सरकारी आदेशांचे पालन करण्यासाठी इतर कोणत्याही सुधारणा विचारात घेईल.

50 ख) भारत ज्या आंतरराष्ट्रीय किंवा आंतरसरकारी संघटनेचा सदस्य आहे आणि केंद्र सरकारने तसे स्वीकारले आहे, अशा कोणत्याही आंतरराष्ट्रीय किंवा आंतरसरकारी संस्थेने तसे करण्यास सांगितल्यास कंपनी प्रतिकारात्मक कारवाई करेल

**५१.एफएटीएफच्या शिफारशींशी न जुळणारी किंवा पुरेशी नसलेली कार्यक्षेत्रे**

(क) देश निश्चित करण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी परिचालित केलेली एफएटीएफ स्टेटमेंट आणि सार्वजनिकरीत्या उपलब्ध असलेली माहिती, जी एफएटीएफ शिफारशी लागू होत नाहीत किंवा पुरेशा प्रमाणात लागू होत नाही ती विचारात घेतली पाहिजे. एफएटीएफने ज्या देशांसाठी हे आवाहन केले आहे त्या देशांमधील नैसर्गिक आणि कायदेशीर व्यक्तींशी (वित्तीय संस्थांसह) व्यावसायिक संबंध आणि व्यवहारांवर कंपनी प्रभावी आणि जोखमीच्या प्रमाणात वाढीव ड्यू डिलिजन्स उपाय लागू करेल.

(ख) ज्या देशांना एफएटीएफ शिफारशी आणि एफएटीएफ स्टेटमेंट्समधील कार्यक्षेत्रे पुरेशा प्रमाणात लागू होत नाहीत त्यांमधील व्यक्तींच्या (ज्यात कायदेशीर व्यक्ती आणि इतर वित्तीय संस्थांचाही समावेश आहे) बरोबरचे व्यावसायिक संबंध आणि व्यवहार यांच्याकडे खास लक्ष पुरविले जाईल.

*स्पष्टीकरण: वर संदर्भित (क) आणि (ख) प्रक्रियेत, एफएटीएफ स्टेटमेंटमध्ये उल्लेख केलेल्या देशांच्या आणि कार्यक्षेत्रांच्या सोबत असलेल्या कायदेशीर व्यापार आणि व्यवसायांना वगळले जाणार नाही.*

(ग) ज्या देशांना एफएटीएफ शिफारशी आणि एफएटीएफ स्टेटमेंट्समधील कार्यक्षेत्रे पुरेशा प्रमाणात लागू होत नाहीत त्यांमधील व्यक्तींच्या (ज्यात कायदेशीर व्यक्ती आणि इतर वित्तीय संस्थांचाही समावेश आहे) त्यांच्यासोबतच्या व्यवहारांची पार्श्वभूमी आणि हेतू यांची शहानिशा केली जाईल आणि त्याबद्दलचे लेखी निष्कर्ष व त्यासोबतचे दस्तऐवज ठेवून घेतले जातील आणि ते रिझर्व्ह बँकेला/इतर संबंधित प्राधिकरणांना विनंती केल्यास उपलब्ध करून दिले जातील.

# प्रकरण १०

## इतर सूचना

**५२.माहितीची गुप्तता आणि ती इतरांना देणे:**

(क) कंपनी आणि ग्राहक यांच्यामध्ये करारांतर्गत उघड झालेल्या ग्राहकासंबंधीच्या माहितीच्या बाबतीत कंपनी गुप्तता पाळील.

(ख) कर्जखाते उघडण्यासाठी ग्राहकाकडून गोळा केलेली माहिती गुप्त समजली जाईल आणि तिचे तपशील ग्राहकाची स्पष्ट परवानगी असल्याखेरीज,क्रॉस सेलिंगसाठी किंवा इतर कोणत्याही उद्देशासाठी उघड केली जाणार नाही.

(ग) सरकार आणि इतर एजन्सीज्कडून डेटा/माहितीसाठी केलेली विनंती विचारात घेताना, मागितलेली ही माहिती अशा स्वरूपाची नाही की, त्यामुळे कंपनीच्या व्यवहारांच्या गुप्ततेशी संबंधित कायद्यांचे उल्लंघन होणार नाही याबद्दल कंपनी स्वत:चे समाधान करून घेईल.

(घ) या नियमाला अपवाद असलेल्या बाबी खालीलप्रमाणे आहेत:

i. जेव्हा अशी माहिती उघड करणे कायद्याने अनिवार्य असेल;
ii. जेव्हा माहिती उघड करणे ही सार्वजनिक जबाबदारी असेल;
iii. कंपनीच्या हितासाठी माहिती उघड करणे आवश्यक असेल;
iv. जेव्हा ग्राहकाच्या स्पष्टकिंवानिहित संमतीने माहिती उघड केलेली असेल;

**५२.क. विदेशी देणगी (नियमन) अधिनियम, २०१० मधील तरतुदींचे पालन**

कंपनी विदेशी देणगी (नियमन) अधिनियम, २०१० मधील तरतुदी आणि त्याअंतर्गत असलेल्या नियमांचे पालन सुनिश्चित करेल. तसेच, भारत सरकारच्या गृह मंत्रालयाकडून मिळालेल्या सल्ल्याच्या आधारे रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी जारी केलेल्या कोणत्याही सूचना / संप्रेषणांचे काटेकोरपणे पालन करणे देखील कंपनी सुनिश्चित करेल.

**५३.सीडीडी कार्यप्रणाली आणि सेंट्रल केवायसी रेकॉर्ड्स रजिस्ट्रीला (सीकेवायसीआर) माहिती देणे**

(क) भारत सरकारने सेंट्रल रजिस्ट्री ऑफ सिक्युरिटायझेशन ॲसेट रिकन्स्ट्रक्शन ॲंड सिक्युरिटी इंटरेस्ट ऑफ इंडिया (सीईआरएसएआय) ला राजपत्रित अधिसूचना क्र. एस.ओ. ३१८३ (ई) दिनांक २६ नोव्हेंबर २०१५ द्वारे सीकेवायसीआरचे कार्य करण्यासाठी अधिकृत केले आहे. कंपनी सदर कायद्यानुसार आवश्यक ती सर्व पावले उचलेल.

(ख) पीएमएल नियमांमधील नियम ९(१ए) मधील तरतुदींच्या अनुषंगाने कंपनी ग्राहकांचे केवायसी नोंदी प्राप्त करील आणि ग्राहकासोबत खात्यावर आधारित संबंध सुरू झाल्यापासून कामकाजाच्या १० दिवसांच्या आत सीकेवायसीआरवर अपलोड करील.

(ग) केवायसी डेटा अपलोड करण्यासाठीची ऑपरेशनल मार्गदर्शक तत्त्वे सीईआरएसएआयने जारी केली आहेत.

(घ) कंपनी 'व्यक्ती' आणि 'कायदेशीर संस्था' (एलई) साठी तयार केलेल्या केवायसी टेम्पलेट्सनुसार नियमांमध्ये नमूद केलेल्या पद्धतीने सीकेवायसीआरशी सामायिक करण्यासाठी केवायसीची माहिती घेईल. टेम्पलेट्स वेळोवेळी आवश्यकतेनुसार सुधारित केले जाऊ शकतात आणि सीईआरएसएआयद्वारे जारी केले जाऊ शकतात.

(ङ) सीकेवायसीआरची 'लाइव्ह रन' ही १५ जुलै २०१६ पासून टप्प्याटप्प्याने नव्या 'वैयक्तिक खात्यां'पासून सुरू झाली. त्यानुसार शेड्युल्ड कमर्शिअल बँकांनी (एससीबी) 1 जानेवारी 2017 रोजी किंवा त्यानंतर उघडलेल्या सर्व नवीन वैयक्तिक खात्यांशी संबंधित केवायसी डेटा सीकेवायसीआरकडे न चुकता अपलोड करणे आवश्यक आहे. जानेवारी २०१७ मध्ये उघडण्यात आलेल्या खात्यांसंदर्भातील माहिती अपलोड करण्यासाठी एससीबींना सुरुवातीला १ फेब्रुवारी २०१७ पर्यंतची मुदत देण्यात आली होती.

एससीबी वगळता इतर आरईंना ibid नियमांच्या तरतुदींनुसार 1 एप्रिल 2017 पासून किंवा त्यानंतर उघडलेल्या सर्व नवीन वैयक्तिक खात्यांशी संबंधित केवायसी डेटा सीकेवायसीआरकडे अपलोड करणे आवश्यक होते.

(च) कंपनी, ibid नियमांच्या तरतुदींनुसार 1 एप्रिल 2021 रोजी किंवा त्यानंतर उघडलेल्या एलईच्या खात्यांशी संबंधित केवायसी रेकॉर्ड सीकेवायसीआरकडे अपलोड करेल. सीईआरएसएआयने जारी केलेल्या एलई टेम्पलेटनुसार केवायसी रेकॉर्ड अपलोड करावे लागतील.

(छ) एकदा सीकेवायसीआरद्वारे केवायसी आयडेंटिफायर तयार झाल्यानंतर, कंपनी हे सुनिश्चित करेल की ते ,व्यक्ती किंवा एलईला, जे असतील त्यांना, कळविले जाईल.

(ज) सर्व केवायसी नोंदी सीकेवायसीआरवर वाढत्या क्रमाने अपलोड केल्या जातील याची खात्री करण्यासाठी, कंपनी या पॉलिसीच्या पॉइंट 32 मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे नियतकालिक अपडेटच्या वेळी, किंवा त्यापूर्वी, जेव्हा` अद्ययावत केवायसी माहिती ग्राहकाकडून प्राप्त / प्राप्त केली जाते, तेव्हा (ई-ड) आणि (एफ-च) नुसार वरील तारखांपूर्वी उघडलेल्या वैयक्तिक ग्राहक आणि एलईच्या खात्यांशी संबंधित केवायसी डेटा अपलोड / अद्ययावत करेल,

(झ) कंपनी ह्या गोष्टीची खातरजमा करील की, आवर्ती अद्यतनाच्या कालावधीत ग्राहकांचे मायग्रेशन चालू सीडीडी स्टँडर्डमध्ये करील.

(ञ) ग्राहकाने खात्यावर आधारित संबंध प्रस्थापित करण्यासाठी सीकेवायसीआरकडून डाऊनलोड करण्याची स्पष्ट परवानगी घेऊन कंपनीकडे केवायसी आयडेंटिफायर सादर केले, तर कंपनी केवायसी आयडेंटिफायरचा वापर करून सीकेवायसीआरकडून केवायसी रेकॉर्ड्स ऑनलाईन प्राप्त करील आणि ग्राहकाला तेच केवायसी रेकॉर्ड्स किंवा माहिती किंवा माहितीचे इतर कोणतेही अतिरिक्त दस्तऐवज किंवा तपशील सादर करण्याची आवश्यकता नसेल, जर पुढील बाबी घडल्या नसतील तर:

(i) सीकेवायसीआरच्या नोंदींमध्ये असलेल्या ग्राहकाच्या माहितीत बदल झाला असेल;

(ii) ग्राहकाचा सध्याचा पत्ता पडताळून पहायचा असेल;

(iii) ग्राहकाच्या ओळखीची किंवा पत्त्याची पडताळणी करण्याचे आदेश देण्याची आवश्यकता आहे असे कंपनीला वाटले किंवा वाढीव ड्यू डिलिजन्स करण्यासाठी किंवा ग्राहकाचे योग्य ते रिस्क प्रोफाईल तयार करण्यासाठी.

(iv) सीकेवायसीआरवरून डाऊनलोड केलेल्या कागदपत्रांची वैधता मुदत संपली आहे.

**५४. फॉरिन अकाऊंट टॅक्स कंप्लायन्स ॲक्ट(एफएटीसीए) आणि कॉमन रिपोर्टिंग स्टँडर्ड्स (सीआरएस) अंतर्गत रिपोर्टिंगच्या आवश्यकता**

एफएटीसीए आणि सीआरएस अंतर्गत कंपनी आयकर कायद्याच्या कलम ११४एफ, ११४जी आणि ११४एच यांचे पालन करील आणि आयकर कायद्याच्या कलम ११४एफ मध्ये व्याख्या दिल्यानुसार, त्या रिपोर्टिंग फायनान्शिअल इन्स्टिट्यूट्स आहेत किंवा काय हे निश्चित करील आणि तसे असेल, तर रिपोर्टिंगच्या आवश्यकता पूर्ण करण्यासाठी पुढील पावले उचलील:

(क) आयकर विभागाच्या संबंधित ई-फायलिंग पोर्टलवरील https://incometaxindiaefiling.gov.in/postlogin-->MyAccount-->Register as ReportingFinancialInstitution या लिंकवर रिपोर्टिंग फायनान्शिअल इन्स्टिट्यूशन्स म्हणून नोंदणी करील.

(ख) फॉर्म ६१बी किंवा 'निल' रिपोर्ट अपलोड करून 'डेसिग्नेटेड डायरेक्टरच्या' सहीचा वापर करून ऑनलाईन रिपोर्ट्स सबमिट करील, ज्यासाठी सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेस (सीबीडीटी) यांनी तयार केलेला स्कीमाचा संदर्भ घेतला जाईल.

*स्पष्टीकरण: नियम ११४एच च्या अनुषंगाने रिपोर्टेबेल अकाऊंट्स शोधून काढण्यासाठी ड्यू डिलिजन्स कार्यप्रणाली पार पाडण्याकरिता कंपनी फॉरिन एक्सचेंज डीलर्स असोसिएशन ऑफ इंडिया (फेडाई) यांनी त्यांच्या http://www.fedai.org.in/ RevaluationRates.aspx ह्या संकेतस्थळावर प्रकाशित केलेल्या स्पॉट रेफरन्स रेटचा संदर्भ घेईल.*

(ग) नियम ११४एच मध्ये तरतूद असल्यानुसार, ड्यू डिलिजन्स कार्यप्रणाली पार पाडण्यासाठी आणि तिची नोंद ठेवून ती राखण्यासाठी माहिती तंत्रज्ञान (आयटी) चौकट विकसित करील.

(घ) आयकर कायद्यातील नियम ११४एफ, ११४जी आणि ११४एच चे पालन करण्यासाठी आयटी फ्रेमवर्कसाठी लेखापरीक्षण प्रणाली विकसित करील.

(ङ) अनुपालन करण्यासाठी डेसिग्नेटेड डायरेक्टरच्या किंवा इतर कोणत्याही तत्सम फंक्शनरीच्या अखत्यारीत "हाय लेव्हल मॉनिटरिंग कमिटी" किंवा रिस्क कमिटी स्थापन करील.

(च) या विषयावर सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेस (सीबीडीटी) यांनी वेळोवेळी अद्ययावत केलेल्या http://www.incometaxindia.gov.in/Pages/default.aspx या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या सूचना/नियम/मार्गदर्शक टिप्पण्या/प्रसिद्धीपत्रके यांचे अनुपालन करील. कंपनी खालील बाबींची नोंद घेईल:

१. एफएटीसीए आणि सीआरएसवरील अद्ययावत केलेल्या मार्गदर्शक टिप्पण्या
२. नियम ११४एच (८) अंतर्गत 'क्लोजर ऑफ फायनान्शिअल अकाऊंट्स' वरील प्रसिद्धीपत्रक.

**५५.पेमेंटसंबंधीच्यासूचनासादरकरण्यासाठीकालावधी**

धनादेश/ड्राफ्ट्स/पे ऑर्डर्स/बँकर्स चेक्स, हे त्या-त्या इन्स्ट्रुमेंटच्या तारखेपासून तीन महिन्यांनंतर सादर करण्यात आले तर त्यांचे पेमेंट केले जाणार नाही.

**५६. खात्यांचे प्रचालन आणि मनी म्यूल्स (फसवल्या गेलेल्या व्यक्ती)**

खाती उघडण्यासंबंधीच्या आणि व्यवहारांवर देखरेख ठेवण्यासंबंधीच्या सूचनांचे पालन कठोरपणे केले गेलेच पाहिजे, ज्यामुळे जे गुन्हेगार, 'मनी म्यूल्स' म्हणून काम करण्यासाठी तृतीय पक्षांची भरती करतात आणि त्यांच्याद्वारे बेकायदेशीरपणे ठेवखात्यापर्यंत पोहोचतात व फसवणुकीतून मिळवलेला पैसा (उदा. फिशिंग करून आणि ओळख चोरून)

पांढरा करण्यासाठी अशा 'मनी म्यूल्स'चा वापर करतात, त्यांचे व्यवहार, कंपनीशी एक एचएफसी म्हणून संबंधित असेपर्यंत कमीतकमी करणे शक्य होईल. मनी म्यूल्स म्हणून चालविल्या जाणाऱ्या खात्यांची ओळख पटविण्यासाठी आणि एफआययू-आयएनडीला संशयास्पद व्यवहारांची माहिती देण्यासह योग्य ती कारवाई करण्यासाठी कंपनी कठोर उपाययोजना आणि काटेकोर देखरेख करेल. ह्याचे अनुपालन करण्यासाठी आवश्यक आणि लागू असतील त्या सर्व सावधानतेचे उपाय केले जातील.

**५७. अकाऊंट पेयी चेक्स गोळा करणे**

कर्जखात्यांसाठी पेयी (कर्जदार) वगळता अन्य कोणत्याही व्यक्तीकडून धनादेश गोळा करण्यात येणार नाहीत. कंपनी स्वत:च्या इच्छेने, तिचे जे ग्राहक को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी असतील, त्यांचे पन्नास हजार रुपयांहून कमी रकमेचे अकाऊंट पेयी चेक्स गोळा करील, मात्र त्यासाठी असे आदाता (पेयी) अशा को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे घटक (कंन्स्टिट्यूअंट्स) असले पाहिजेत.

५८. नवीन वैयक्तिक ग्राहकांसोबत, तसेच विद्यमान ग्राहकांसोबतही संबंध प्रस्थापित करताना कंपनीद्वारे आणि एनबीएफसीद्वारे युनिक कस्टमर आयडेंटिफिकेशन कोड (यूसीआयसी) देण्यात येईल.

५९. एचएफसी म्हणून लागू असेल तोपर्यंत कर्जखात्यांशी संबंधित **नवीन तंत्रज्ञान उपयोगात आणणे -**

नवीन किंवा विकसनशील तंत्रज्ञानातून उद्भवू शकणाऱ्या काळे पैसे पांढरे करण्याच्या किंवा दहशतवाद्यांना पैसे पुरविण्याच्या प्रकरणांकडे पुरेसे लक्ष पुरविण्यात येईल आणि कंपनी एक एचएफसी म्हणून जोपर्यंत संबंधित आहे, तोपर्यंत नवीन उत्पादने/सेवा/तंत्रज्ञान सुरू करण्यापूर्वी योग्य त्या केवायसी कार्यप्रणाली वेळोवेळी जारी करण्यात आल्याची खातरजमा केली जाईल.

कंपनी नवीन उत्पादने आणि नवीन वितरण यंत्रणेसह नवीन व्यवसाय पद्धतींच्या विकासासंदर्भात उद्भवू शकणाऱ्या एमएल / टीएफ जोखीम ओळखेल आणि त्यांचे मूल्यांकन करेल आणि नवीन व आधीपासून अस्तित्वात असलेल्या अशा दोन्ही उत्पादनांसाठी नवीन किंवा विकसनशील तंत्रज्ञानाचा वापर करेल.

याव्यतिरिक्त, कंपनी हे सुनिश्चित करेल की:

(अ) अशी उत्पादने, पद्धती, सेवा, तंत्रज्ञान सुरू करण्यापूर्वी किंवा वापरण्यापूर्वी एमएल / टीएफ जोखीम मूल्यांकन करणे; आणि

(ब) योग्य ईडीडी उपाय योजना आणि व्यवहार देखरेख इत्यादींद्वारे जोखीम व्यवस्थापित करण्यासाठी आणि कमी करण्यासाठी जोखीम-आधारित दृष्टिकोनाचा अवलंब करणे.

**६०. पॅनचा उल्लेख करणे**

ग्राहकासोबत व्यवहार करताना, वेळोवेळी सुधारित करण्यात आलेल्या आयकर कायद्यातील कंपनीला लागू असलेल्या नियम ११४बी मधील तरतुदीनुसार ग्राहकाचा परमनंट अकाऊंट नंबर (पॅन) किंवा त्याचे तत्सम ई-डॉक्युमेंट प्राप्त केले पाहिजे. ज्या व्यक्तींकडे पॅन किंवा त्याचे तत्सम ई-डॉक्युमेंट नसेल, त्यांच्याकडून फॉर्म ६० प्राप्त केला पाहिजे.

**६१. तृतीय पक्षांची उत्पादने विकणे-**

तृतीय पक्षांची उत्पादने विकताना, वेळोवेळी लागू असलेल्या नियमावलींनुसार एजंट म्हणून काम करीत असताना कंपनी ह्या पॉलिसीच्या अनुषंगाने पुढील बाबींचे पालन करील:

(क) ह्या पॉलिसीनुसार आवश्यक असल्याप्रमाणे पन्नास हजार रुपयांवरील व्यवहारांकरिता, येणाऱ्या ग्राहकांची (वॉक-

ईन कस्टमर्स) ओळख आणि पत्ता पडताळून पाहिले जातील.

(ख) ह्या पॉलिसीनुसार आवश्यक असल्याप्रमाणे तृतीय पक्षांच्या उत्पादनांच्या नोंदी आणि इतर संबंधित नोंदीं ठेवल्या जातील.

(ग) तृतीय पक्षांच्या उत्पादनांशी संबंधित, ज्यात वॉक-ईन ग्राहकांचाही समावेश आहे, त्यांच्याशी संबंधित व्यवहारांचे सीटीआर/एसटीआर फायलिंग करण्यासाठी अलर्ट्स पकडणारे, निर्माण करणारे आणि त्यांचे विश्लेषण करणारे एएमएल सॉफ्टवेअर उपलब्ध असेल.

(घ) पन्नास हजार रुपये किंवा त्यावरील रकमेचे व्यवहार फक्त खालील बाबतीत केले जातील:

• ग्राहकांच्याखात्यातडेबिटकिंवाचेक्ससाठी; आणि

• ग्राहकाने दिलेले पॅन प्राप्त करणे आणि त्याची पडताळणी करणे.

(ङ) वरील (घ) मधील सूचना कंपनीच्या स्वत:च्या उत्पादनांना, क्रेडिट कार्ड्सची येणे रक्कम/प्रीपेड कार्ड्सची/ट्रॅव्हल कार्ड्सची विक्री आणि रिलोड करणे आणि इतर कोणतेही पन्नास हजार रुपये किंवा त्यापेक्षा अधिक किमतीची उत्पादने यांनाही लागू असतील.

**६२. कर्मचाऱ्यांना नोकरी देणे आणि कर्मचारीप्रशिक्षण**

(क) त्यांच्या कर्मचाऱ्यांची भरती करण्यासाठी/नोकऱ्या देण्यासाठी आपले कर्मचारी / कामगार जाणून घ्या धोरणसह पुरेशी स्क्रीनिंग यंत्रणा हा एक अंतर्गत भाग म्हणून उपयोगात आणला जाईल.

(ख) केवायसी / एएमएल / सीएफटी प्रकरणांशी संबंधित / नियुक्त केल्या जाणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये उच्च प्रामाणिकपणा आणि नैतिक मानके, विद्यमान केवायसी / एएमएल / सीएफटी मानकांची चांगली समज, प्रभावी संप्रेषण कौशल्ये आणि राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर बदलत्या केवायसी / एएमएल / सीएफटी लँडस्केपशी जुळवून घेण्याची क्षमता आहे हे सुनिश्चित करण्यासाठी कंपनी प्रयत्न करेल. कंपनी एक असे वातावरण विकसित करण्याचा प्रयत्न करेल जे कर्मचाऱ्यांमध्ये मुक्त संवाद आणि उच्च सचोटीला प्रोत्साहन देईल.

(ग) कामावर असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षणकार्यक्रम राबवले जातील, ज्यामुळे कर्मचाऱ्यांना केवायसी /एएमएल/सीएफटी पॉलिसीविषयी पुरेसे प्रशिक्षण मिळेल. फ्रंटलाईन स्टाफ, कंप्लायन्स स्टाफ आणि नवीन ग्राहकांसोबत व्यवहार करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षणाचा केंद्रबिंदू वेगवेगळा असेल. ग्राहकांमधील शिक्षणाच्या अभावाला हाताळण्यासाठी फ्रंट डेस्क स्टाफला विशेष प्रशिक्षण दिले जाईल. पुरेशा प्रमाणात प्रशिक्षण दिलेल्या आणि कंपनीच्या केवायसी /एएमएल/सीएफएल पॉलिसीज्चे, नियमावलींचे आणि संबंधित समस्यांचे उत्तम ज्ञान असलेल्या कर्मचाऱ्यांना लेखा कार्यासाठी वापरले जाईल.

## जोडपत्र १
## डिजिटल केवायसीची प्रक्रिया

क. कंपनी डिजिटल केवायसीसाठी शक्यतो ॲप्लिकेशनविकसितकरील, जे त्यांच्या ग्राहकांचे केवायसी करण्यासाठी ग्राहकांच्या टच पॉईंट्सवर उपलब्ध करून दिले जाईल आणि केवायसीची प्रक्रिया शक्यतो फक्त कंपनीच्या ह्या अधिकृत ॲप्लिकेशनच्यामाध्यमातूनपारपाडलीजाईल. कंपनीच्या संचालक मंडळाने मान्यता दिलेल्या क्रेडिट पॉलिसीनुसार सर्व

ग्राहकांकडून प्राप्त करण्यात आलेले केवायसी दस्तऐवज वैध आणि बंधनकारक समजले जातील, जे आरबीआय/एनएचबी यांनी अधिसूचित आणि परिचालित केलेल्या नियामक तरतुदींचे पालन करण्याच्या अधीन असतील.

ख. ॲप्लिकेशनच्या वापरावर कंपनीचे नियंत्रण असेल आणि त्याचा वापर अनधिकृत व्यक्ती करणार नाहीत ह्याची काळजी घेतली जाईल. ह्या ॲप्लिकेशन लाफक्त कंपनीने तिच्या अधिकृत कर्मचा ऱ्यांना दिलेल्या नियंत्रित यंत्रणेच्या माध्यमातून लॉगिन-आयडी आणि पासवर्ड किंवा लाईव्ह ओटीपी किंवा टाईम ओटीपीच्या माध्यमातूनच ॲक्सेस करता येईल.

ग. ग्राहकाने केवायसीसाठी कंपनीच्या अधिकृत कर्मचाऱ्याच्या ठिकाणावर भेट दिली पाहिजे किंवा ह्याच्या उलट कर्मचारी ग्राहकाकडे जाईल. मूळ ओव्हीडी ग्राहकाच्या ताब्यात असेल.

घ.कंपनीने ह्याची काळजी घेतलीच पाहिजे की, ग्राहकाचा लाईव्ह फोटोग्राफ कंपनीच्या अधिकृत कर्मचाऱ्याद्वारे घेतला जाईल आणि तो फोटोग्राफ ग्राहकाच्या अर्जावर (सीएएफ) चिकटवला जाईल. त्यानंतर, कंपनीच्या सिस्टीम ॲप्लिकेशनद्वारेसीएएफक्रमांक, जीपीएस कोऑर्डिनेट्स, अधिकृत अधिकाऱ्याचे नाव, युनिक एंप्लॉयी कोड (कंपनीने दिलेला) आणि तारेखेचा (दिदि:मम:वव) आणि वेळेचा (तास:मिनिट:सेकंद) स्टॅंप असलेला वॉटर मार्क, वाचता येईल अशा पद्धतीने लावला पाहिजे.

ङ.कंपनीच्या ॲप्लिकेशन मध्ये असे वैशिष्ट्य असेल की, फक्त लाईव्ह फोटोग्राफच घेता येतील आणि ग्राहकाचे छापील किंवा व्हिडिओ-ग्राफ्ड फोटोग्राफ्स घेता येणार नाहीत. ग्राहकाचा फोटोग्राफ घेताना त्याच्या पार्श्वभूमीचा रंग पांढरा असला पाहिजे आणि ग्राहकाचा फोटोग्राफ घेताना इतर कोणतीही  व्यक्ती त्या चौकटीत येणार नाही ह्याची काळजी घ्यावी.

च. त्याचप्रमाणे, जर ऑफलाईन पडताळणी केली जाऊ शकत नाही मूळ ओव्हीडीचा किंवा आधार असल्याच्या पुराव्याचा लाईव्ह फोटोग्राफ (क्षितिजसमांतर ठेवून) वरून उभा घेतला पाहिजे व वर उल्लेख केल्याप्रमाणे वाचता येण्याजोगे वॉटर-मार्किंग केले पाहिजे. मूळ दस्तऐवजाचा लाईव्ह फोटोग्राफ घेताना मोबाईल डिव्हाईस अससममिती किंवा तिरपे करू नये.

छ. ग्राहकाचा आणि मूळ दस्तऐवजाचा लाईव्ह फोटोग्राफ योग्य त्या प्रकाशात घ्यावा, ज्यामुळे ते स्पष्टपणे वाचता आणि ओळखता येतील.

ज. त्यानंतर, ग्राहकाच्या अर्जातील सर्व जागा दस्तऐवजांप्रमाणे आणि ग्राहकाने दिलेल्या माहितीनुसार भरल्या पाहिजेत. ज्या दस्तऐवजांमध्ये क्विक रिस्पॉन्स (क्यूआर) कोड उपलब्ध असेल, त्यांच्यातील तपशील हाताने भरण्याऐवजी क्यूआर कोड स्कॅन करून आपोआप भरले जातील. उदाहरणार्थ, यूआयडीएआयमधून डाऊनलोड केलेल्या आधार कार्डमध्ये/ई-आधारमध्ये जेथे क्यूआर कोड उपलब्ध असतो, तेथे नाव, लिंग, जन्मतारीख आणि पत्ता यांसारखे तपशील आधारवर/ई-आधारवर असलेला क्यूआर कोड स्कॅन करून आपोआप भरले जातील.

झ. वर उल्लेख केलेली प्रक्रिया एकदा पूर्ण झाली, की 'ओटीपी शेअर करण्यापूर्वी कृतया फॉर्ममध्ये भरलेले तपशील

पडताळून पहा' असा मजकूर असलेला वन टाईम पासवर्ड (ओटीपी) मेसेज ग्राहकाच्या मोबाईल क्रमांकावर पाठविण्यात येईल. ओटीपी यशस्वीपणे व्हॅलिडेट केला गेल्यानंतर त्याला अर्जावरील ग्राहकाचे हस्ताक्षर समजले जाईल. परंतु ग्राहकाकडे स्वत:चा मोबाईल क्रमांक नसेल, तर त्याच्या/तिच्या कुटुंबातील/नातेवाइकांचा/ओळखीच्या व्यक्तींचा मोबाईल क्रमांक यासाठी वापरता येऊ शकेल आणि त्याचा तसा स्पष्ट उल्लेख ग्राहकाच्या अर्जात केला पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत, कंपनीकडे नोंदणीकृत असलेल्या अधिकृत अधिकाऱ्याचा मोबाईल क्रमांक ग्राहकाच्या हस्ताक्षरासाठी वापरला जाणार नाही. कंपनीने हे तपासून पाहिलेच पाहिजे की, ग्राहकाच्या हस्ताक्षरासाठी वापरलेला मोबाईल क्रमांक हा अधिकृत अधिकाऱ्याचा मोबाईल क्रमांक नाहीए.

ञ. ग्राहकाचा आणि मूळ दस्तऐवजांचा लाईव्ह फोटोग्राफ घेतल्याचे घोषणापत्र अधिकृत अधिकाऱ्याने दिले पाहिजे. यासाठी अधिकृत कर्मचाऱ्याची पडताळणी वन टाईम पासवर्ड (ओटीपी) द्वारे केली जाईल, जो कंपनीकडे नोंदवलेल्या मोबाईल क्रमांकावर पाठवला जाईल. ओटीपी यशस्वीपणे व्हॅलिडेट केल्यानंतर, त्याला ह्या घोषणापत्रावरील अधिकृत अधिकाऱ्याचे हस्ताक्षर समजले जाईल.

ट. ह्या सगळया कृतींनंतर ही प्रक्रिया पूर्ण झाल्याची आणि कंपनीच्या ॲक्टिव्हेशन ऑफिसरला ॲक्टिव्हेशनची विनंती सादर केल्याची माहिती ॲप्लिकेशन देईल वया प्रक्रिये चाट्रँझॅक्शन आयडी/रेफरन्स आयडी क्रमांकसुद्धा जनरेट करील. अधिकृत अधिकारी ग्राहकाला भविष्यातील संदर्भांसाठी ट्रँझॅक्शन आयडी/रेफरन्स आयडी क्रमांकाचे तपशील कळवील.

ठ. कंपनीचे अधिकृत अधिकारी हे तपासून आणि पडताळून पाहतील:- (१) दस्तऐवजाच्या छायाचित्रात उपलब्ध असलेली माहिती ग्राहकाच्या अर्जात अधिकृत अधिकाऱ्याने भरलेल्या माहितीशी जुळत आहे. (२) ग्राहकाचा लाईव्ह फोटोग्राफ दस्तऐवजात उपलब्ध असलेल्या फोटोग्राफशी जुळत आहे; आणि (३) ग्राहकाच्या अर्जातील आवश्यक ते सर्व तपशील योग्यपणे भरलेले आहेत.

ड. यशस्वीपणे पडताळणी केल्यानंतर, ग्राहकाच्या अर्जावर कंपनीचे अधिकृत अधिकारी डिजिटल हस्ताक्षर करतील, जे ग्राहकाच्या अर्जाची प्रिंट घेतील, त्यावर योग्य जागी ग्राहकाची सही/अंगठ्याचा ठसा घेतील, त्यानंतर तो स्कॅन करून सिस्टीममध्ये अपलोड करतील. मूळ हार्ड कॉपी ग्राहकाला परत दिली जाऊ शकते.

## जोडपत्र २

## पीआयएस अंतर्गत एफपीआयसाठी पात्र असलेले केवायसी दस्तऐवज

| **१)संवर्ग** | | **एफपीआय प्रकार** | | |
|---|---|---|---|---|
| **दस्तऐवजाचा प्रकार** | | **संवर्ग १** | **संवर्ग २** | **संवर्ग ३** |
| | स्थापनेसंबंधीचे दस्तऐवज (मेमोरंडम आणि आर्टिकल्स ऑफ असोसिएशन, सर्टिफिकेट ऑफ | अनिवार्य | अनिवार्य | अनिवार्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| एंटिटीच्या/कंपनीच्या पातळीवर | इन्कॉर्पोरेशन, इ.) | | | |
| | पत्त्याचा पुरावा | अनिवार्य (मुखत्यारपत्र) (पीओए), ज्यात स्वीकारार्ह पत्त्याची उल्लेख असेल. | अनिवार्य (मुखत्यारपत्र) (पीओए), ज्यात स्वीकारार्ह पत्त्याची उल्लेख असेल.) | अनिवार्य - मुखत्यारपत्र वगळता इतर |
| | पॅन | अनिवार्य | अनिवार्य | अनिवार्य |
| | आर्थिक माहिती | सूट दिलेली आहे* | सूट दिलेली आहे* | अनिवार्य |
| | सेबी नोंदणीप्रमाणपत्र | अनिवार्य | अनिवार्य | अनिवार्य |
| | संचालक मंडळाचा ठराव @@ | सूट दिलेली आहे* | अनिवार्य | अनिवार्य |
| वरिष्ठ व्यवस्थापन (पूर्णवेळ संचालक/भागीदार/विश्वस्त/इत्यादी) | यादी | अनिवार्य | अनिवार्य | अनिवार्य |
| | पत्त्याचा पुरावा | सूट दिलेली आहे* | सूट दिलेली आहे* | एंटिटी लेटरहेडवर पूर्ण नाव, राष्ट्रीयत्व, जन्मतारीख जाहीर करते किंवा फोटो आयडेंटिटी पुरावा देते |
| | पत्त्याचा पुरावा | सूट दिलेली आहे* | सूट दिलेली आहे* | लेटरहेडवर घोषणापत्र* |
| | फोटोग्राफ्स | सूट दिलेली आहे | सूट दिलेली आहे | सूट दिलेली आहे* |
| अधिकृत हस्ताक्षरकर्ते | यादी आणि सही | अनिवार्य - मुखत्यारपत्र जर ग्लोबल कस्टोडियन्सच्या नावे असेल, तर ग्लोबल कस्टोडियन सिग्नेटरिज्‌ची यादी दिली जाऊ शकते. | अनिवार्य - मुखत्यारपत्र जर ग्लोबल कस्टोडियन्सच्या नावे असेल, तर ग्लोबल कस्टोडियन सिग्नेटरिज्‌ची यादी दिली जाऊ शकते. | अनिवार्य |
| | ओळखीचा पुरावा | सूट दिलेली आहे* | सूट दिलेली आहे* | अनिवार्य |
| | पत्त्याचा पुरावा | सूट दिलेली आहे* | सूट दिलेली आहे* | लेटरहेडवर घोषणापत्र* |
| | फोटोग्राफ्स | सूट दिलेली आहे | सूट दिलेली आहे | सूट दिलेली आहे* |
| अंतिम लाभार्थी मालक | यादी | सूट दिलेली आहे* | अनिवार्य ("२५% पेक्षा अधिक यूबीओ नाही" असे जाहीर करू शकतात) | अनिवार्य |
| | ओळखीचा पुरावा | सूट दिलेली आहे* | सूट दिलेली आहे* | अनिवार्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (यूबीओ) | पत्त्याचा पुरावा | सूट दिलेली आहे* | सूट दिलेली आहे* | लेटरहेडवर घोषणापत्र* |
| | फोटोग्राफ्स | सूट दिलेली आहे | सूट दिलेली आहे | सूट दिलेली आहे* |

टीप:- *बँकखाते उघडताना आवश्यक नाही. परंतु संबंधित एफपीआयज् अशी हमी देऊ शकतात की, नियामकांनी/कायद्याच्या अंमलबजावणी करणाऱ्यांनी संबंधित दस्तऐवजांची मागणी केल्यास ते कंपनीकडे सादर केले जातील.

@@ विशिष्ट कार्यक्षेत्रातील एफपीआयज्, जेथे बँकखाते उघडण्यासाठी संचालक मंडळाने ठराव पारित करण्याची पद्धत नसेल, तेथे संचालक मंडळाच्या ठरावाच्या बदल्यात ग्लोबल कस्टोडियनला/लोकल कस्टोडियनला दिलेले मुखत्यारपत्र सादर केले जाऊ शकते.

| २) संवर्ग | परदेशातील पात्र गुंतवणूकदार |
|---|---|
| I. | फॉरिन सेंट्रल बँक्स, सरकारी एजन्सीज, सॉव्हरिन वेल्थ फंड्स, आंतरराष्ट्रीय/मल्टिलॅटरल संस्था/एजन्सीज यांच्यासारख्या सरकारी आणि सरकारशी संबंधित परदेशातील गुंतवणूकदार. |
| II. | क) म्युच्युअल फंड्स, इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट्स, इन्शुरन्स/रिइन्शुरन्स कंपन्या, इतर ब्रॉड बेस्ड फंड्स, इत्यादींसारखे योग्यपणे नियमन केले जात असलेले ब्रॉड बेस्ड फंड्स.<br>ख) बँका, असेट मॅनेजमेंट कंपन्या, गुंतवणूक व्यवस्थापक/सल्लागार, पोर्टफोलिओ व्यवस्थापक, इत्यादींसारख्या योग्यपणे नियमन केल्या जाणाऱ्या एंटिटीज्.<br>ग) ज्या ब्रॉड बेस्ड गुंतवणूक व्यवस्थापकांचे योग्यपणे नियमन केले जात असतील असे ब्रॉड बेस्ड फंड्स.<br>घ) युनिव्हर्सिटी फंड्स आणि पेन्शन फंड्स.<br>ङ) आधीच सेबीकडे एफआयआय म्हणून/सब अकाऊंट म्हणून नोंदणीकृत झालेल्या युनिव्हर्सिटीशी संबंधित एंडोमेंट्स. |
| III. | भारतात पीआयएस रूटने गुंतवणूक करणारे इतर सर्व पात्र परदेशातील गुंतवणूकदार संवर्ग १ आणि २ अंतर्गत पात्र नाहीत, जसे एंडोमेंट्स, धर्मादाय संस्था/न्यास, फाऊंडेशन्स, कॉर्पोरेट बॉडिज्, न्यास, व्यक्ती, फॅमिली ऑफिसर्स, इत्यादी. |

**जोडपत्र ३**

**कमी जोखीम असलेल्या संवर्गातील ग्राहकांकडून विचारात घेतले जाऊ शकणारे अतिरिक्त केवायसी दस्तऐवज: ही दस्तऐवजांची दर्शक यादी आहे, जे कमी जोखीम असलेल्या संवर्गातील ग्राहकांकडून प्राप्त केले जाऊ शकतात.अधिक मार्गदर्शनासाठी कृपया ह्या पॉलिसीतील संबंधित कलमे, तसेच क्रेडिट पॉलिसी पहा.**

## ३) वैयक्तिक ग्राहकांसाठी केवायसी दस्तऐवज:

| अ.क्र. | स्वीकारार्ह दस्तऐवज | ओळख | निवासाचा पत्ता | सही | जन्मतारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | पॅन कार्ड | होय | ना ही | होय | होय |
| २ | आधार यूआयडी कार्ड | होय | होय | नाही | होय |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | मतदार ओळखपत्र | होय | होय | नाही | होय |
| ४ | ड्रायव्हिंग लायसन्स | होय | होय | नाही | होय |
| ५ | राष्ट्रीय लोकसंख्या रजिस्टरने जारी केलेले पत्र ज्यात नाव आणि पत्त्याचा तपशील आहे. | होय | होय | नाही | नाही |
| ६ | वैध पासपोर्ट | होय | होय | होय | होय |
| ७ | राज्य सरकार, केंद्र सरकारचे विभाग, वैधानिक किंवा नियामक प्राधिकरणे, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, शेड्युल्ड कमर्शिअल बँका आणि सार्वजनिक वित्तीय संस्था यांनी दिलेले अर्जदाराच्या छायाचित्रासह असलेले ओळखपत्र | होय | नाही | नाही | होय |
| ८ | नरेगा/सरकारी अभिकरणे/उपक्रम यांनी दिलेले जॉब कार्ड | होय | नाही | नाही | होय |
| ९ | व्यक्तीचे छायाचित्र यथायोग्यपणे साक्ष्यांकित केलेले असलेले राजपत्रित अधिकाऱ्यांनी जारी केलेले पत्र | होय | नाही | नाही | नाही |
| १० | मान्यताप्राप्त सार्वजनिक प्राधिकरण किंवा राजपत्रित अधिकारी यांनी ग्राहकाची ओळख/छायाचित्र पडताळणी केलेले पत्र | होय | नाही | नाही | नाही |
| ११ | बँकेच्या अकाऊंट स्टेटमेंटचेपहिले पान/ **फोटोसह**पासबुक**आणिफोटोवरबँकेचाशिक्का** | होय | होय | नाही | नाही |
| १२ | २ महिन्यांपेक्षा जुनी नसलेली उपयुक्त सेवांची बिले (वीज, लँडलाईन टेलिफोन, पोस्ट पेड मोबाईल, पाईप्ड गॅस लाईन, पाणी) | नाही | होय | नाही | नाही |
| १३ | ग्राहकाच्या नावे नोंदणीकृत असलेला मूळ/साक्ष्यांकित विक्रीकरार/करारनामा पॉलिसीनुसार/प्रक्रियेनुसार लागू असेल त्यानुसार गोळा करणे.<br><br>पत्त्याचा पुरावा म्हणून सादर केलेल्या स्वीकारार्ह ओव्हीडीवरील पत्ता जर सध्याच्या पत्त्यापेक्षा वेगळा असेल, तर अशा प्रकारच्या ओव्हीडीवरील पत्ता मूळ दस्तऐवजावरून पडताळून पाहिला पाहिजे आणि एफआय/पडताळणी सर्वतोपरी प्रयत्न करून केले पाहिजे. सध्याच्या पत्त्याच्या पुराव्यासाठी ग्राहक भाडेकरार/लीव्ह अँड लायसन्स करार किंवा स्वयंघोषणापत्र सादर करू शकतील आणि अशा प्रकारचा सध्याच्या पत्त्याची पडताळणी एफआय एजन्सीच्या माध्यमातून/कंपनीद्वारे/शाखेच्या कर्मचाऱ्याद्वारे वैयक्तिक भेट देऊन केले जाणे आवश्यक असते. | नाही | होय | नाही | नाही |
| १४ | महानगरपालिका कराची अलीकडील पावती | नाही | होय | नाही | नाही |
| १५ | राज्य सरकार किंवा केंद्र सरकारचे खाते, वैधानिक किंवा नियामक संस्था, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, शेड्युल्ड कमर्शिअल बँका, वित्तीय संस्था आणि सूचीकृत कंपन्या यांनी दिलेले निवासव्यवस्थेचे पत्र आणि अशा नियोक्त्यांसोबत केलेले लीव्ह अँड लायसन्स करार, ज्याद्वारे अधिकृत निवासस्थान दिलेले असेल. | नाही | होय | नाही | नाही |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १६ | सरकारीविभागकिंवासार्वजनिकक्षेत्रातीलउपक्रमांद्वारेसेवानिवृत्तकर्मचाऱ्यांनानिवृत्तीवेतनकिंवाकौटुंबिकपेन्शनपेमेंटऑर्डर, जरत्यातपत्ताअसेलतर | नाही | होय | नाही | नाही |
| १७ | यूनिक आयडेंटिफिकेशन अथॉरिटी ऑफ इंडियाने दिलेले पत्र, ज्यात नाव, पत्ता आणि आधार क्रमांक यांचे तपशील असतील. | नाही | होय | नाही | नाही |
| १८ | सरकारीविभागकिंवासार्वजनिकक्षेत्रातीलउपक्रमांद्वारेसेवानिवृत्तकर्मचाऱ्यांनानिवृत्तीवेतनकिंवाकौटुंबिकपेन्शनपेमेंटऑर्डर, जरत्यातपत्ताअसेलतर | नाही | नाही | नाही | होय |
| १९ | जन्मप्रमाणपत्र (सरकारी अभिकरणांनी दिलेले) | नाही | नाही | नाही | नाही |
| २० | शाळा सोडल्याचा दाखला (१०वी/१२वी) | नाही | नाही | होय | नाही |

३.१. **पत्त्याचा पुरावा म्हणून फर्मकडून/कंपनीकडून प्राप्त करावाच्या दस्तऐवजांची यादी (कोणताही एक)**

| अ.क्र. | फर्म | फर्म | कंपनी |
|---|---|---|---|
| १ | फर्मचे अलीकडील विजेचे किंवा दूरध्वनीचे बिल (२ महिन्यांपेक्षा जुने नसलेले) | होय | होय |
| २ | बिझिनेस रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट, असल्यास (जीएसटी) | होय | होय |
| ३ | राष्ट्रीयीकृत/शेड्युल्ड कमर्शिअल बँकेचे बँक स्टेटमेंट | होय | होय |
| ४ | अलीकडे सुधारणा केलेल्या पार्टनरशीप डीडची प्रमाणित प्रत | होय | होय |
| ५ | पॅन कार्ड अलॉटमेंट पत्राची प्रत | होय | होय |

## जोडपत्र - ४

**क. बिल्डर/प्रोजेक्ट/कॉर्पोरेट ग्राहकांच्या एसटीआरज्ची उदाहरणादाखल यादी**

१. ग्राहकाशी संबंधित तपशील अनेक वेळा बदललेले आहेत (नावातील बदल, वारंवार केलेल्या दुरुस्त्या, इ.)

२. ग्राहकाची अनावश्यक गुंतागुंतीची रचना.

३. **व्यवसाय प्रोफाइलशी संबंधित नसलेले वैयक्तिक किंवा व्यवहारांचे वर्ग आणि अपेक्षित क्रियाकलाप/व्यवहार अज्ञात;**

४. ग्राहक माहिती, डेटा, दस्तऐवज देण्यास अनुत्सुक आहे;

५. खोटे दस्तऐवज, डेटा, कर्जाचा हेतू, खात्याचे तपशील सादर करणे;

६. **ज्याद्वारे प्रारंभिक योगदान दिले आहे** अशा **उत्पन्नाच्या स्त्रोताचा तपशील देण्यास नकार देतो, बँक खात्यातील निधीचे स्त्रोत संशयास्पद आहेत इ.**

७. व्यक्तिश: भेटण्यास अनुत्सुक, पुरेशा कारणाशिवाय तृतीय पक्षाच्या/मुखत्यारपत्रधारकाच्या माध्यमातून प्रतिनिधित्व करतो;

८. दिलेल्या पत्त्याच्या जवळ एचएएफएलची शाखा/कार्यालय असूनही कर्जाच्या अर्जात दिलेल्या ग्राहकाच्या निवासापासून/व्यवसायाच्या पत्त्यापासून दूर असलेल्या शाखांशी/एएचएफएलच्या कार्यालयांशी संपर्क साधतो.

९. **बँक** खात्याच्या विवरणात अगणित हस्तांतरणाबद्दल स्पष्टीकरण देण्यास किंवा समाधानकारक उत्तर देण्यास असमर्थ / एकापेक्षा अधिक खाती.

१०. **निधीच्या स्त्रोताचे योग्य औचित्य न सांगता असंबंधित तृतीय पक्षाच्या खात्यांद्वारे केलेले प्रारंभिक योगदान;**

११. **कर्जाच्या रकमेच्या अंतिम वापराचे योग्य औचित्य न दाखवता आणि कर्जाच्या अंतिम वापराच्या विषमतेशिवाय टॉप-अप कर्ज आणि/किंवा इक्विटी कर्ज घेणे;**

१२. **कर्जाच्या मंजुरीसाठी उत्पन्नाच्या स्त्रोताचे संशयास्पद मार्ग सुचवणे;**

१३. व्यवहारांमध्ये आर्थिक शहाणपण नाही;

१४. फसवेगिरी शोधून काढलेली आहे; ग्राहकाकडून कोणत्याही शाखेत खोट्या चलनी नोटा प्राप्त झाल्यास त्याविषयी एनएचबी/आरबीआयच्या परिपत्रकानुसार माहिती देणे;

१५. अज्ञात स्त्रोतापासून असाधारण आर्थिक व्यवहार;

१६. असंबंधित किंवा अज्ञात तृतीय पक्षांकडून प्राप्त झालेले पैसे आणि शुल्कासाठीचे पेमेंट रोख रकमेत, ज्यात पेमेंट करण्याची ही नेहमीची पद्धत नसते;

१७. **कर्जाचे खरे लाभार्थी आणि खरेदी करावयाच्या सदनिका याबाबत गंभीर शंका आहेत;**

१८. खोटे बँकखाते उघडून कर्जाच्या रकमेचे रोखीकरण;

१९. **वित्तपुरवठा करण्यासाठी मालमत्ता/निवास युनिटला यापूर्वीच निधी दिला गेला आहे आणि तेच थकबाकी आहे आणि ते लपवून ठेवले आहे हे जाणून कर्जासाठी अर्ज करणे;**

२०. **विक्रीसाठीच्या करारामध्ये नमूद केलेला विक्री विचार हा खरेदीच्या क्षेत्रामध्ये सूचित केलेल्या प्रकाशित दरांमध्ये प्रचलित असलेल्यापेक्षा असामान्यपणे जास्त/कमी आहे;**

२१. त्याच मालमत्तेवर/राहत्या घरावर एकापेक्षा अधिक कर्जे घेणे;

२२. ज्याचा व्यवहाराशी संबंध नाही अशा तृतीय पक्षास पेमेंट करण्याची विनंती;

२३. ग्राहकाद्वारे व्हेंडर/बिल्डर/डेव्हलपर/ब्रोकर/एजंट, इत्यादींसोबत हातमिळवणी करून कर्जाच्या रकमेचा वापर करणे आणि त्या रकमेचा वापर, ती ज्यासाठी दिली होती, त्यापेक्षा वेगळया कारणासाठी करणे;

२४. एकापेक्षा अधिक कर्जे/अर्थपुरवठा, ज्यात एनजीओ/धर्मादाय संस्था/लघु/मध्यम आस्थापना (एसएमईज्)/स्वयंसहायता गट (एसएचजीज्)/ सूक्ष्म अर्थसाह्य गट (एमएफजीज्) यांचा समावेश असेल;

२५. पत्त्यात बदल करण्यासाठी वारंवार विनंती;

२६. हप्त्यांपेक्षा जास्त रक्कम भरणे व त्यासोबत जास्त भरलेली रक्कम परत करण्यासाठी विनंती करणे;

२७. अपेक्षित **किंवा सरकारी अधिसूचित दरापेक्षा जास्त/कमी किमतीत रिअल इस्टेटमध्ये गुंतवणूक.**

***